# प्राचीन आणि अर्वाचीन महिला

लेखक -

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



# प्राचीन आणि अर्वाचीन महिला

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर


**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प संचालक : रणजित विक्रम सावरकर

www.savarkarsmarak.com

# प्राचीन आणि अर्वाचीन महिला

मनुस्मृतीतील महिला

(१)

वेदांच्या खालोखाल आपल्या हिंदु राष्ट्राचा अत्यंत पूज्य आणि आपल्या संस्कृतीचा, आचारांचा आणि व्यवहाराचा प्राचीन काळापासून आधारस्तंभ होऊन बसलेला असा जर कोणचा ग्रंथ असेल तर तो मनुस्मृती हाच होय. आपल्या राष्ट्राच्या ऐहिक आणि पारलौकिक जीवनयात्रेचे नियमन शतकानुशतके हा ग्रंथच मुख्यतः करीत आलेला आहे. आजही कोट्यवधि हिंदु ज्या निर्बंधान्वये (कायद्याने) आपले जीवन आणि व्यवहार घालवीत आणि चालवीत आहेत ते निर्बंध (कायदे) तत्वतः तरी मनुस्मृतीवरच आधारलेले आहेत. मनुस्मृती हीच आजही तत्वतः हिंदु निर्बंध (हिंदु लॉ) आहे. मूळ ते; इतर स्मृति, सदाचार वा रूढी त्याचाच विस्तार आहेत वा असला पाहिजे असा आपला हिंदु निर्बधशास्त्राचा सुप्रतिष्ठित संकेत आहे. 'वेदार्थोपनिबद्धत्वात्प्राधान्यं हि मनोः स्मृतेः। मन्वर्थविपरीता तु या स्मृतिः सा न शस्यते।' असे स्मृतिकार बृहस्पतिही म्हणतात.

हा ग्रंथ जसा पूज्य तसा प्राचीनही आहे. त्याच्या निश्चित कालासंबंधी निर्णय लागलेला नाही, हाही एका अर्थी त्याच्या प्राचीनत्वाचाच पुरावा आहे!

आमच्या या निबंधापुरते इतके सांगणे पुरे आहे की, आज जे पुस्तक मनुस्मृति म्हणून आपल्यापुढे आहे त्यातही काही भाग फारच प्राचीन- इसवी सनापूर्वीच्या आठव्या शतकात म्हणजे उण्यापुऱ्या अडीच हजार वर्षापूर्वीचा आहे; आणि हे बहुतेक पुस्तक जवळ जवळ दोन हजार वर्षापूर्वीचे आहे. रामायण, महाभारताचा उल्लेखही त्यात शोधता सांपडणे कठीण पडते!

आपल्या पणजीच्या पणजीची दोनशेवी पणजी!!

अशा या आपल्या हिंदु राष्ट्राच्या पूज्य आणि प्राचीन स्मृतीत, कायद्याच्या पुस्तकात, निर्बधग्रंथात, त्या प्राचीन काळी आपला स्त्रीसमाज जीवन कसे घालवी, काय शिके, काय जेवी, कसा वागविला जाई, कसा वागे, त्याचे अधिकार काय असत, कर्तव्ये काय असत, समाज स्त्रीविषयी काय म्हणे, कन्येची स्थिति काय असे, मातेची काय, पत्नीची काय याविषयी मिळणारी माहिती ही आजच्या एकंदर पणजीच्या पणजीची दोनशेवी पणजी! - तिचे नाव काय असे, तिची मुंज केव्हा होई, तिचे लग्न कसे होई, श्राध्दाच्या दिवशी ती सैंपाक काय करी, तिची मुले तिला नमस्कार कसा करीत, ती आशीर्वाद कसा देई, तिला नवरा कसा वागवी, तिच्या शेजारपाजारच्या आयाबायांची बोलणी काय चालत, त्यांची चालचालणूक कशी असे, पुत्र व्हावा म्हणून त्यांना किती तळमळ वाटे, वंशाची वेली खुरटू नये म्हणून पुत्रप्राप्तीस्तव त्या काय काय उपाय करीत, पतिनिधनानंतर वैधव्यात दिवस कसे काढीत, का पुन्हा विवाह करीत, त्यांना कोणी टोचून

बोले की काय, त्यांची दागिन्याबिगिन्यांची पेटी किती मोठी असे! आपल्या पणजीच्या पणजीच्या दोनशेव्या पणजीच्या प्रेमळ घरी जाऊन तिला अशी ममतेची मनोमय भेट देणे आणि डोळे भरुन नसले तरी मन भरुन पाहून येणे कोणासही कौतुकावह समाधानाचेच वाटणारे आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकांना तर दोन अडीच हजार वर्षांपूर्वीच्या हिंदु स्त्रीवर्गाच्या जीवनाचे यथावत् प्रत्यक्ष दर्शन घडविणारा - मनुस्मृति हा एकच चित्रपट आहे. चित्रपटाची कला नव्हती तेव्हाही जेव्हाच्या तेव्हा यथावत् अंकण करून राखलेला खराखरा ऐतिहासिक चित्रपट आहे!

महाराष्ट्र वाचकांसाठी आम्ही, यास्तवच, त्या पूज्य नी प्राचीन चित्रपटातील, 'मनुस्मृतीतील महिला' नावाची एक 'चित्रावली' (फिल्म) स्त्री मासिकाच्या पडद्यावर दाखवीत आहो.

आपल्या अर्वाचीन स्त्रीविषयक भावभावनांच्या रंगाचे शिंतोडे कळत न कळत त्यांवर ऊडून त्यांचे निर्भेळ ऐतिहासिक स्वरूप लोपण्याची भीति मुळीच उरू नये म्हणून आम्ही ही शब्दचित्रे आमच्या शब्दांत न देता थेट मनुस्मृतीच्याच शब्दांत देणार आहोत. मनुस्मृतीतील श्लोकच शक्यतो प्रथम देऊन मग आम्हांला काही विशेष सांगावयाचे तर ते स्वतंत्रपणे त्या त्या स्थळी वेगळे करून उल्लेखू. मूळ श्लोक पुढे असले म्हणजे आमच्याहून वेगळा अर्थ वा अनुमान कोणास सुचले वा रूचले तर त्यासही या व्यवस्थेने तेच अंगीकारणे अधिक सोयीचे होईल.

अपौरुषेय, त्रिकालाबाधित, अनुल्लंघ्य धर्मशास्त्र' म्हणून नव्हे,
तर बुध्दिमीमांस्य अशी केवळ ऐतिहासिक माहिती म्हणून!

या लेखमालेच्या आरंभी आणखी काही विधेयांस उल्लेखिणे अवश्य आहे. मनुस्मृति हे आपल्या हिंदु समाजाच आजही तत्वतः तरी पुष्कळ अंशी प्रमाणभूत मानले जाणारे ' धर्मशास्त्र ' आहे. 'धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः' यात आजच्या प्रतिभाषेत फोड करुन सांगायचे म्हणजे, निर्बंध ( कायदा) आणि आचार या दोन्हीचा समावेश असतो. पुरातन धर्मरचनेप्रमाणे ही दोन्ही सारखींच अनुल्लंघ्य मानलेली असतात. आणि मनुस्मृतीत सांगितलेले हे धर्मशास्त्र त्रिकालाबाधित नि अपरिवर्तनीय आहे असे समजले जाते. त्यातही मनुस्मृतीची प्रतिज्ञाच आहे की, वेदाबाहेर ती काहीही सांगत नाही. ती स्पष्टपणे म्हणते,

यः कश्चित्कस्यचिद्धर्मो मनुना परिकीर्तितः।
स सर्वो पि हितो वेदो सर्वज्ञानमयो हि सः ।। -अ.२:७
या वेदबाह्याः स्मृतयो याश्च काश्च कुदृष्टयः।
सर्वास्ता निष्फलाः प्रेत्य तमोनिष्ठा हि ताः स्मृताः।। - अ.२: ९५

वेद अपौरुषेय आहेत नि जे वेदात सांगितले तेच मनुस्मृतीत; अर्थात् ते धर्मशास्त्रही अपौरुषेय आज्ञांसारखेंच त्रिकालाबाधित नि अनुल्लंघ्य आहे अशी पुरातन विचारसरणी, ही 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' प्रवृत्ति थेट मनुस्मृतीच्या कालापासूनच चालत आलेली आहे. मनुस्मृतीचे म्हणणे हे की, तीत जे धर्मशास्त्र सांगितले ते अनुल्लंघ्य का, ग्राहय का, तर ते श्रुतीला धरून आहे म्हणून! -उपयुक्त आहे की

www.savarkarsmarak.com

नाही, कोणच्या परिस्थितीत ते उपयुक्त, एखाद्या परिस्थितीत ते अनुपयुक्तच नव्हे तर चक्क हानिकारक ठरले तर पालटावे वा गाळावे की नाही, हे सारे प्रश्न दुय्यम नव्हे अपमानदर्शक! तशी चर्चा, मीमांसा, हीही संशयार्थ, तरी सर्वस्वी निषिध्द! श्रुतीत आहे म्हणूनच जे अनुल्लंघ्य, त्रिकालाबाधित तेच स्मृतीत म्हणून तीही अनुल्लंघ्य, अमीमांस्य. हा स्वतः मनुस्मृतीचाच स्पष्ट दंडक आहे. आम्ही वर दिलेल्या वचनांसह ही खालील वचने वाचावी.

श्रृतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः ।
ते सर्वार्थेष्वमीमांस्ये ताभ्यां धर्मो हि निर्बभौ ।। १०
योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद् द्विजः।
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः ।।११ -अ. १

आपल्या प्राचीन परंपरेप्रमाणे तरी जी आद्य स्मृति मानली जाते आणि जी प्राचीन तरी आहेच आहे, त्या स्मृतीतही ही ' श्रुतिस्मृतिपुराणोक्त ' प्रवृत्ति तशी स्पष्टपणे अभिमानपुरस्सर अंगीकारिली असता प्रा. आळतेकरांसारखे काही विद्वान ती मुसलमानी कालापासून काय ती अंगीकारली गेली असे 'केसरी' सारख्या पत्रातून म्हणतात तरी कसे हे कळत नाही. ती प्रवृत्ति चांगली की वाईट, ती ठेवूनही सुधारणा झाल्या की नाही, तिचे परिणाम हितावह झाले की अहितावह हे प्रश्न अगदी स्वतंत्र आहेत. ही प्रवृति आपल्या एकंदर धर्मशास्त्राची आधारस्तंभ होती की नाही हा प्रश्न आहे; आणि आम्ही सुधारक मंडळी त्या त्या प्रवृत्तीच्या अस्तित्वाची साक्ष देतो, त्याहून शतपट अधिक प्रबळतेने आमच्या लक्षावधि सनातन शास्त्री मंडळींचीही साक्ष या प्रकरणी आमच्याच बाजूला पडणारी आहे. कारण श्रुतीत जे आहे ते स्मृतीत आहे म्हणूनच ते अनुल्लंघ्य धर्मशास्त्र होय. तेच स्मृतीत नि तेच पुराणात आहे. त्यात सुधारणा होणेच शक्य नाही; कारण ते मुळी 'असुधारणीय' 'अपरिवर्तनीय' आहे! ही प्रतिज्ञाच जो नाकारील तो मुळी सनातनीच होऊ शकत नाही!

धर्मशास्त्र म्हटले म्हणजे ते वर दिलेल्या हया 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' भावनेनेच वाचावयाचे अशी ही समजूत अजूनही बहुसंमत असल्याने आम्ही हया लेखात स्त्रीवर्गाविषी मनुस्मृतीचे कायकाय दंडक आहेत, त्या प्रकरणी ती काय म्हणते, ते स्पष्ट करण्यासाठी तीतील वचने जी देणार आहोत ती त्याप्रमाणेच आजही स्त्रीविषयक विचारांचे नि आचारांचे, अधिकारांचे नि कर्तव्यांचे नियमन झाले पाहिजे अशा बुध्दीनेच देत आहो की काय असे पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. उलटपक्षी ते दोन अडीच हजार वर्षापूर्वीचे त्या काळात बरे वाटलेले, अत्यंत उत्कृष्ट वाटलेले आचार वा विचार महिलावर्गाचे आजही तसेच्या तसे नियमन करण्याच्या कार्यी किती अप्रयोज्य, असमर्थ नि अपायकारक आहेत हेच दाखविण्यासाठी आम्ही ती वचने इथे देत आहो असेही पुष्कळांस वाटू शकेल. पण या लेखात आमचा तसे काहीही सिध्द करण्याचा हेतू नाही. मनुस्मृतीच्या काळी महिला वर्गाविषयी काय कल्पना, भावना नि दंडक असत ही नुसती वस्तुस्थिती काय ती दाखविण्यासाठी हा लेख लिहिला आहे. मनुस्मृतीतील ती वचने अनुल्लंघ्य दंडक म्हणून आजही तसेच वागणे अवश्य आहे, श्रेयस्कर आहे, म्हणून आम्ही देत नाही. मनुस्मृतीस धर्मशास्त्र म्हणून न मानता तो एक त्या काळचे आमचे समाजचित्र दाखविणारा सामाजिक

इतिहासग्रंथ आहे - याच नात्याने काय तो या लेखात आम्ही त्याचा उपयोग करणार आहोत. मनुस्मृतीतील महिला कशी होती? तर अशी, इतकेच हा लेख सांगतो. ती तशी होती हे चांगले का वाईट, ती आजही तशीच असावी की काय, इत्यादि प्रश्नांचा उहापोह त्याच्या कक्षेत मुळीच पडत नाही. दुसरे असे की, अनुल्लंघ्य धर्मशास्त्र असे आम्ही मनुस्मृतीस जे मानीत नाही ते त्या थोर ग्रंथाविषयीची मान्यता लोकात कमी व्हावी म्हणून नव्हे, तर ती उलट केव्हाही वास्तविक आहे त्याहून कमी होऊ नये म्हणूनच होय.

आपल्या वेदस्मृतिप्रभृति महान ग्रंथाची योग्यता इतकी मोठी आहे की, तिला टिकविण्यासाठी ते ग्रंथ अपौरुषेय वा त्रिकालाबाधित वा सर्वज्ञ आहेत अशा काहीच्या बाहीच अर्थवादाचे वा व्यर्थवादाचे स्तोम रचणे, हिमालय पर्वत डगमगू नये म्हणून त्याच्या पायथ्याला बांबूचे टेकू उभारण्याइतकेच अनावश्यक, अनिष्ट नि हास्यास्पदच व्हावे! इतकेच नव्हे तर त्यांस, ते आहेत तसेच, पौरूषेय परिस्थितिसाक्षेप, त्या काळच्या भावभावना, नियमनिर्बंध, आचारविचार प्रदर्शविणारे आमचे प्राचीन धर्मग्रंथ या दृष्टीनेच संबोधण्याने त्यांच्याविषयीची पूज्यता चिरकाल टिकू शकते, जगन्मान्य राहू शकते. त्यांस आपण मूर्ख अट्टाहासाने - त्रिकालाबाधित मानले नाही तरच त्यांची मान्यता त्रिकाली अबाधित राहील!

ज्या वेळी कोणी राजांचे खरोखरच महाराज होते त्या वेळी त्यांना महाराज ही शोभत असलेली पदवी, ते स्वतःच दुसऱ्यांचे मांडलिक झाले असताही यथार्थपणे जशी आचरून दाखविता येत नाही, आज मांडलिक असताही जुन्या महाराजपणास गाजवू जाता जशी त्या पदवीची उलट विटंबनाच होते, आणि मांडलिक झालेल्या परिस्थितीत महाराज म्हणवून घेण्यात तो मनुष्य महाराज न होता तो महाराज शब्द मात्र मांडलिक या शब्दाचा पर्याय होऊन बसतो, तशीच केविलवाणी स्थिति प्राचीन परिस्थितीत अनुल्लंघ्य धर्मशास्त्रत्व पावलेल्या, त्या काळी सर्वज्ञ वाटलेल्या या पूज्य ग्रंथास आजच्या काळीही अनुल्लंघ्य धर्मशास्त्र, त्रिकालाबाधित निर्बंधग्रंथ, 'सर्वज्ञानमयो हि सः' अशा स्तोमाने जगात मिरविले असता या ग्रंथाचीही झाल्यावाचून राहत नाही. वेद काय, मनुस्मृति काय, कुराण-बायबल अवेस्ता तौलिद हे ग्रंथ पौरुषेय मानले असता त्यांच्या कर्त्याविषयी, त्या परिस्थितीत त्यांनी केवढी प्रगति केली ते पाहून, कितीतरी जनहित साधले ते ध्यानी येऊन, आश्चर्याने मन थक्क होते; योग्य तो आदर वाटल्यावाचून राहत नाही; आणि त्यांच्यात अपुरेपणा दिसतो तो अगदी क्षम्यच नव्हे, तर अगदी मनुष्यसुलभ नि साहजिक वाटू लागतो. त्यामुळे त्यांची योग्यता मुळीच कमी वाटत नाही. पण या वेदअवेस्तांस, कुराण-पुराणांस, तौलिद-बायबलास ईश्वरी आदेश म्हटले, अक्षर नि अक्षर त्रिकालाबाधित सत्य, अनुल्लंघ्य, ईश्वरी आज्ञा म्हटले की त्यायोगे त्या ग्रंथांना ते ईश्वरीय पूर्णत्व येण्याचे ठायी उलट ईश्वरासच एखाद्या मनुष्यासारखे स्खलनशील दुर्बलत्व चिकटविले जाते; तो ग्रंथकर्ता मनुष्य ईश्वरप्रेषित होण्याच्या ठायी ईश्वरच मनुष्य होऊन बसतो! आणि ते ग्रंथही उपहासास्पद बनतात, हानिकारक होतात!! हे कसे होते ते ध्यान्यात येण्यासाठी या 'मनुस्मृतीतील महिला' नांवाच्या प्रस्तुत लेखमालेलाच अगदी तंतोतंत लागू पडेल असे या मनुस्मृतीतीलच एका लेखाचे उदाहरण घेऊ.

स्त्रियांची नावे कशी असावीत
आणि कशी नसावीत?

कोणत्या कन्यकेशी विवाह करणे उत्तम पक्ष यासंबंधी विवेचन करताना अध्याय तीनमध्ये ९, १० या श्लोकांत स्त्रियांची कोणची नावे उचित तेही मनुभगवानांनी सहजगत्या उल्लेखिले आहे.

नर्क्षवृक्षनदीनाम्नी नान्त्यपर्वतनामिकाम् ।
न पक्ष्यहिप्रेष्यनाम्नींन च भीषणनामिकाम्।। (उदवहेत्) ९
अव्यंगांगी सौम्यनाम्नी हंसवारणगामिनीम् ।
तनुलोमकेशदशनां मृद्वङ्गीमुद्वहेत्स्त्रियम् ।। १० -अ. ३

नक्षत्रे, वृक्ष, नद्या, पर्वत, सर्प, सेवक आणि भीषणता यांचे वाचक असे नावे असलेली कन्यका विवाहास अयोग्य होय. जिचे नावे सौम्य आहे तिच्याशी विवाह करणे युक्त, हा या श्लोकांचा भावार्थ आहे. एक साधे उपदेशवाचन म्हणून वाचले तर या सूचनेचा काही विषाद वाटत नाही. स्त्रियांची नावे भीषण नसावी तर त्यांचे विशिष्ट गुण जे वत्सलता, कोमलता, मार्दव ते सहज व्यक्तवितील अशीच ‘सौम्य’ नावे कन्यकांची असावी ही सूचना किती गोड आहे! मनूसारख्या तत्वज्ञ राजर्षीने धर्मशास्त्रासारख्या गंभीर ग्रंथास रचतानाही कोमल आणि सुंदर भावांची सुद्धा अशी विचारपूस करावी आणि लोकांस इतक्या बारीकसारीक प्रकरणीही सौम्य सूचना देण्यास विसरू नये याचे किती कौतुक वाटते! आजही आपण भगवान मनूंची ही सुंदरतेची आवड पुरवून आपल्या कन्यकांची सौम्य नावे ठेवली असता ते किती शोभून जाईल, असेही वाटल्यावाचून राहत नाही. बरे, त्या श्लोकांत अशी नदी, पर्वत, भीषणता प्रभृतिवाचक नावे असलेल्या कन्यकांशी विवाहच करणे अयुक्त हे जे कडक चरण आहे त्याचेही, हे श्लोक ऐतिहासिक दृष्टीनेच वाचले असता फारसे वावडे वाटत नाही. कारण मनुस्मृतीच्या त्या काळी पाप लागेल, नरकात पडाल, इत्यादि वाक्यें निषेधाचे ठरलेले पर्याय होते. आजही आई मुलास जशी दिवसातून दहादा ‘मेल्या’ म्हणून चट्कन म्हणून जाते, पण त्या शब्दांचा अर्थ तसा शब्दशः घेण्याचे तिच्या वा आपल्या स्वप्नांतही येत नाही; तसे ती त्या वेळी बोलण्याची एक चाल-ढब होती, असे समजून आपण ते आज उपेक्षणीय समजले की झाले असा न सांगता सरळ अर्थ लागून ते श्लोक कौतुकास्पद वाटतात. एका प्राचीन पूज्य ग्रंथकाराने सहजगत्या दिलेली नि त्या काळच्या लोकांस विशेष लागू पडणारी एक गोड सूचना अशा ऐतिहासिक दृष्टीने ते श्लोक वाचले तर!

पण जर का मनुस्मृतीतील शब्द नि शब्द त्रिकालाबाधित, अनुल्लंघ्य, म्हणजेच ‘सनातन’ धर्म म्हणून हे दोन साधे श्लोक आचरावयाचे असतील तर घरोघरी केवढा अनर्थ कोसळेल! आणि तोही सुधारकांच्या घरोघर नव्हे, तर सनातन बंधूंच्याच! कारण या प्रकरणी मनुस्मृतीचा दंडक सुधारकच अधिक पाळतात, त्यांच्यात बहुधा कन्यकांची नावे वत्सला, शालिनी, मंजुला अशी ‘सौम्य असतात. पण मनुस्मृतीस शब्दशः त्रिकालाबाधित मानणाऱ्या ‘सनातन’ मंडळींतच मनूच्या या श्लोकांस पायाखाली तुडवून, नव्हे मनूंना आवडतात तीच नावे ठेवणे छछोरपणा समजून आणि मनूने ठेवू नयेत म्हणून जी

नावे सांगितली तीच धर्मानुकूल समजून बहुधा ठेवण्यात येतात. मनू म्हणतात, नद्यांची नावे कन्यकांना ठेवणे जितके पाप आहे की, यायोगे ती कन्यका वरण्यालादेखील निषिध्द होते. पण आमच्या सनातनबंधूंच्या घरघर गंगा, गोदावरी, सिंधु, कृष्णा, कावेरी, नर्मदा, यमुना, दुथडी भरभरून वहात आहेत! नक्षत्रनामे मनु अशीच गर्ह्य मानतात. पण आमच्या घरादारांत 'रोहिणी' दिवसाढवळया देखील सारख्या चकाकत आहेत! त्यांतही ज्यांना 'रात्रि' हे नावेच यथार्थ भासावे अशा काळया कुळकुळीत कन्यकांनाही 'तारे' म्हणून हाक मारून कळत न कळत त्या बिचाऱ्यांचा निष्कारण उपहास होत आहे आणि गोऱ्यापान मुलींना 'कृष्णे' म्हणून संबोधण्यात येत आहे! मनूसारख्यांच्या वेदाभ्यासकठोर श्रुतीलाही ललनांची ललित नावे येता जाता ऐकावीशी वाटतात, पण त्यांच्या शब्दानशब्दास अनुल्लंघ्य मानणाऱ्या या कट्टर सनातन्यांच्या घरी पाय ठेवण्याचा अवकाश की 'अक्का, दगडे, धोंडे, भिके, भिमे!' अशी एकच हाकाहाक चालू झालीच म्हणून समजावे!

वृक्षांची नावे कन्यकांना ठेवू नयेत म्हणून मनुभगवान लिहितात तरीही त्यात फारसे स्वारस्य नसल्याने सुधारक तिकडे दुर्लक्ष करण्यास मोकळा आहे. जे धिप्पाड वा नीरस वा लालित्यहीन वृक्ष त्यांची नावे ललनांना शोभत नाहीत हे खरे. मुलीला ए पिंपळे! ए निवडुंगे! ए पोफळे! अशी नावे शोभणार नाहीतच पण कोमल कन्यकांना चंपा, जाई, जुई, मालती, गुलाब, ही नावे निदान त्या फुलांची नावे म्हणून तरी, शोभूनच जातात. तसेच नद्यांची कोमल वर्णाची असतील तर यमुना, सिंधु, गंगा, गोदा ही नावे मनूने त्याज्य ठरविली म्हणूनच आम्हीही त्याज्य मानण्याचे काहीही कारण नाही. तारा, रोहिणी, चंदु, इंदु ही नावेही तशा गोऱ्या, चुणचुणीत नि सुरेख मुलींना ठेवणे हे आल्हाददायकच भासते. अर्थात् मनु भगवानांची व्यक्तिशः एक साधी आवड या दृष्टीने या दोन श्लोकांत उगीच ओझरते वाचून पहाणाऱ्या सुधारकांसच काय ती ही निवड करणे शक्य आहे.

परंतु मनु शब्दशः आजही मानीत नाहीत म्हणून सुधारकांना पाखण्ड म्हणणाऱ्या सनातनी बंधूंना मात्र ही निवड करणे शक्य नाही. त्यांनी आजच्या आज मनुस्मृतीच्या हया स्पष्ट निवडक आज्ञेचे पालन करण्यासाठी गंगा, गोदा, कृष्णा, भागीरथी, रोहिणी, चंपा, दगडी, धोंडी, भिकी प्रभृति सारी नावे पालटून या साऱ्यांची बारशी पुन्हा केली पाहिजेत. या श्लोकांना अक्षरशः त्रिकालाबाधित मानताच याच्याहपेक्षा जो मोठा अनर्थ ओढवणारा आहे तो हा की, मनुस्मृतीप्रमाणे ज्या मुलींची अशी निषिद्ध नावे एकदा ठेवली गेली त्या जन्मभर लग्नाला निषिद्ध ठरतात!! बारशास झालेली चूक त्यांच्या बाराव्यापर्यंत पुरून उरणारी आहे! नदी, वृक्ष, नक्षत्र, भीति प्रभृतिवाचक नावे असणाऱ्या कन्येस 'नोद्वहेत्!' वरु नये! क्षय, व्यंग, खूळ प्रभृति अवरणीय कन्यादोषांतच मुलीचे असे निषिद्ध नावे पडलेले असणे हाही दोष मनुस्मृतीने असा एका पंगतींत बसवून त्यांना एकच समान दंड सांगितला आहे - नोद्वहेत! म्हणजे साऱ्या उपवर गंगा, गोदा, भागीरथींचे प्रीतिजीवन आजचे आज आटून जाणार! साऱ्या उपवर ज्योति मावळणार! चंपावतीची आशा जळून खाक होणार! आमच्या भिमीलाच काय धोंडीला सुद्धा पाझर फुटून त्या धायधाय रडू लागणार! अशी नावे विशेषतः महाराष्ट्रात घरोघरी असल्यामुळे आजच्या उपवर कन्यकांची ही पिढीच पिढी, बोहल्यावर चढता चढता अकस्मात खाली ओढली जाऊन, आजन्म अधवतेच्या खाईत ढकलली जाणार! जर मनुभगवंतांचा

प्रत्येक श्लोक अनुल्लंघ्य धर्माज्ञाच मानणे असेल तर! इतकेच नव्हे तर अशी नावे असणाऱ्या आमच्या सहस्त्रावधि माता-भगिनींची झालेली लग्नेही अधर्म्य ठरणार!!

आणि हा सर्व अनर्थ का? त्या बिचाऱ्या अनागस कुमारींनी, कन्यकांनी वा विवाहितांनी स्वतः काही घनघोर अपराध केला म्हणून? नव्हे! त्यांच्या बारशास त्यांच्या आईबापांनी त्यांची नावे भिमी वा धोंडी, कृष्णा वा कावेरी ठेवली म्हणून! म्हणून त्यांना कोणीही वरू नये. त्यांचा रंग काळा की गोरा, रूप चांगले वा वाईट असणे हे जसे त्यांच्या हातचे नव्हते, तसेच, आपले नावे काय असावे हेही बारशाचे दिवशी त्यांच्या हातचे नव्हते, पण त्यांच्या आईबापांच्या चुकीसाठी आजन्म अविवाहित राहण्याची शिक्षा मिळणार त्या अनपराधी कन्यकांना! - नोद्वहेत्!!

आणि अशी नावे ठेवण्यात आईबापांची तरी एवढी कोणती मोठी गळा घोटणारी चूक झाली? नावे ते काय आणि शिक्षा कोणची? भिमी नावे असले तर त्याचे भामा करुन टाका! ही साधी सूचना करायची का क्षयी, व्यंगी, चोरटी, हत्यारी कन्यका वरू नये म्हणून सांगणाऱ्या महादोषातच, एखादें चंपी, रोहिणी, गंगा-यमुना प्रभृति नुसते नावे असणे हाही तसाच महादोष समजून ते नावे बदला असा अगदी सोपा उपाय न सांगता, त्या कन्यकेसच 'नोद्वहेत्' म्हणून एकदम धर्माज्ञा सोडायची? मनुस्मृतीच ही काय विवाहव्यवस्था की वैधव्यव्यवस्था?

सनातनी भाष्य आमच्या श्रुतिस्मृतीना
हास्यास्पद करुन सोडते ते असे!

कन्यकांची नावे कशी असावी ही साधी सूचना सहजगत्या सांगणारे हे श्लोक ऐतिहासिक दृष्टीने वाचले असता त्या प्राचीन ग्रंथकाराच्या ललितरुचीविषयी आपणांला कौतुक वाटते, तेच मनुस्मृतीतील शब्द त्रिकालाबाधित, अनुल्लंघ्य, धर्मशास्त्र होय म्हणून सनातनी दृष्टीने वाचू जाता किती हेकट नि भाकड ठरतात हे वरील उलगडयावरून काहीतरी स्पष्ट होईल असे आम्हांस वाटते. जी ह्या श्लोकांची दुर्गति तीच मनुस्मृतीतील शेकडो श्लोकांची हा सनातनी दृष्टीकोन करून सोडतो. त्या प्राचीन नि पूज्य ग्रंथाचे नसते स्तोम माजविण्याचा मूर्खपणा, त्या ग्रंथाचे पदरीही नसता मूर्खपणा बांधून त्यास अगदी हास्यास्पदच नव्हे तर आजच्या प्रगतीसही उपद्रव करुन ठेवतो! यास्तव त्या ग्रंथांची ही हेटाळणी होऊ नये म्हणूनच, त्याची खरी योग्यताही उणी होऊ नये म्हणूनच आणि त्या प्राचीन नि पूज्य धर्मशास्त्रविषयाची आपणांस जी यथायोग्य पूज्यता वाटावयास हवी तीही निष्कारण उणावली जाऊ नये म्हणूनच आम्ही त्या मनुस्मृतीतील तत्कालीन महिला वर्गाची परिस्थिती दाखविणारी वचने ह्या लेखमालेत 'आजही अनुल्लंघ्य असणारे धर्मशास्त्र' म्हणून देत नसून मनुस्मृतीचे काही स्त्रीविषयक दंडक, निर्बंध, भाव आणि भावना अशा असत एवढी नुसती माहिती देण्याच्या बुद्धीनेच काय ती देत आहोत. परंतु ती सर्व केवळ ऐतिहासिक दृष्टीनेच काय ती वाचली जावी हा आमचा अनुरोध (शिफारस) असला तरी ज्या कोणास ती धार्मिक वा भाविक निष्ठेने वाचावयाची असतील त्यांनाही अडचण पडू नये म्हणून आम्ही ते मूळ श्लोकच

अनुक्रमे देऊन त्यापुढे त्यांचा सरळ भावार्थ देऊ. जिथे कुठे त्याविषयी आम्हांस विशेष उल्लेख करावासा वाटेल तिथे तो आमचा म्हणून निराळा देऊ. स्मृतीतील श्लोकांतच तिच्या शब्दाची वा अर्थाची ओढाताण करून तो दडपू पाहणार नाही.

या लेखमालेच्या हेतूचा विपर्यास होऊ नये म्हणून आणि यांतील सर्व श्लोक कोणत्या कसोटीने पारखले जावे ते प्रत्येकी वेगळे सांगत बसण्यापेक्षा कोणत्यातरी दोन तीन श्लोकांस ती कसोटी लावून बाकीच्यांनाही ती तशीच लावावी असा सर्वसामान्य अनुरोध (शिफारस) करण्यानेच काम भागावे म्हणून हा प्रास्ताविक लेखांक लिहिल्यानंतर आता पुढील लेखात स्त्रीवर्गाविषयीचे मनुस्मृतीतील ते अत्यंत उद्‌बोधक नि आकर्षक श्लोक अनुक्रमाने दिले जातील.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

( २ )

पहिल्या लेखांकात ह्या लेखमालेच्या भूमिकेविषयी जे विवेचन केले त्याच्या अनुसंधानापुरता इतका सारांश सांगणे आवश्यक आहे की, आम्ही यापुढे मनुस्मृतीतील जे श्लोक देणार आहोत ते त्रिकालाबाधित किंवा अनुल्लंघ्य नियम म्हणून नसून मनुस्मृतीच्या काळी आपल्या महिलावर्गाची स्थिति कशी होती ह्याचे एक ऐतिहासिक वृत्त म्हणूनच होत. त्या काळी आपल्या समाजात जे नियम नि निर्बंध (कायदे) उचित वाटले, हितकारक वाटले, पण केवळ एवढयासाठी ते आजही उचित वा हितकारक असलेच पाहिजेत असे म्हटल्याने त्यांतील अनेक नियम नि निर्बंध निष्कारण हास्यास्पदतेस तरी पात्र होतात किंवा समाजहानीस तरी कारण होतात, जसेच्या तसे स्वीकारले तर. आणि आजच्या परिस्थितीस हितकारक व्हावा असा त्यांच्यातून अर्थ काढण्याची नसती सक्ती केली तर त्या श्लोकांची कुतरओढ होऊन एकेका श्लोकाचे अर्थ अकरा भाष्यकार करतात अकरा प्रकारचे! मिळून पुन्हा एकवाक्यता होत नाही ती नाहीच. यास्तव हे श्लोक केवळ ऐतिहासिक दृष्टीनेच वाचावे. आजच्या परिस्थितीतही त्यांत किती तरी हितकारक सापडेल. ते हितकारक म्हणून अनुसरावे. अनुल्लंघ्य शास्त्र म्हणून नव्हेच आणि जे आज हानिकारक नि हास्यास्पद वाटेल ते आज अनुसरू नये - पण तेवढयासाठी ही स्मृतीची स्मृति हानिकारक वा हास्यास्पद असली पाहिजे अशी भलतीच समज करुन न घेता, उलट त्या काळच्या ज्या इतर संस्कृतींचे धर्मग्रंथ आज उपलब्ध आहेत त्या बाबिलोन, इजिप्त, ज्यू, ग्रीक, रोमन प्रभृति, प्राचीन थोर थोर धर्मग्रंथाशी नि निर्बंधग्रंथांशी तुलना करता आमची ही प्राचीनतम स्मृति अग्रपूजेच्या मानास सर्वथैव पात्र आहे; आमच्या हिंदुराष्ट्राच्या त्या काळच्या जगास आश्चर्याने थक्क आणि पराक्रमाने कंपित करणाऱ्या उत्तुंग, प्रबळ राजप्रासादाच्या पायाचा तो पूजनीय अवशेष आहे, अशाच सादर ममत्वाने त्या प्राचीन स्मृतीची स्मृति आम्ही सन्मानिली पाहिजे. ही झाली हे श्लोक वाचण्याची आमची ऐतिहासिक दृष्टी.

परंतु जर कोणास ते श्लोक अनुल्लंघ्य, त्रिकालाबाधित धर्मशास्त्र म्हणूनही अभ्यासिणे असेल तर त्यासही त्यांचा तसा अभ्यास करता यावा यास्तव आम्ही मूळचे श्लोक नि त्यांचा भावार्थ कोणतीही मल्लीनाथी मध्येच न घुसडता देणार आहो. आम्हांस जर काही विशेष सुचवावयाचेच तर ते श्लोकाखाली कंसामध्ये वेगळे लिहून सुचवू.

जिला म्हणतात मनुस्मृति ती आहे भृगुस्मृति

आज मनुस्मृति म्हणून जो ग्रंथ आपणांशी आहे तो मनुभगवानांनी रचलेला नसून त्यांनी पूर्वी जे शास्त्र सांगितले त्यांतील भृगुऋषींना जे स्वतःस आठवले ते त्यांनी स्वतःच्या शब्दांत त्या ग्रंथात ग्रंथिले असे प्रथमाध्यायातच स्पष्टपणे सांगितले आहे.

यथेदमुक्तवान्छास्त्रं पुरा पृष्टो मनुर्मया ।
तथेदं यूयमप्यद्य मत्सकाशान्निबोधत ।। ११९ -अध्याय १

प्रत्येक अध्यायाचे शेवटचे वाक्यही असेच आहे की, ‘अति मानवे धर्मशास्त्रे भृगुप्रोक्तायां संहितायां (अमुक) अध्याय:!

अर्थात् प्रस्तुतच्या मनुस्मृतीचे उत्तरदायित्व प्रथमतः आणि प्रत्यक्षपणे भृगुऋषींचे आहे. मनुभगवानांच्या उपदेशांचे भृगऋषींनी काढलेले हे एक संस्करण आहे. भृगुसंहिता हेच नावे ह्या ग्रंथास यथार्थपणे शोभते.

मनुस्मृतीचा काल

प्राचीन ग्रंथ म्हटला- मग आपल्याकडील असो वा इतरांचा असो - त्याच्या कालाचा वाद दत्त म्हणून पुढे उभा राहतोच. आपल्या ह्या लेखाचा त्या वादाशी फारसा संबंध नसल्याने इतके सांगितले म्हणजे पुरे आहे की, आज जी प्रत प्रसिध्द आहे तीतील काही भाग अत्यंत प्राचीन काळातील त्रैवर्णिक आर्यराष्ट्राच्या समाजस्थितीचा निदर्शक आहे आणि एकंदर पुस्तकही काही झाले तरी - प्रक्षिप्त अपवाद वगळून - इसवी सनाच्या पूर्वीची म्हणजे दोन सहस्त्र वर्षापूर्वीच्या जवळपासची समाजस्थिति वर्णिणारे आहे. या एवढया मोठया ग्रंथात रामायण, भारत, वा गीता यांचा उल्लेख सापडणे दुर्घट होते. पण महाभारतादि ग्रंथातून कोण्या प्राचीन मनुस्मृतीचा उल्लेख तरी वारंवार सापडतो, जसे-

‘तेषां धर्मान यथापूर्व मनुः स्वायंभुवो ब्रवीत् ।।

(आदिपर्व अ.९६)

ह्या ठळक वस्तुस्थितीवरुनही हा ग्रंथ, आज आहे असा देखील किती प्राचीन आहे हे दिसून येते. आता मनूतील महिलाविषयक श्लोक अनुक्रमे देऊ.

मुलींची नावे

स्त्रीणां सुखोद्यमक्रूरं विस्पष्टार्थ मनोहरम् ।

मंगल्यं दिर्घवर्णान्तशीर्वादाभिधानवत् । ३३ -अ. २

सुखाने उच्चारता येण्यासारखे, अर्थसूचक, मांगल्यमय, गोड आशीर्वादात्मक असे असून जे अंत्यवर्णी दीर्घ आहे असे नावे मुलीस ठेवावे. (जसे यशोदा, विदुला, सीता, रमा)

स्त्रियांचे संस्कार

अमंत्रिका तु कार्येयं स्त्रीणामावदशेषतः ।

संस्कारार्थ शरीरस्य यथाकालं यथाक्रमम् ।। ६६

वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः।

पतिसेवा गुरौ वासो गृहर्थोग्निपरिक्रिया ।। ६७ -अ. २

स्त्रियांचे जातकर्मादि संस्कार योग्य वेळी यथाक्रम करावे, पण ते मंत्ररहित असावे. विवाह हा तिचा वैदिक संस्कार, पतिसेवा हा गुरुगृहवास, गृहकृत्ये हीच होमादिक अग्निसेवा होय.

स्त्रियांचे अभिवादन

परपत्नी तु या स्त्री स्यादसंबन्धा च योनितः ।

तां ब्रूयाद् भवतीत्येवं सुभगे भगिनीति च ।। १२९

मातृष्वसा मातुलानी श्वश्रूरथा पितृष्वसा ।

संपूज्या गुरूपत्नीवत्समास्ता गुरूभार्यया ।। १३१ -अ.२

परस्त्रीस अभिवादिताना आप्त नसल्यास भवती, सुभगे, भगिनी, असे संबोधावे. मावशी, मामी, सासू, आत्या या गुरूपत्नीप्रमाणेच पूज्य मानाव्या.

गुरूपत्नीशी वर्तणूक

गुरूवत्प्रतिपूज्याः स्युः सवर्णा गुरूयोषितः ।

असवर्णास्तु संपूज्याः प्रत्युत्थानाभिवादनैः ।। २१० -अ.२

गुरूच्या सवर्ण स्त्रियांस गुरूप्रमाणेच मानावे, गुरूच्या असवर्ण पत्नीस उत्थान नि अभिवादन एवढा सन्मान द्यावा.

( या श्लोकावरुन पूर्वी ब्राह्मण गुरूंनाही काही ब्राह्मण पत्नी असूनही काही क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र जातीच्या पत्नीही असू शकत हे स्पष्ट होते. ब्राह्मण गुरूच्या या ब्राह्मणतेर पत्न्या धर्माविरुध्द अविवाहित संबंधाच्या केवळ प्रीतिपात्रे म्हणून उल्लेखिलेल्या नसून त्या धर्मानुकूल विवाहाच्या धर्मपत्न्याच असत. त्यांची संततिही विवाहित संततीप्रमाणेच गृहात एकत्र वाढे. ब्राह्मणांचे ब्राह्मणेतर भार्यापासून झालेले संतान एका काली ब्राह्मणच समजले जाई आणि त्याचप्रमाणे यथाक्रमे क्षत्रिय-वैश्यांचीही व्यवस्था होती, हे पुढे अनुलोमविवाहविषयक श्लोकांत स्पष्ट होईलच )

अभ्यञ्जनं स्नापनं च गात्रोत्सादनमेव च ।

गुरूपत्न्या न कार्याणि केशानां च प्रसाधनम्।।२११

गुरूपत्नी तु युवतिर्नाभिवाद्येह पादयोः ।

पूर्णविंशतिवर्षेण गुणदोषौ विजानता ।। २१२ -अ. २

(परंतु) गुरूपत्नीला न्हाऊ घालणे, तेल मर्दिणे, हातपाय रगडणे, वेणीफणी करणे अशी सेवा करू नये. गुरूपत्नी युवती असेल तर तरूण शिष्याने तिच्या पायाला स्पर्शून नमस्कारू नये. (परंतु पुढे २१७ व्या श्लोकात ती प्रवासाहून आली असता पादस्पर्शपूर्वक वंदावे असा पुन्हा साधारण विधि सांगितला आहे.) या मर्यादेचे कारण असे की,

स्वभाव एष नारीणां नराणासिह दूषणम ।

अतोर्थान्न प्रमाद्यन्ति प्रमदासु विपश्चितः ।। २१३

अविद्वांसमलं लोके विद्वांसमपि वा पुनः ।

प्रमदा ह्युत्पथं नेतुं कामक्रोधवशानुगम ।। २१४

मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा नाविविक्तासनो भवेत् ।

बलवानिदिंरयाग्रामो विद्वांसमपिकर्षति ।। २१५ -अ. २

(कारण की) नारींचा स्वभावच पुरुषांना दोषप्रवण करण्याचा असल्याने बुध्दीवान पुरुषाने प्रमदांच्या मोहात न फसण्याची फार काळजी घेतली पाहिजे. तरुणी ह्या अविद्वानालाच काय, पण विद्वानाला देखील कामक्रोधांच्या अनुषंगे उत्पथाकडे सहज नेऊ शकतात. (इतरांची तर गोष्टच नको, पण ) आई, भगिनी वा स्वतःची मुलगी असली तरी तिच्याशी एकान्तात असू नये; कारण इंद्रियांचा प्रबळ आवेग विद्वानाला देखील खेचून नेतो.

मातेची योग्यता

यं मातापितरौ क्लेशं सहेते संभवे नृणाम् ।
न तस्य निष्कृतिः शक्या कर्तुं वर्षशतैरपि ।। २२७
त एव हि त्रयो लोकास्त एव त्रय आश्रमाः ।
त एव हि त्रयो वेदास्त एवोक्तास्त्रयो ग्नयः।। २३०
यावत्त्रयस्ते जीवेयुस्तावन्नान्यं समाचरेत् ।
तेष्वेव नित्यं शुश्रूषां कुर्यात्प्रियहिते रतः ।। २३५
त्रिष्वेतेष्वितिकृत्यं हि पुरुषस्य समाप्यते ।
एष धर्मः परः साक्षादुपधर्मो न्य उच्यते ।। २३७ - अ. २

आपल्यास जन्म देताना जे कष्ट मातापितरांना होतात त्यांची शतवर्षातही फेड होणार नाही. गुरु, माता, पिता हे तीन वेद, आश्रम, अग्नि, होत. त्यांच्या जन्मभर त्यांचीच शुश्रूषा अनन्यभावे करावी. तीच अतिकर्तव्यता. हा धर्म साक्षात नि श्रेष्ठ आहे, बाकी सारे उपधर्म.

स्त्रीरत्नं दुष्कुलादपि -

श्रद्दध्दानः शुभां विद्यामाददीतावरादपि ।
अन्त्यादपि परं धर्मं स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ।। २३८
स्त्रियो रत्नान्यथो विद्या धर्मः शौचं सुभाषितम् ।
विविधानि च शिल्पानि समादेयानि सर्वतः ।। २४० - अ.२

कनिष्ठ जातीपासूनही विद्या, चंडालापासूनही मोक्षधर्म, सुभाषित, रत्नें आणि स्त्रिया दुष्कुलातही सापडल्यास त्यांचे ग्रहण हवे तेथून करावे.

विवाह विचार

असपिण्डाच या मातुरसगोत्रा च या पितुः ।
सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुन ।। ५
हीनक्रियं निष्फुषं निश्छंदोरोमशार्शसम् ।
क्षय्यामयाव्यपस्मारिश्वित्रिकुष्ठिकुलानि च।। ७
नोद्वहेत् कपिलां कन्यां नाधिकाङ्गी च रोगिणीम्।
नालोमिकां नातिलोमां न वाचाटां न पिङ्गलाम्।।८
नर्क्षवृक्षनदीनाम्नीं नान्त्यपर्वतनामिकाम्।
न पक्ष्यहिप्रेष्यनाम्नीं न च भीषणनामिकाम् ।। ९
अव्यङ्गांगी सौम्यनाम्नी हंसवारणगामिनीम्।
तनुलोमकेशदशनां मृद्वङ्गीमुद्वहेत् स्त्रियम्।। १० -अ. ३

मातेच्या नि पित्याच्या सपिंडातील नि सगोत्रातील कन्या वर्जून विवाह करणे द्विजातींना प्रशस्त आहे. संस्कारहीन, केवळ स्त्रियांचीच संतति होणाऱ्या, वेदाध्ययनशून्य, केसाळ, मूळव्याध, क्षय,

अग्निमांद्य, अपस्मार, कोड या रोगांनी ग्रस्त अशा कुळातली, पिंगट केसांची, अधिक अवयवांची, रोगी, केशशून्य, वा केसाळ, बडबडी, पिवळ्या डोळयांची, त्याचप्रमाणे नक्षत्र, वृक्ष, नदी, पर्वत, सर्प, सेवक, अत्यंजादि अर्थ सुचविणारे किंवा भीषण असणारे जिचे नावे आहे, अशा मुलीशी विवाह करु नये.

भिन्नवर्णीय विवाह

(वधूवरांचा एकच वर्ण असला पाहिजे अशी अट नव्हती.)

सवर्णाग्रे द्विजातीनां प्रशस्ता दारकर्मणि।
कामस्तस्तु प्रवृत्तानामिमाः स्युः क्रमशा वराः।।१२
शूद्रैव भार्या शूद्रस्य सा च स्वा च विशः स्मृते।
ते च स्वा चैव राज्ञश्च ताश्च स्वाचाग्रजन्मनः।।१३
पाणिग्रहणसंस्कारः सवर्णासूपदिश्यते।
असवर्णास्वयं ज्ञेयो विधिरुद्वाहकर्मणि।।४३
शरः क्षत्रियया ग्राह्यः प्रतोदो वैश्यकन्यया।
वसनस्य दशा ग्राह्या शूद्रयोत्कृष्टवेदने।।४४ -अ. ३

प्रथमविवाह ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्याने सवर्ण स्त्रीशी करणे प्रशस्त. पुढे इच्छा असल्यास इतरवर्णीय स्त्रीशीही खालीलप्रमाणे विवाह करावा. शूद्राने केवळ शूद्रिणीशीच विवाह करावा. वैश्याने वैश्य आणि शूद्री अशा दोन्ही वर्णांच्या स्त्रीला विवाहावे. क्षत्रियाने क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अशा तिन्ही वर्णांच्या स्त्रियांशी विवाहण्यास हरकत नाही. आणि ब्राह्मणांना तर ब्राह्मणीप्रमाणेच क्षत्रिय, वैश्य, शूद्र, या वर्णांच्या स्त्रियांना विवाह करता येतो. सवर्णविवाही (म्हणजे ब्राह्मणाचा ब्राह्मणाशी इ.) वधूने वराचे पाणिग्रहण करावे, असवर्ण विवाहात (म्हणजे ब्राह्मण वर नि क्षत्रिय, वैश्य, वा शूद्र वधू इ.) क्षत्रिय वधूने वराच्या बाणास, वैश्य वधूने क्षत्रिय वा ब्राह्मण वराच्या हातच्या चाबकाच्या बाजूस आणि शूद्र कन्येने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य वराच्या अंगावरील वस्त्राच्या दशेस धरुन विवाहसंस्कार पूर्णवावा. ( या स्मृतीतील हे त्रैवर्णिकांनी आपसांत आणि शूद्रांसह असवर्ण विवाह धर्मसंस्कारपूर्वक करण्यास हरकत नाही म्हणून सांगणारे श्लोक वैदिक काळाच्या आगेमागे आपल्या राष्ट्राची कौटुंबिक परिस्थिति चित्रिणारे अतएव पुष्कळच प्राचीन असले पाहिजेत. ब्राह्मणाच्या घरी ब्राह्मण स्त्रीसहच शूद्र पत्नीही एकाच पत्नीच्या धर्म्य अधिकाराने नांदे. ब्राह्मणाने वा क्षत्रियवैश्याने शूद्र स्त्रीशी 'संबंध' ठेवावा इतकाच याचा अर्थ नसून या असवर्ण स्त्रिया ब्राह्मणादिकांच्या घरी 'रखेल्या' म्हणूनच नांदत असे नसून त्या धर्मपत्नी म्हणून वैदिक धर्मसंस्कारांनी वरलेल्या विवाहित भार्या म्हणूनच नांदत. ही गोष्ट त्यांच्या विवाहसंस्कारांची पाणिग्रहण, शरग्रहणप्रभृति जी शेवटच्या श्लोकात फोड करुन सांगितली आहे तीवरुन निर्विवादपणे दिसून येते. इतकेच नव्हे तर त्या काळी ब्राह्मणांस वा क्षत्रियांस वैश्यशूद्र स्त्रीपासून झालेली मुले ही ब्राह्मण वा क्षत्रिय वर्णातच म्हणजे पित्याच्या वर्णातच मोडत हे पुढे पितृसावर्ण्य स्थापणारे जे श्लोक एका प्रकरणात येणार आहेत त्यावरुन स्पष्टिले जाईलच. ब्राह्मणाच्या एकाच घरात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चारही वर्णाच्या स्त्रिया भार्या या नात्याने एकत्रच बसत, उठत, जेवीत, वेण्याफण्या करीत नि त्यांची मुले सारी

ब्राह्मण म्हणूनच ब्राह्मणांचे अधिकार समतेने भोगीत. ब्राह्मणांस ब्राह्मण स्त्रियांपासून झालेल्या मुलांसहच शूद्र स्त्रियांपासून झालेली मुलेही एकाच बोहोल्यावर उपयनिली जात; त्यांची मुंज एकत्र वेदोक्त मंत्रांनी होई; एकाच वेदशाळेत ती एकवर्णीय म्हणून वेद पठत. ब्राह्मणाची सख्खी नसली तरी सावत्र मावशी, मामी, आई, भगिनी शूद्र कुटुंबातही असे. ब्राह्मणांची आजोळे शूद्रांच्याही घरी असत. तीच स्थिति क्षत्रिय वैश्यांची. अडचण काय ती शूद्राला असे. शूद्र आपली मुलगी ब्राह्मणाला देऊन त्याचा अगदी वेदोक्त सासरा होऊ शके. शूद्र आपली बहीण ब्राह्मणास वा वैश्यास देऊन त्याचा सख्खा मेहुणा होऊ शके. पण ब्राह्मणास मात्र आपल्या सासरेपणाचा मान देऊ शकत नसे. ब्राह्मणाच्या घरी दिलेल्या शूद्र महिलेची आई-त्या ब्राह्मणाची सासू म्हणून स्वागतिली जाई; त्या शूद्र महिलेला 'आजी आली!' म्हणून ब्राह्मणांची मुले लडिवाळपणे धावत कवटाळू शकत. शूद्रिणीचा नातू ब्राह्मण असे; क्षत्रिय असे, वैश्य असे. तीच उलटापालट, रक्तमिश्रण क्षत्रिय वैश्यांच्याही कुटुंबातून चालू असे. आज कोकणस्थ ब्राह्मणाची आजी वा मामा देशस्थ ब्राह्मण असणेही जिथे दुर्घट, आचारबाह्य आहे, तेथे वरील वस्तुस्थिति कितीही विलक्षण वाटली, तरी 'सनातन' पक्षीय बंधूंनाही ती एका काळी तशीच होती हे नाकारणे शक्य नाही. कारण मनुस्मृतीतले अक्षर अन अक्षर त्रिकालाबाधित सत्य आहे, हे त्यांचेच ब्रीद आहे - सुधारकांचे नव्हे! मनूचे हे श्लोक जातपाततोडक सुधारक या नात्याने होणाऱ्या सुधारणांचा उपदेश म्हणून त्याने लिहिलेले नाहीत; तर ते त्या काळच्या प्रचलित समाजस्थितीस नियंत्रिणारे नि वर्णिणारे 'निर्बंध' आहेत; त्या काळच्या वैदिक नि पौराणिक इतिहासादि कथांतून ही समाजस्थिति अशीच असल्याचे प्रत्यंतरही मिळते. अनुलोम विवाह नि पितृसावर्ण्य ह्या जोड निर्बंधामुळे त्या काळात एकाच ब्राह्मणाचा मामा क्षत्रिय, मामी वैश्य, मामेभाऊ शूद्र आणि आई शूद्राणी असू शके! तीच स्थिति क्षत्रिय वैश्यांची. अर्थात् अनुलोमेकरून का होईना, पण चातुर्वर्ण्याचे रक्त वरपासून खालपर्यंत प्रत्येकाच्या नसानसांतून संतत प्रवाहत जाऊन सर्व राष्ट्र रक्तसंबंधांचे आप्तपणे एकजीव झालेले, अत्यंत जिव्हाळयाच्या सख्ख्या बंधुभगिनींच्या नात्यागोत्यांनी एकहृदय झालेले होते. जिथे विवाहही धर्म्य, नैर्बंधिक होते, तिथे शूद्र, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण पत्नींची मुले-मुली ब्राह्मणच समजली जात. एकाच पाळण्यात भावंडे म्हणून तिथे त्या कुटुंबात, त्या वर्णात 'रोटीबंदीचा'प्रश्नही काढण्याची सोय नव्हती हे काही सांगावयास नको. जिथे शूद्र पत्नीचा पुत्र ब्राह्मणच होई, तिथे तिच्या वा त्याच्या हातचे पाणी पिण्याने वा भात खाण्याने जात जाणे शक्यच नव्हते! मनुस्मृतीचे हे श्लोक तरी जातपातरक्षक वर्णाश्रमी सनातन्यांच्या जातीचे नसून जातपाततोडक बेटीबंदी नि रोटीबंदी न मानणाऱ्या सुधारकांसच त्यातल्या त्यात जवळ करणारे आहेत. मनु भगवान ह्या श्लोकापुरते तरी 'वर्णाश्रमी रोटीबंद नि बेटीबंद' मंडळाचे सदस्य होण्याचा संभव नसून 'जातपात तोडक ' मंडळाच्या पटावरच आपले नावे नोंदवितीलसे दिसते. अर्थात् मनु भगवानांचे हे श्लोक असे वर्ण विवाहास अनुकूल आहेत म्हणूनच काही सुधारक रोटीबंदी नि बेटीबंदीच्या आजच्या बोकाळलेल्या बेडया तोडतात असे नसून हेही श्लोक उलट असते तरीही त्यांनी आज त्या हानीकारक आहेत असे पाहताच तत्काळ तोडून टाकल्याच असत्या!

आणि आता तोच आश्चर्यकारक 'दृश्यपालट' (ट्रॅन्स्फरसीन!) वाचकांस खालील श्लोकात अकस्मात पाहण्यास मिळतो आहे! ब्राह्मणाने शूद्रा भार्या करण्यास हरकत नाही म्हणून स्पष्ट सांगून विवाहाचा धर्मसंस्कार कसा असावा हेही वर्णिले असता हे खालील श्लोक अगदी लागोपाठ आणि अधेमधेच कसे दांडगाई करीत घुसत आहेत पाहा! )

न ब्राह्मणक्षत्रिययोरापद्यपि हि तिष्ठतोः ।
कस्मिंश्चिदपि वृत्तान्ते शूद्रा भार्योपदिश्यते।। १४
शूद्रां शयनमारोप्य ब्राह्मणो यात्यधोगतिम् ।
जनयित्वा सुतं तस्यां ब्राह्मण्यादेव हीयते ।। १७
वृषलीफेनपीतस्य निःश्वासोपहतस्य च ।
तस्यां चैव प्रसूतस्य निष्कृतिर्न विधीयते ।। १९ - अ. ३

कोणत्याही ब्राह्मण क्षत्रियाने अगदी वाटेल ते झाले तरी शूद्र स्त्रीशी केव्हाही विवाह लावू नये असेच सर्व शास्त्रे सांगतात! शूद्रा स्त्रीशी शयन करताच ब्राह्मण अधोगतीला जातो; तिच्या ठिकाणी पुत्र उत्पादिता ब्राह्मण्यासच मुकतो. फार काय, शूद्राणीशी संभोग तर राहोच; पण तिच्या अधराचे चुंबन घेण्याने नव्हे, तिचा श्वास अंगावर पडेल इतक्या जवळ जाण्यानेही ब्राह्मण पतित होतो. तिच्या ठिकाणी सुत उत्पादिण्याने लागणारे पाप तर इतके भयंकर असते, की त्याला प्रायश्चित देखील नाही!

(आता हे परस्परविरुध्द निर्बंध एकाच काळचे, समान अधिकाराचे, एकाच लेखकाने संमतिलेले नि ग्रंथिलेले असणे हे किती अविश्वसनीय आहे हे काही सांगावयास पाहिजे असे नाही. इच्छा असल्यास शूद्राणीशी लग्न कर; त्यांस धर्माची हरकत नाही, इतकेच नव्हे, तर तिच्यापासून झालेल्या तुझ्या मुलांस ब्राह्मणच समजले जाईल असे लेखी वचन देऊन पहिल्या श्लोकाचा मंत्र उच्चारुन त्या आधारावर तसे लग्न लावून टाकलेल्यास लगेच दुसऱ्या श्लोकाने सांगणे की, वाटेल ते झाले तरी शूद्र स्त्रीशी लग्न केलेस - आता तू नि तुझी संतति पतित होऊन तुझें देखील ब्राह्मण्य नष्ट झाले! - हे कृत्य करणारा धर्माध्यक्ष वा धर्मकार तर काय, पण असे नुसते लिहिणारा ग्रंथकारही निव्वळ भ्रमिष्टच असला पाहिजे, नव्हे काय? अर्थात् या ग्रंथाच्या पूज्य लेखकास भ्रमिष्ट म्हणण्याचे पातक ज्यास करवत नाही ते आमच्यासारखे ऐतिहासिक दृष्टीनेच हा ग्रंथ वाचणारे लोक असेच समजणार की, ह्या श्लोकांपैकी बहुधा प्रत्येक श्लोक विभिन्न काळी भिन्नभिन्न आचार्यांनी रचून या ग्रंथात त्या प्रकरणात गोवून म्हणा, घुसडून म्हणा, पण प्रक्षेपिलेला आहे.

भूगर्भात खणताना एकेका संस्कृतीच्या रचनेची नगरे एकाखालच्या एकेका थरात जशी दबलेली सापडतात तसेच भूतकाळच्या गर्भात खचून एकावर एक चढलेले भिन्न काळच्या भिन्न समाजस्थितीचे थर म्हणजे एकेक श्लोक होत. त्या थरांची परंपरा थोडक्यात अशी -

(१) प्राचीनतम काळी आर्य त्रैवर्णिक स्त्रीरत्नें 'समादेयानि सर्वशः' सापडेल तेथून स्वीकारावी; ते धर्माविरुध्द नाही असे समजत. त्रैवर्णिकांस शूद्र स्त्रीशी विवाह अगदी धर्म्य समजला जाई, इतकेच नव्हे, तर शूद्र धर्मपत्नीचे संतान पित्याच्या वरिष्ठ वर्णाचे म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय वा वैश्यच गणले जाई.

त्यामुळे ब्राह्मणांदिकात शूद्रादिकांचे रक्त सारखे मिसळत गेले. आजच्या ब्राह्मणांत कित्येक कुळांत या शंभराव्या पिढीतील आया शूद्राणीही असल्या पाहिजेत. अर्थात् आजचे चातुर्वर्णीय हिंदुराष्ट्र एका रक्तबीजांचीच संमिश्र संतती आहे - अगदी रक्तसंबंधाने निगडित अशी एकच जात आहे.

(२) पण त्या पूर्वकाळी शूद्र हे रंगाने काळे, रूपाने ढोबळ, बुद्धीने मंद असल्याने त्यांची ती हीनता मातेच्या बाजूने तरी आर्यांत मिसळून आर्यांचा त्या वेळचा श्वेततर रंग आदि गुण बिघडतात असे पाहून ते न आवडणारा एक पक्ष प्रबळ होत गेला. त्याने अनुलोम विवाहही घातक आहेत असे ठरवून अशा विवाहापासून झालेली संतति वरच्या पित्याच्या वर्णात न ढकलता खालच्या मातेच्या वर्णात ढकलावी असे ठरविले. हेच मातृसावर्ण्य. म्हणजे पूर्वी शूद्रा भार्येपासून ब्राह्मणास झालेला पुत्र ब्राह्मणच ठरे; तो ह्या पुढच्या काळी शूद्र ठरू लागला. तीच गोष्ट इतर वर्णीय विवाहांची!

(३) पुढे तीच वर्णशुद्धतेच्या रक्षणाची प्रवृति जास्तच मळमळया स्वभावाची होऊन आर्यांनी शूद्रा स्त्रीशी विवाहच करु नये; ब्राह्मणांनी तर तिचा श्वास लागेल इतकेही तिच्याजवळ जाऊ नये असा कडक निर्बंध चालू झाला आणि हळूहळू त्याच न्यायाने ब्राह्मणाचा क्षत्रियादिकांशीही विवाह प्रथम अप्रशस्त नि नंतर धर्मबाह्य ठरत चालला. तोच निर्बंध इतर वर्णांनाही लागू पडत केवळ निर्भेळ सवर्ण विवाहच (म्हणजे ब्राह्मणांचे ब्राह्मणांशीच इत्यादि ) चालू झाले; धर्म्य ठरले. त्यात ब्राह्मणादि वर्णांत देशस्थ, कोकणस्थ, बंगाली, पंजाबी, शैव, वैष्णव प्रभृति अनेक उपजातींची भर पडताच त्या एकाच वर्णाच्या उपजातीतही विवाह निषिद्ध ठरले आणि हा आजचा नऊ पुरभय्ये नि दहा चुलींचा हास्यास्पद बाष्कळपणा माजला!

या प्रत्येक पायरीवर समाज चढताच त्या त्या काळचा निर्बंध त्या त्या धर्मकारांनीच अनुष्टुपात गोवून ह्या मनुस्मृतीत घुसडून ठेवला. पण पहिले विरुद्धार्थी श्लोक न गाळता! कारण ते गाळणे दुर्घट होते; त्यात भर टाकणे ग्रंथाच्या निरनिराळया प्रतींच्या उतार्‍यांच्या वेळी अधिक सोपे जाई. त्या प्रत्येक नवीन अनुष्टुप रचणार्‍याने त्याच्या काळच्या परिस्थितीत ते अनुष्टुप लोकहिताचे समजून रचले. कारण उदाहरणार्थ, ब्राह्मणांना पूर्वी वाटेल त्या वर्णाची स्त्री स्वीकारण्याचा असलेला अधिकार त्यांना ह्या नव्या निर्बंधाप्रमाणे सोडावाच लागला. त्यांच्या उपभोगाच्या आणि सुखाच्या कक्षेस आळाच बसला. त्यांनी आपणांवर संयमाचा हा सर्वात अधिक भार जो लादून घेतला तो त्यांचा प्रामाणिक त्यागच वर्णशुद्धीच्या ध्येयार्थ होता. त्यांना योग्य वाटले ते त्या त्या काळच्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यांनी केले. त्यांचा प्रश्न त्यांनी त्यांना परवडला तसा सोडवला.

चुकले ते त्यांचे नव्हे, तर त्यांच्या ह्या तात्पुरत्या भिन्न आणि परस्परविरुध्द निर्बंधास सुसंगत नि त्रिकालाबाधित मानून एकाच ग्रंथकाराच्या नांवावर एकाच ग्रंथात दडपून देणार्‍या ‘श्रुतिस्मृतिपुराणोक्त’ सनातनी प्रवृत्तीचे होय. मनुस्मृतीतील शब्दन शब्द आजही मान्य असलाच पाहिजे नि ती अगदी सुसंगत श्लोकांनीच भरली आहे; एकाच मनूने लिहिली आहे असे मानणारे ‘सनातनी’ हे विसरतात की, त्या ग्रंथास असे सुसंगत ठरविण्यासाठी तो एकाच ग्रंथकाराने लिहिला असे म्हणताच तो लिहिणारा मात्र भ्रमिष्ट ठरतो! ग्रंथाचा मान वाढविण्याच्या धांदलीत ग्रंथकारासच मूर्खात ओढले जात आहे याचे त्यांस भान राहत नाही!

पण ऐतिहासिक दृष्टीने ही सारी आपत्ति टळते. हे श्लोक एका ग्रंथकाराचे वा एका काळचे नसून ते भिन्नभिन्न काळचे निर्बंध कोणीतरी पुढे संकलित करून ह्या 'संग्रहा'त गोविले. तो प्रत्येक श्लोक परस्परविरूध्द असला तरी एकेका काळच्या इतिहासाचे पान आहे आणि ते सारे एकत्र ओळीने वाचले, की ह्या 'वर्ण नि विवाह' विषयाचा क्रमवार विकास नि इतिहास आपल्यापुढे चित्रपटासारखा आकर्षक सुसंगतीने उभा राहतो.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक

( ३ )

गेल्या लेखांकात ब्राह्मणादिकांनी शूद्रा स्त्रीशीही लाविलेले अनुलोम विवाह धर्म्य आणि रूढ असत हे सांगणाऱ्या श्लोकापर्यंत अनुक्रम आलेला होता.

विवाहविधि - प्रसिद्ध असलेले ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस नि पैशाच हे आठ प्रकार नि त्यांची लक्षणे सांगितली आहेत. पैकी -

षडानुपूर्व्या विप्रस्य क्षत्रस्य चतुरो ऽ वरान ।

विट्शूद्रयोस्तु तानेव विद्याद्धर्म्यानराक्षसान ।। २३ -अ.३

पहिले सहा प्रकार ब्राह्मणांना, शेवटचे चार क्षत्रियांना, आणि आसुर, गांधर्व पैशाच हे वैश्यशूद्रास धर्म्य आहेत. (अर्थात् प्रत्येकाचे विशिष्ट प्रकार सोडले तरी चारी वर्णांना आसुर आणि गांधर्व हे दोन प्रकारचे विवाह धर्म्य आहेत हे स्पष्ट होते. पैकी कन्येला किंवा तिच्या आप्तेष्टांना धन देऊन तिला वरणे हा आसुर विवाह, आणि गांधर्वाचे लक्षण सांगितले आहे ते असे)-

इच्छयान्योन्यसंयोगः कन्यायाश्च वरस्य च ।

गांधर्वः स तु विज्ञेयो मैथुन्यः कामसंभवः ।।३२

-अ. ३

परस्परांच्याच अनुमतीने किंवा परस्परांचा कामसंभोग झाल्यानंतरही कन्या नि वर हे दोघे स्वतःच विवाहात एकमेकास वरतात तो सहवासोत्तरच नव्हे, तर संभोगोत्तर विवाहही गांधर्वविवाह होय. तो ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत सर्व वर्णांस वैध नि धर्म्य म्हणून सांगितला आहे आणि पैशाच विवाह ज्यात सुप्त, मत्त, बेशुद्ध कन्येचा भोग बळाने घेतला जातो तो प्रकार अधम होय.

स पापिष्ठो विवाहानां पैशाचश्चाष्टमोऽधमः।।३४ -अ. ३

ऋतुकालविचार - रजोदर्शनानंतर सोळा दिवसपर्यंत स्त्रियांचा ऋतुकाळ मानला आहे. पहिले चार स्पर्शास अनुचित. अकरावी नि तेरावी रात्रही समागमास निषिद्ध. शेषरात्री उक्त.

ऋतुः स्वाभाविकः स्त्रीणां रात्रयः षोडश स्मृताः।

चतुर्भिरितरैः सार्धमहोभिः सद्विगर्हितैः ।। ४६ इ. पैकी -

युग्मासु पुत्रा जायन्ते स्त्रियो युग्मासु रात्रिषु।। ४८ -अ.३

सहाव्या, आठव्या, दहाव्या अशा समसंख्याक रात्री समागम झाला तर पुत्र; विषमसंख्याक रात्री कन्या दुसरे कारण -

पुमान्पुंसो धिके शुक्रे स्त्री भवत्यधिके स्त्रियाः ।

समे ऽ पुमान्पुंस्त्रियौ वा क्षीणे ल्पे च विपर्ययः ।।४९ -अ. ३

पुरूषवीर्य अधिक असल्यास पुत्र होतो; स्त्रीवीर्य अधिक असल्यास कन्या; समवीर्य असल्यास नपुसंक वा एक मुलगा नि एक मुलगी असे जुळे होते; सत्वरहित वीर्याने गर्भच राहत नाही. ( जर गर्भविज्ञानाच्या प्रगतीमुळे याविषयीची ही मते खोटी ठरली तर 'यन्मनुरवदत् तद्भेषजं' या सूत्रान्वये मनुस्मृतीत आहेत तीच मते प्रयोगान्ती खोटी ठरली तरी खरी मानायची का? 'वचनात्प्रवृत्ति'च्या

शब्दनिष्ठ परंपरेने ती खोटी पडली तरी खरींच मानावी लागणार! ग्रहणांचे कारण राहू-केतूचे युद्ध हे नाही हे प्रयोगसिद्ध झाल्यावरही जसे अजून 'दे दान! सुटे गिऱ्हाण!' हे चालू आहेच आपले! परंतु अद्यतन - अप-टु-डेट - प्रवृत्तीच्या आम्हा मंडळींस ही दांभिक अडचण पडत नाही. मनुस्मृतीच्या काळच्या ज्ञानानुरुप त्यांनी सुचले ते सिद्धान्त लिहिले. दोन हजार वर्षात मनुष्याचा अनुभव वाढून प्रयोगान्ती अधिक तथ्य नियम सापडताच ते स्वीकारून पूर्वीची चुकीची मते सोडून देणे हेच प्रगतचे लक्षण. पूर्वजांच्या ज्ञानात भर टाकणे हाच पूर्वजांनाही इष्ट वाटेल असा पूर्वजांचा खरा अभिमान होय. ह्या अद्ययावत्पणातच हिंदु राष्ट्राचे खरे कल्याण साधून जगाच्या पुढे दोन पावले जाण्याची धमक त्यात उत्पन्न होऊ शकणारी आहे. पण मनूस त्रिकालाबाधित मानण्याच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृत्तीने दोन हजार वर्षापूर्वीच्या विज्ञानाच्या मागासलेल्या स्थितीतून आपले पाऊल पुढे पडण्याची शक्यताच खुंटते.

गृहिणीची योग्यता - यापुढे सात आठ श्लोकांत नारीची योग्यता सुरसपणे वर्णिलेली आहे. उदाहरणार्थ, खालील श्लोक पहा -

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ।। ५५
यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैस्तास्तु न पूजन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः।। ५६
संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम्।।६०
यदि हि स्त्री न रोचेत पुमांसं न प्रमोदयेत् ।
अप्रमोदात्पुः पुंसः प्रजनं न प्रवर्तते ।। ६१ -अ. ३

पित्याने, भावाने, पतीने, दिराने स्त्रियांना आदरावे, अलंकारावे. ज्या कुलात नारी पूजनीय मानल्या जातात त्यांत देवताही रमतात. ज्यांत नारी पूज्य नाहीत त्यात सर्व धर्मक्रिया निष्फळ होतात.पतिपत्नी परस्परांस संतोषवितात त्या कुलाचे कल्याण होते. पतिपत्नी परस्पर प्रमुदित असतील तर संततिही प्रसन्न असते. अप्रमुदित असतील तर संतति होतच नाही.

श्राद्धदिवस आणि मांसाशन - ( या स्मृतीवरून हे निर्विवादपणे दिसून येते की, ब्राह्मणांसुध्दा सर्व वर्ण मांस नि मत्स्य पूर्वी खात असत. त्यांत धर्माविरूध्द आचारण समजले जात नसे. मांस नि मासे खाणे हे धर्माविरूध्द नसे; इतकेच नव्हे तर यज्ञ, श्राद्धप्रभृति हव्यकव्यप्रसंगी तर मासांचे नि मत्स्याचे भोजन हे ब्राह्मणांनीही केलेच पाहिजे असा धर्म होता! आज आपल्या द्राविड ब्राह्मणांच्या स्त्रियांस हे वाचून मोठा धक्का बसेल. परंतु अजूनी अनेक जातींच्या ब्राह्मणांत मांस, बंगालीप्रभृति ब्राह्मणांत मासे प्रत्यही खातातच. केवळ मनुस्मृतीत आहे तोच धर्म मानावयाचा असेल तर मांस नि मासे खाण्यास अगदी जातिबहिष्कार्य असा महान अधर्म समजणारे आजचे ब्राह्मणच 'सनातन' धर्माच्या अगदी उलट वागणारे पाखंड लोक ठरत असून मांस नि मासे खाणारे सारस्वतप्रभृति ब्राह्मणच खरे पंक्तिपावन सनातनी ब्राह्मण ठरतात. मनुस्मृतीच्या काळी ब्राह्मण महिलांनाही नुसते भातवरण करता येऊन कसे भागत नसे;

प्रत्येक सदाचारी ब्राह्मण स्त्रीला बकऱ्याची सागुती, पक्ष्यांची आमटी आणि मासोळीचे नाना प्रकार असणारा स्वयंपाक कसा करावा लागे त्याची थोडी कल्पना येण्यासाठी श्राद्धविधिविषयक काही श्लोक खाली देत आहो ) -

भक्ष्यं भोज्यं च विविधं मूलानि च फलानि च ।
हृद्यानि चैव मांसानि पानानि सुरभीणि च ।। २२७
हविर्यच्चिररात्राय यच्चानन्त्याय कल्प्यते ।
पितृभ्यो विधिवद्दतं तत्प्रवक्ष्याम्यशेषतः ।। २६६
द्वौ मासौ मत्स्यमांसेन त्रीन्मासान्हारिणेन तु ।
औरभ्रेणाथ चतुरः शाकुनेनाथ पंच वै ।। २६८
षण्मासांश्छागमांसेन पार्षतेन च सप्त वै ।
अष्टावेणस्य मांसेन रौरवेण नवैव तु ।। २६९
दश मासांस्तु तृप्यन्ति वराहमहिषामिषैः ।
शशकूर्मयोस्तु मांसेन मासानेकादशैव तु ।। २७०
कालशाकं महाशल्काः खड्गलोहामिषं मधु।
आनन्त्यायैव कल्प्यन्त मुन्यन्नानिच सर्वशः।। २७२ -अ. ३

(श्राद्धसमयी ब्राह्मणांस्तव) नाना प्रकारची फळे, मुळे, रुचिर अशी नाना प्रकारची मांसे नि पानद्रव्यें (वाढावीं). पितरांना कोणचे पदार्थ अर्पिले असता किती दिवस तृप्ति होते ते कोष्टक असे - मत्स्यमांसाने दोन महिने, हरिणमांस दिल्यास तीन महिने, अजमांसाने चार, पक्षिमांसाने पाच, बकरा-चित्र-मृग-एणमृग, रुरूमृग यांनी अनुक्रमे सहा ते नऊ महिनेपर्यंत तृप्ति होते. रानडुकराच्या मांसाने नि रानरेडयाच्या मांसाने पितर दहा महिने तृप्त होतात; ससा नि कासव यांनी अकरा महिने; काळया भाज्या, महाशलक मत्स्य, तांबडा बकरा, गेंडा यांच्या मांसाने, मधाने, अनंत काळ पितरांची तृप्ति होते!!

( त्या वेळेच्या ब्राह्मण स्त्रियांनादेखील मासे नि मांसे यांची किती प्रकारची पक्वान्ने करता येत असतील आणि आज श्राद्धाच्या दिवशी नाना भाज्यापाल्यांना चिरताचिरता सैंपाकघर जसे गजबजून जाते, तसे त्या काळी ब्राह्मणांच्या सैंपाकघरात मासे नि मांस चिरून धुऊन साफसूफ करताना आमच्या सोंवळ्या माता-भगिनी किती गर्क होत असतील ते चित्र डोळयांपुढे उभे राहते. जर मनूचा प्रत्येक शब्द त्रिकालाबाधित धर्म मानायचा असेल तर या प्रकरणी तरी सुधारकांहून ब्राह्मण सनातनीच अत्यंत धर्मध्वंसी नि अपराधी ठरणारे आहेत! वरील मांस नि मासे यांच्या केलेल्या नाना ‘रुचकर ’ पदार्थांची चटक नुसत्या आमच्या पितरांनाच लागलेली नव्हती. हे रानडुकरादिकांचे मांस त्यांनी नुसते अदृश्यरूपाने हुंगूनच भागत नव्हते; तर त्यांस ते पोचविण्यासाठी पितृस्थानी नियोजिलेल्या ब्राह्मणांच्या पोटांच्या टपालपेटीतच टाकावे लागे. परलोकी ते अन्न पोचविणारी दुसरी सोयच नसे. ह्यामुळे श्राद्धीय म्हणून जो जो पवित्र, शुचिर्भूत नि स्नानसंध्याशील विप्रवर बोलाविला जाई, त्याने त्याने ते मांस नि मासे खाल्लेच पाहिजेत असा मनु भगवानांचा कडक दंडक पुढील श्लोक उद्घोषित आहे! )

नियुक्तस्तु यथान्यायं यो मांसं नात्ति मानवः ।
स प्रेत्य पशुतां याति संभवानेकविंशतिम् ।। ३५ -अ.५

श्राद्धप्रसंगी नियुक्त असताही जो हट्टाने मांस खात नाही, तो मनुष्य मेल्यानंतर एकवीस जन्म पशुयोनि पावतो! यज्ञामध्ये तर मांस खाणे विप्रांचे कर्तव्य आहे; इतकेच नसून तो मारला जाणारा पशुपक्षीसुद्धा उत्तम गतीला जातो! या अर्थाच्या अनेक श्लोकांपैकी दोनतीन वानगीसाठी देत आहे -

प्रोक्षितं भक्षयेन्मांसं ब्राह्मणानां च काम्यया ।
यथाविधि नियुक्तस्तु प्राणानामेव चात्यये ।। २७
क्रीत्वा स्वयं वाप्युत्पाद्य परोफतमेव वा ।
देवान पितृंश्चार्चयित्वा खादन्मांसं न दुष्यति।।३२
नात्ता दुष्यत्यदन्नाद्यान्प्राणिनोऽहन्यहन्यपि।
धात्रैव सृष्टा ह्याद्याश्च प्राणिनोऽत्तार एव च।।३०
यज्ञार्थ पशवः सृष्टाः स्वयमेव स्वयंभुवा ।
यज्ञश्च भूत्यै सर्वस्य तस्माद्यज्ञे वधोऽवधः ।। ३९
ओषध्यः पशवो वृक्षास्तिर्यंचः पक्षिणस्तथा ।
यज्ञार्थं निधनं प्राप्ताः प्राप्नुवत्युत्सृतीः पुनः।। ४० -अ. ५

प्रोक्षण करुन खाल्ले असता मांस खाण्यास हरकत नाही. श्राध्दांत प्राण संकटी किंवा इच्छा झाल्यासही ब्राह्मणाने मांस खावे. ज्या अर्थी खाणारा वर्ग देवाने उत्पन्न केला, तसेच खाद्य प्राणीही त्यानेच खाद्य म्हणून उत्पादिले आहेत, त्या अर्थी खाणार्‍याने ते खाद्य प्राण्याचे मांसादि अन्न प्रत्यही खाल्ले तरी दोष घडत नाही. (यज्ञाविषयी तर बोलणेच नको. कारण-) पशु हे यज्ञार्थच स्वतः देवाने निर्मिले आहेत. सर्वांच्या कल्याणार्थ असणार्‍या यज्ञात पशूंची हिंसाच खरी अहिंसा आहे. यज्ञात मारलेले पशु जन्मांतरी उत्कर्षच पावतात.

( आपल्या सर्व वर्णाच्या माता-भगिनी मांस खात असत आणि तेही धार्मिक कर्तव्य म्हणून. हे दाखविणार्‍या अशा अनेक श्लोकांमध्ये आगेमागे या स्मृतीत नेहमी घडते तसे याही प्रकरणी घडून काही झाले तरी कोणीही मांस खाऊ नये अशा अर्थाचेही श्लोक घुसलेले दिसतात! ऐतिहासिक दृष्टया प्रथम मांस बेखटक ब्राह्मणादिक खात; पुढे ते वाईट वाटू लागले. तेव्हा काहीजणांनी ठरविले की, केवळ वैदिक धर्मप्रसंगी श्राद्धयज्ञादि मंत्रपूत तेवढेंच मांस खावे; इतर प्रसंगी नाही. आणि दया, अहिंसाप्रभृति भावनांमुळे पुढेपुढे मांस मुळीच खाऊ नये हाच धर्म असे मत बळावले. ज्याने त्याने आपले श्लोक या स्मृतीत गोवले. मांशासना विरुध्द श्लोकांची वानगी म्हणून हे श्लोक पहा )

मधुपर्के च यज्ञे च पितृदैवतकर्मणि ।
अत्रैव पशवो हिंस्या नान्यत्रेत्यब्रवीन्मनुः ।। ४१
एष्वर्थेषु पशून हिंसन्वेदतत्वार्थविद्द्विजः ।
आत्मानं च पशुं चैव गमयत्युत्तमां गतिम् ।। ४२

नाकृत्वा प्राणिनां हिंसां मांसमुत्पद्यते क्वचित् ।
न च प्राणिवधः स्वर्ग्यस्तस्मन्मांसं विवर्जयेत्।। ४८
समुत्पत्तिं च मांसस्य वधबंधौ च देहिनाम् ।
प्रसमीक्ष्य निवर्तेत सर्वमांसस्य भक्षणात् ।। ४९

-अ.५

मधुपर्क-यज्ञ-श्राद्ध ह्यांतच पशुहिंसा करावी. इतरत्र केव्हाही करू नये. जो वेदमूर्ति ब्राह्मण मधुपर्क-यज्ञ-श्राद्धादिकांत पशु मारतो तो स्वतःलाच नव्हे तर त्या पशुलाहि उत्तम गति मिळवून देतो. (पण लगेच याच्याविरुद्ध उलटी घेऊन सांगतात -) प्राण्यांची हिंसा केली तरच मांस खाता येते; हिंसा केव्हाही स्वर्ग्य नसते; यास्तव उत्तम गति हवी असलेल्यांनी मांस खाऊ नये. प्राण्यांचे हाल नि मांसाची (शुक्रशोणितादिकांपासून होणारी गलिच्छ) उत्पत्ति विवंचून कोणाचेही मांस खाणे मुळीच वर्ज्य मानावे!

( अशा प्रकारच्या अनेक परस्परविरुद्ध श्लोकांची खिचडी या प्रकरणी झालेली आहे. ती एकाच ग्रंथकाराने केली असल्यास तो भ्रांतच असला पाहिजे किंवा हे परस्परविरुद्ध श्लोक अनेकजणांचे असून ह्या स्मृतीत नुसते संग्रहिले आहेत. या दोन उलगडयांपैकी मनुभगवानावेर पहिला अयोग्य आरोप करण्यापेक्षा प्रामाणिक सुधारक दुसराच मार्ग स्वीकारतात आणि मांशासन करावे की नाही हा प्रश्न प्रयोगान्ती पटणाऱ्या अद्ययावत् वैद्यक ज्ञानानेच सोडवितात. 'मांस खाल्ले तर त्या पशूसुद्धा खाणारा स्वर्गास जातो' किंवा 'माणसाचा जीव गेला तरी पशूचा जाऊ नये म्हणून मांस खाऊ नका' हे हजारो वर्षांपूर्वी अमुक ऋषींचे मत होते एवढया पोथीजात शास्त्राधारावरून नव्हे. जे असले 'शास्त्राधार' परस्परविरुद्धतेमुळे परस्परांस परभारेच लटके पाडतात त्यांच्या प्रकरणी प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम, अद्यतन विज्ञान जे सांगेल तेच आज त्यातल्या त्यात ग्राह्य होय.) आता ब्राह्मण वर्गाने कायकाय खाऊ नये ते सांगताना मनुस्मृति कडक आज्ञा देते -

'छत्राकं विड्वराहं च लशुनं ग्रामकुक्कुटम् ।
पलाण्डुं गृंजनं चैव मत्या जग्ध्वा पतेद् द्विजः।।' १९ -अ.५

छत्र्या, गावडुक्कर, लसूण, गावकोंबडा, कांदा आणि गाजर हे पदार्थ द्विजाने कळून सवरून खाल्ल्यास तत्काल पतित होतो! ( नकळत खाल्ल्यासही प्रायश्चित्तावाचून शुद्धि नाही! मनुस्मृति अपरिवर्तनीय आहे म्हणून जे म्हणतात त्या आमच्या सनातन बंधूंचा आजचा आचार मनुस्मृतीपासून किती दूर गेला आहे तो पाहा! निषिद्ध नाही, खावे, म्हणून मनुस्मृति ज्यास म्हणजे ते मांसमत्स्य आज सनातन ब्राह्मणांस अत्यंत निषिद्ध आणि मनुस्मृति जे खाल्ले असता ब्राह्मण तत्काल पतित होतो म्हणून म्हणते ते कांदे, लसूण, गाजर, खरवस, घारगे प्रभृति पदार्थ ब्राह्मणांच्या घरोघर खाल्ले जात आहेत. राष्ट्रहितासाठी अस्पृश्योद्धार, शुद्धिप्रभृति सुधारणा करू पाहणाऱ्यांवर 'मनुस्मृतिचा सनातन धर्म उच्छेदिणारे पाखंड' म्हणून तुटून पडून थकल्यानंतर भटभिक्षुक मंडळी आपल्या अड्डयात विसाव्याची करमणूक म्हणून त्याच कांद्याची भजी, भाजी, चिवडा उडवीत आहेत आणि गाजरे तर उजळ माथ्याने

चालताचालता कच्चींच खात गर्जताहेत, की 'आमचा श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्म अपरिवर्तनीय आहे! वचनात् प्रवृत्तिर्वचनान्निवृत्तिः'!)

स्त्रीस्वभाव नि सरंक्षण

अस्वतंत्राः स्त्रियः कार्याः फुषैः स्वैर्दिवानिशम्।
विषयेषु च सज्जन्त्यः संस्थाप्या आत्मनो वशे।।२
पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्राः न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।। ३
अरक्षिता गृहे रुद्धाः पुरूषैराप्तकारिभिः ।
आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः।। १२
नैता रूपं परीक्षन्ते नासां वयसि संस्थितिः ।
सुरूपं वा कुरूपं वा पुमानित्येव भुंजते ।। १४
एवं स्वभावं ज्ञात्वासां प्रजापति निसर्गजम् ।
परमं यत्नमातिष्ठेत्पुरूषो रक्षणं प्रति ।। १६
नास्ति स्त्रीणां क्रिया मंत्रैरिति धर्मे व्यवस्थितिः ।
निरिंद्रिया ह्यमंत्राश्च स्त्रियोऽनृतमिती स्थितिः।।१८ -अ. ९

स्त्रियांना त्यांच्या विषयासक्तीपासून रक्षिण्यासाठी रात्रंदिवस पुरूषांनी आपल्या अधीन ठेवावे. कौमार्यात पिता, यौवनात भर्ता, वार्धक्यात पुत्र हाच त्यांचा पालक. त्यांच्या अधीन स्त्रियांनी रहावे. स्त्रिया स्वातंत्र्याला योग्य नाहीत. पुरूषांनी अगदी घरात कोंडून ठेवले तरी त्या सुरक्षित राहणार नाहीत. स्वतःलाच रक्षील तीच खरी सुरक्षित; कारण प्रजापतीने स्त्रियांचा स्वभावच असा घडवला आहे, की त्या रूपास वा वयास पाहत नाहीत. सुरूप वा विरूप, पुरूष म्हटला, की त्यांस हवासा होतो. यास्तव त्यांस परक्यांपासून दूर ठेवण्याची पराकाष्ठा करावी. स्त्रियांचे जातकर्मादि सारे संस्कार मंत्रहीन असतात. ना त्यांना मंत्र म्हणण्याचा अधिकार! स्त्री स्वभावतःच अनृत आहे असे शास्त्र सांगते! ( याहूनही कडक भाषेत लिहिलेले अशाच विचारांचे स्त्रीदोषविषयक श्लोक बहुत आहेत. त्या प्रकरणी इतकेच ध्यानी ठेवायचे की, शास्त्रकार पुरूष होते. जर शास्त्रकार स्त्रियाही असत्या तर पुरूषदोष वर्णिताना हेच श्लोक त्यांनी पुरूषांनाही इतक्याच यथातथ्यपणे लावण्यास सोडले नसते. पुन्हा स्त्रियांची थोरवी वर्णिणारे, वा स्त्री निर्देच्या अगदी उलट असे श्लोकही आहेत. त्यांची वानगी पूर्वी दिलेलीच आहे. त्या परस्पर-विरुद्धतेच्या दोषांचे कारण, ही मते निरनिराळया काळी भिन्नभिन्न श्लोककारांची असताही एका मनूच्याच नांवावर दडपून दिली आहेत हेच होय. यास्तव त्यांत मनूचे कोणते तेही सांगणे कठीण पडते. त्या काळी महिलांविषयी पुरुषवर्गाचे मतप्रवाह किती प्रकारचे होते, इतकी ऐतिहासिक माहिती देण्यापुरताच त्यांचा उपयोग. हेही विसरता कामा नये की, बायबलच्या जुन्या करारापासून तो अगदी अर्वाचीन करारापर्यंत स्त्रीवर्गाविषयीचे असेच आणि याहूनही निंदक विचार बहुतेक धर्मग्रंथांतून ठायीठायी विखुरलेले आढळतात.) स्त्रिया जात्या अशा 'चंचल' नि 'अशुभ' असल्या तरी नीट रक्षिल्या तर -

यादृग्गुणेन भर्ता स्त्री संयुज्येत यथाविधि ।
तादृग्गुणा सा भवति समुद्रेणेव निम्नगा ।। २२
अक्षमाला वसिष्ठेन संयुक्त्तेऽधमयोनिजा ।
शारङ्गी मन्दपालेन जगामाभ्यर्हणीयताम् ।। २३
एताश्चान्याश्च लोकेऽस्मिन्नफष्टप्रसूतयः ।
उत्कर्ष योषितः प्राप्ताः स्वैः स्वैर्भर्तृगुणैः शुभैः ।। २४ -अ. ९

समुद्राने नदी तशी भर्त्याच्या संगतीने स्त्री उत्कर्षही पावते. अक्षमाला ही नीच जातीची स्त्री वशिष्ठाने वरली. मन्दपाल ऋषीशी शारंगीचा संयोग झाला. अशा आणखी कित्येक चण्डालप्रभृति हीन जातीच्या स्त्रिया उत्तम पति प्राप्त झाल्याने जगताला पूजनीय व्हाव्या इतक्या उत्कर्षल्या! ( वशिष्ठाने चाण्डालीशी लग्न लावले. 'वशिष्ठचाण्डालीमुपयेमे' अशी श्रुतिही आहे. वशिष्ठासारख्या पतीमुळे ती चांडालीही थोरपद पावली. सप्तर्षींच्यासह पूजनीय स्थान पावणारी अरूंधती ती हीच चण्डालकन्या अक्षमाला होय, स्कंदपुराणातही ती कथा आहे. या श्लोकात चाण्डालादि हीन समजलेल्या कन्यांचे ब्राह्मणांशी झालेले हे विवाह जातिबाह्य म्हणून निंदिलेले नाहीत; इतकेच नव्हे, तर हितपरिणामी म्हणून प्रशंसेने उल्लेखिले आहेत. ते एकदोनच ठिकाणी झाले नाहीत तर 'अशा प्रकारची अनेक हितपरिणामी उदाहरणे' ही स्पष्ट निर्देशिली आहेत. पुन्हा 'स्त्रीरत्नं दुष्कुलादपि' या मनूच्या दुसऱ्या एका नियमाचाही हाच परिणाम होत असला पाहिजे. ब्राह्मणादिकांशी चण्डालांच्या स्त्रियादेखील धर्मविधियुक्त विवाह लावीत आणि त्यांची जात पतीची तीच ठरून त्या ऋषितुल्य थोरवीस चढून ऋषिवत् पूजिल्याही जाऊ शकत. देशस्थ ब्राह्मणाची मुलगी कोकणस्थ ब्राह्मणांनीही करणे नाही; बंगाली ब्राह्मणाने तर नाहीच नाही, हाच आमच्या पूर्वजांचा अपरिवर्तनीय सनातन धर्म होय! असे मनुस्मृतीच्याच शपथेवर सांगणारे आमचे सनातनी धर्मबांधव हे वशिष्ठादिक चाण्डालकन्यका वरणारे नि मनूने प्रशंसिलेले पूर्वज 'आमच्या पूर्वजांतले नव्हेत!' म्हणून सांगू धजतील काय? वशिष्ठादि गोत्रज ब्राह्मणांची कोणची ना कोणची प्रपितामही तरी चाण्डालकन्यका ही होती ; आम्हा ब्राह्मणांत चांडालांचे रक्त आहे. 'हीनयोनि अस्पृश्यादिक' हे ब्राह्मणांचे मावसभाऊ आहेत हे स्पष्ट आहे! )

( ४ )

मागील सर्व लेखांकांत बहुधा मनुस्मृतीतील अध्यायांचाच अनुक्रम अनुसरलेला असल्यामुळे महिलेच्या विवाह, योग्यता, राहणी प्रभृतिसंबंधीची माहिती त्या त्या विषयांच्या अनुक्रमाने एकत्र संगतवार देता आली नाही. कारण मनुस्मृतीत प्रत्येक विषयाचे सारे निर्बंध एकत्र दिलेलेच नाहीत. पूर्वी मनुस्मृतीच्या मूळ ग्रंथात तशी ज्या त्या विषयाची चर्चा त्या त्या अध्यायात संकलितपणे असावी हे अध्यायांच्या नामकरणावरुन नि त्यातील एकंदरीतल्या श्लोकांवरून स्पष्ट होते; पण शतकानुशतके ज्यास जे वाटेल ते मत जुळेल तिथे आगेमागे मध्ये प्रक्षिप्त श्लोक घालून गोवले जात जात आजची मतांची खिचडी, विषयांची संगति सुटून, झालेली त्या पुस्तकात आढळत असावी हेच अनुमान करणे भाग पडते. उदाहरणार्थ, नववा अध्याय पहा. यात स्त्रीपुरूषांच्या संयोगविप्रयोगात काय संबंध असावे त्यात 'धर्म्यान वक्ष्यामि शाश्वतान' अशी पहिल्याच श्लोकात प्रतिज्ञा केली आहे. त्याप्रमाणे त्या अध्यायात प्रथम व्यवस्था असता अचानक द्यूतादिक प्रकरणी, शूद्र प्रकरणी, राजाने काय दंड द्यावा, हेर कसे असावेत प्रभृति अगदी निराळया प्रकरणींच्या राजधर्मांनी तो अध्याय खच्चून भरला आहे!

यामुळे महिलासंबधांच्या निरनिराळया प्रकरणांवरील मते, स्त्रियांच्या स्तुतिनिंदा, इत्यादि विषय पुनः पुन्हा आल्यासारखे वाटले तरी अध्यायांच्या अनुक्रमास अनुसरणे तर अपरिहार्य होते. तथापि विषय जरी तो तो फिरून आला तरी, मते नि विधिनिषेध मागच्या अध्यायांहून जी नवीन तीच तेवढी आम्ही निवडल्यामुळे माहितीची मात्र पुनरुक्ति या लेखमालेत सहसा घडू दिली नाही.

पुनर्विवाहनिषेध

स्त्रीने, तिचा पति शीलरहित, गुणरहित, स्वेच्छाचारी असला तरी नेहमी देवाप्रमाणे त्याची शुश्रूषा करावी आणि तो मेल्यानंतरही पुत्र नसला तरीही आमरण ब्रह्मचर्य पाळून अविवाहित राहावेः -

विशीलः कामवृत्तो वा गुणैर्वा परिवर्जितः ।
उपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत् पतिः।। १५४
कामं तु क्षपयेद्देहं पुष्पमूलफलैः शुभैः ।
न तु नामापि गृहीयात् पत्यौ प्रेते परस्य तु ।। १५७
मृते भर्तरि साध्वी स्त्री ब्रह्मचर्ये व्यवस्थिता ।
स्वर्गं गच्छत्यपुत्रापि यथा ते ब्रह्मचारिणः ।। १६० -अ. ५

स्वतःचा पति मेल्यानंतर ब्रह्मचर्यव्रताने फलमूलांनी देह झिजवत, अन्य पुरूषाचे नावेही न घेता स्त्रीने आमरण वागावे हा झाला सुशील स्त्रीचा धर्म. पण स्वतःची सुशील स्त्री मेल्यावर पुरुषाने कसे वागावे? तर लगेच सांगतात:-

भार्यायै पूर्वमारिण्यै दत्वाग्नीनन्त्यकर्मणि ।
पुनर्दारक्रियां कुर्यात्पुनराधानमेव च ।। १६८ -अ. ५

पत्नी मेली असता तिचे यथाविधि दहन करून पतीने पुन्हा लग्न करावे आणि गृहस्थाश्रमाची अग्निपूजा पुन्हा यथापूर्व चालवावी.

www.savarkarsmarak.com

आता वरील विधवाधर्माच्या अगदी उलट असा विधवाधर्म अध्याय ९ मध्ये कसा सांगतात तो पहा:-

नियोगविचार

यदन्यगोषु वृषभो वत्सानां जनयेच्छतम् ।
गोमिनामेव ते वत्सा मोघं स्कंदितमार्षभम् ।। ५०
तथैवाक्षेत्रिणो बीजं परक्षेत्रप्रवापिणः ।
कुर्वन्ति क्षेत्रिणामर्थं न बीजी लभते फलम् ।। ५१
फलं त्वनभिसंधाय क्षेत्रिणां बीजिनां तथा ।
प्रत्यक्षं क्षेत्रिणामर्थो बीजाद्योनिर्गरीयसी ।। ५२
देवराद् वा सपिंडाद् वा स्त्रिया सम्यङ्नियुक्तया ।
प्रजेप्सिताधिगन्तव्या संतानस्य परिक्षये ।। ५९
विधवायां नियुक्तस्तु घृताक्तो वाग्यतो निशि ।
एकमुत्पादयेत्पुत्रं न द्वितीयं कथंचन ।। ६० - अ. ९

ज्याप्रमाणे गाईंना वृषभापासून शंभर वासरे जरी झाली तरी ती त्या त्या वृषभांच्या धन्याची समजली जात नाहीत तर ती ज्याची गाय त्याचींच वासरे समजली जातात, त्याचप्रमाणे स्त्रियेला झालेली संतति, कोणच्याही बीजापासून असली तरी ती ज्याची स्त्री त्याचीच समजली पाहिजे. क्षेत्रबीजाचा न्यायच येथे लागू. ज्याच्या शेतात उगवते त्याचे धान्य. मग त्यांचे बीज (उडत्या पाखराने, वाऱ्यने वा अन्य कोण्या स्वामी नसलेल्या पराने) टाकलेले असो! संततीच्या स्वामित्वाच्या प्रश्नी 'बीजाहून योनिच श्रेष्ठ' हाच न्याय खरा. यास्तव स्वतःच्या बीजापासून पुत्र प्राप्ति न झाली असता स्वतःच्या स्त्रीला नियुक्त अशा परपुरुष बीजापासून जो पुत्र होतो तो त्या परक्याचा न होता तो स्त्रीच्या पतीचाच ठरला पाहिजे. कारण पत्नी ही पतीचे क्षेत्र आहे. त्या क्षेत्राच्या उत्पन्नाचा स्वामी तो पतीच होय. म्हणून वंशक्षयाचे संकट टाळण्यासाठी अधिकृत अनुज्ञेने दिराकडून वा सपिंडातील पुरुषाकडून - ते परपुरुष असताही त्यांशी पतीप्रमाणे संबंध ठेवून - प्रजोत्पत्ति करावी. (पति जिवंत असलेल्या स्त्रीचा हा विचार झाला. तोच न्याय विधवेलाही लागू आहे. तिनेही वडील माणसांची अनुज्ञा घेऊन संततिक्षय टाळण्यासाठी नियुक्त पुरुषांचे बीज धारण करावे.) अशा रीतीने जो पुरुष नियुक्त होईल त्याने त्या दुसऱ्याच्या पत्नीशी समागम करताना सर्वांगास तूप लावून, मौन धरून, रात्री एकांतात भेटी घ्याव्या. एक पुत्र होईतोपर्यंतच त्याने त्या परस्त्रीशी रतावे. ही मर्यादा उल्लंघून दुसरा पुत्र होईतो तो नियुक्तसंबंध वाढवू नये. ('न द्वितीयं कथंचन!' )

( पण इतक्या कडकपणे एकाच पुत्रास उत्पादिण्यापुरताच संबंध ठेवावा अशी स्पष्ट मर्यादा या श्लोकात घातलेली असताही लगेच खालच्या श्लोकात त्याच्या अगदी उलट श्लोक येतो ) कीः-

द्वितीयमेके प्रजनं मन्यन्ते स्त्रीषु तद्विदः ।
अनिर्वृतं नियोगार्थं पश्यन्तो धर्मतस्तयोः ।। ६१ -अ. ९

एक मुलगा असून नसून सारखाच. कारण तो पटकन मरता पुन्हा वंशक्षयाची भिती! असे समजून ती भिति शक्यतो नक्की नाहीशी करण्याच्या हेतूने काही धर्मवेत्ते आचार्य दुसरा पुत्र होईतो त्या परस्त्रीशी

नियुक्ताने रतावयास धर्माची हरकत नाही असे मानतात. पण मग मात्र ती दोघे पुन्हा पूर्ववत् पृथक झाली पाहिजेत. त्यापुढेही त्यांनी कामसंबंध ठेवल्यास ती पतित होतील.

(वरील भागात नियोगविधीचे क्षेत्रबीजादि तात्विक सविस्तर कोटिक्रमासुद्धा समर्थन करून त्यात स्पष्टपणे धर्मम्नुकूल म्हटले असताही लगेच पाठोपाठ त्याच्या विरुद्ध हे श्लोक कसे येतात ते पाहा।। )

नान्यस्मिन्विधवा नारी नियोक्तव्या द्विजातिभिः ।
अन्यस्मिन्हि नियुञ्जाना धर्मं हन्युः सनातनम् ।।६४
नोद्वाहिकेषु मंत्रेषु नियोगः कीर्त्यते क्वचित् ।
न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ।। ६५
अयं द्विजैर्हि विद्वद्भिः पशुधर्मो विगर्हितः ।
मनुष्याणामपि प्रोक्तो वेने राज्यं प्रशासति ।। ६६
समहीमखिलां भुञ्जन राजर्षिप्रवरः पुरा ।
वर्णानां संकरं चक्रे कामोपहतचेतनः ।। ६७ -अ. ९

विधवा नारीला कोणत्याही पुरूषाशी नियोजू नये. विधवेला नियोगाने परपुरूषाशी रतू देणे हा सनातन धर्माचा घात होय! विवाहमंत्रात नियोग (श्रुतींनी) कुठेही सांगितलेला नाही. विधवाविवाहही सांगितलेला नाही. विधवाविवाह आणि नियोग हा केवळ पशुधर्म होय! मनुष्यात ही दुष्ट रूढि 'राजर्षिप्रवर' वेनराजाने कामलोलुपतेने त्याचा बुद्धिभ्रंश झाला असता पाडली आणि वर्ण संकर केला. पण तिला 'विगर्हन्ति साधवः' सज्जन लोक अत्यंत निंद्य, अधर्म्य, समजतात.

(नियोगाची 'पशुधर्म' म्हणून इतकी कडक निंदा केल्यानंतरही पुन्हा या अध्यायातच नव्हे, तर इतरत्रही 'धर्म्य' म्हणूनच त्या विधीचा प्रपंच केला आहे! असा उलटसुलट मतांचा गोंधळ कसा सारखा चाललेला आहे, त्याची वानगी म्हणून याच अध्यायातील वरील श्लोकांनंतर आलेले खालील श्लोक पहा -)

यस्तल्पजः प्रमीतस्य क्लीबस्य व्याधितस्य च ।
स्वधर्मेण नियुक्तायां स पुत्रः क्षेत्रजः स्मृतः।।१६७
औरसः क्षेत्रजश्चैव दत्तः कृत्रिम एव च ।
गूढोत्पन्नोऽपविद्धश्च दायादा बांधवाश्च षट् ।।१५९
औरसक्षेत्रजौ पुत्रौ पितृरिक्थस्य भागिनौ ।
दशापरे तु क्रमशो गोत्ररिक्थांशभागिनः ।। १६५
हरेत्तत्र नियुक्तायां जातः पुत्रो यथौरसः ।
क्षेत्रिकस्य तु तद्बीजं धर्मतः प्रसवश्च सः ।।१४५ -अ. ९

पति वारला असता विधवेने नियोगविधीने उत्पादिलेला पुत्रच नव्हे तर पति जिवंत असताही तो क्लीब वा व्याधिग्रस्त असल्यास वडिलांच्या अनुज्ञेने त्याच्या स्त्रीस परपुरूषाशी नियोगविधीने समागम करुन जो पुत्र होतो तोही क्षेत्रज पुत्र समजला जावा. औरसपुत्राप्रमाणेच हा क्षेत्रज पुत्रही धर्म्य असून त्याला पुत्राचे

श्राद्धादिक सर्व अधिकार आहेत. कारण तो 'दायाद' आहे. इतकेच नव्हे, तर तो क्षेत्रज पुत्र दत्तक पुत्राहून श्रेष्ठ आहे.

(मनूंनी दहा पुत्र सांगितले. औरस, क्षेत्रज, दत्त, कृत्रिम म्हणजे पुत्रवत् मानलेला; गूढोत्पन्न म्हणजे लग्नानंतर स्त्रीला कोण्या अज्ञात मनुष्यापासून पतीला न सांगता झालेला पुत्र; त्यावर त्या पतीचीच सत्ता असल्याने तो पुत्र होय. लग्नापूर्वी स्त्री कन्या असता तिला कोणाकडून गुप्तपणे जो पुत्र होतो तोहि तिच्या लग्नानंतरच्या पतीचाच समजला जातो, तो कानीन. विवाह करताना स्त्री गर्भिणी असल्यास ते पतीला माहीत असो वा नसो, पण तिला होणारा पुत्रही तिच्या पतीचाच ठरतो, तो सहोढ. विकत घेतलेला तो क्रीत. विधवेने विवाह केला असता होतो तो पौनर्भव. टाकून दिलेला नि इतरांनी वाढविलेला तो अपविद्ध.

ह्या दहा प्रकारच्या पुत्रांत औरस नि क्षेत्रज हे श्रेष्ठ होत. ह्या पुत्रांच्या प्रकारांवरुन स्त्रीपुरूषासंबंधी मनुष्यांची प्रवृत्ति त्या त्या सत्ययुगातही आजच्या कलियुगापेक्षा कोणच्याही प्रकारे अधिक संयत होती असे फारसे दिसत नाही. स्त्रियांचे असले संबंध अगदी अपवाद म्हणून शास्त्रकारांनी दुर्लक्ष करण्याइतके तुरळकही नव्हते. इतकेच नव्हे, तर वरील प्रकारचे संबंध इतके वारंवार घडत की, त्यांचे स्वतंत्र वर्गीकरण करुन पितृसंपत्तीच्या वाटणीत त्या त्या पुत्रांचे अंश ठरविणे धर्मकारांनाही भाग पडावे!

विवाहसंबंध जितके संयत नि एकान्तिक असतील तितकी त्या समाजाची वैवाहिक नीति प्रशस्ततर होय असे जर म्हणावयाचे तर ह्या कलियुगातील वैवाहिक नीति त्या सत्यत्रेताद्वापार युगातील नीतीपेक्षा अधिक श्रेष्ठ होय असेही मानले पाहिजे. कारण आजचे शास्त्र औरस नि दत्तक या दोन प्रकारच्या पुत्रानांच पुत्र समजते. कानीन, सहोढ, गूढोत्पन्न, क्षेत्रज प्रभृति पुत्रांना पूर्वीप्रमाणे मातापितरांस 'पुं'नाम नरकांतून तारणारे 'पुत्र' न समजता आज उलट तसे संबंध तशा मातापितरांस नरकात ढकलणारेच समजले जातात. पण सत्ययुगादिक पूर्वीच्या युगांत तर क्षेत्रज, गूढोत्पन्न, सहोढ, कानीन अशा संबंधाचे पुत्रही मातापितरांस 'पुं' नाम नरकातून तारणारेच समजले जात. क्षेत्रज नि गूढोत्पन्न हे तर 'दायादांच्या' प्रशस्त वर्गात मोडत नि त्यांस श्राद्धाचाही प्रकट अधिकार मिळे! या प्रकरणी तरी कलियुग हेच सत्ययुगाहून अधिक संयत नि धर्मशील मानणे भाग आहे!

ह्या दहा पुत्रांच्या वर्गीकरणात आणि गांधर्वादि विवाहात व्यक्त होणाऱ्या त्या सत्ययुगातील स्त्रीपुरूषसंबंधीय वैवाहिक नीतीवरुन असे स्पष्ट म्हणावे लागते की, रशियातील आजची जी स्त्रीपुरूषसंबंधीय नीति, 'नवी नीति' म्हणून म्हटली जाते ती फारशी नवी नसून स्वैरतेत तरी जवळजवळ 'जुनी नीति'च आहे, 'सनातन'च आहे आणि मनुस्मृतीला सनातन धर्माचा अपरिवर्तनीय आधारग्रंथ म्हणून म्हणणाऱ्या कोणाही 'सनातनीय' गृहस्थाला तरी त्या नव्या नीतिपंथाला पाखंड म्हणून नाके मुरडण्यास तोंड नाही! पाखंड असलेच तर ते नवे पाखंड नाही, अगदी मनुप्रणीत, सत्ययुगीन, सनातन, पाखंड आहे!)

कन्यादानविचार

काममामरणात्तिष्ठेद् गृहे कन्यर्तुमत्यपि ।
न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् । ८९

त्रीणी वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ।
उर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम् ।। ९०
पित्रे न दद्याच्छुल्कं तु कन्यामृतुमती हरन ।
स हि स्वाम्याददतिक्रामेद्दतूनां प्रतिरोधनात् ।। ९३
त्रिंशद्वर्षोद्वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम् ।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीददति सत्वरः ।। ९४ -अ. ९

कन्या ऋतुमती होऊन जन्मभर तशीच राहिली तरी चालेल पण तिला गुणहीन अयोग्य वराला केव्हाही लग्नात द्यायची म्हणूनच देऊ नये. ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षेपर्यंत वडिलांकडून लग्न ठरविले जाण्याची वाट पाहिल्यावर मग कुमारीने आपल्याला योग्य वाटेल तो समगुणशील पति स्वतः निवडावा, वरावा. अशा उपवर कुमारीच्या पित्यास त्या वराने कोणचेही शुल्क देण्याचं कारण नाही. तिचा वेळीच विवाह न केल्याने आणि ऋतुप्राप्तीनंतरही तिला संभोगसुखापासून वंचित केल्याने तिच्या पित्याचे तिच्यावरील स्वामित्व त्याच्याकडे राहिलेलेच नसते.

विवाहित जीवनाचा आदर्श धर्म

अन्योन्यस्याव्यभीचारो भवेदामरणान्तिकः ।
एष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्री-पुंसयोः परः ।।१०१
तथा नित्यं यतेयातां स्त्री-पुंसी तु कृतक्रियौ ।
यथा नाभिचरेतां तौ वियुक्तावितरेतरम् ।। १०२ -अ. ९

पतीने पत्नीशी आणि पत्नीने पतीशी कोणाच्याही प्रकारचा व्यभिचार न करता, एकत्र असो, दूर असो; पण आमरण परस्परांशी निष्कपटपणे वर्तावे; हाच संक्षेपतः विवाहित जीवनाचा आदर्श धर्म होय!

( स्त्री-पुरूषधर्माचा हा उत्कट समारोप झाला. ह्या एकंदर सर्व प्रकरणात एक गोष्ट चटकन लक्षात आल्यावाचून राहत नाही ती ही की, पतिनिधनानंतर नियोग किंवा पुनर्विवाह किंवा आमरण ब्रह्मचर्ययुक्त जीवन नेण्याचे विधवेचे तिन्ही धर्मसंप्रदाय सांगितले असताही विधवेने पतीसह सती जावे, पतीमागे जगूच नये, असा विधि मात्र इथे कुठेही धडधडीतपणे पुरस्कारिलेला नाही. सतीची रुढि प्रचलित झाल्यानंतरच्या कोण्या सतीच्या अभिमानी शास्त्रकाराने आपल्या त्या मताचेही पाचपंचवीस श्लोक ह्या स्मृतीत कसे घुसडले नाहीत देव जाणे! क्वचित् तोपर्यंत ही मनुस्मृतीची शेवटची संकलित प्रत जी भृगुसंहिता ती इतकी मोजून मापून, लेखी तोंडी सर्वप्रसिद्ध झालेली असेल की, तिच्या त्या अनुक्रमणिकाध्यायांची पक्की कडीकुलपे ठोकून बंद केलेल्या पोलादी पेटीत बाहेरच्या एका अक्षराची मुंगीही घुसणे अशक्य व्हावे! )

पुत्र आणि पुत्री

यथैवात्मा तथा पुत्रः पुत्रेण दुहिता समा ।
तस्यामात्मनि तिष्ठन्त्यां कथमन्यो धनं रहेत्।।१३० -अ.९

मुलगा हा आपला आत्माच आहे. मुलगी ही पण मुलाप्रमाणेच आहे. तेव्हा ती जिवंत असता ( निपुत्रिक पित्याचे धन ) तिच्यावाचून कोण घेऊ शकणार ।

अपुत्रो नेन विधिना सुतां कुर्वीत पुत्रिकाम् ।
यदपत्यं भवेदस्यां तन्मम स्यात्स्वधाकरम् ।।१२७ -अ.९

निपुत्रिकाने (मुलीच्या ठिकाणी उत्पन्न होणारा पुत्र माझे श्राद्धादि विधि करो असे तिच्या लग्नाच्या वेळी ठरविणाऱ्या) विधीने मुलीलाच मुलाचे अधिकार अर्पावे; कारण -

पौत्रदौहित्रयोर्लोके न विशेषोऽस्ति धर्मतः ।
तयोर्हि मातापितरौ संभूतौ तस्य देहतः ।। १३३ -अ. ९

मुलाचा मुलगा आणि मुलीचा मुलगा यात धर्मदृष्टीने मुळीच अंतर नाही; कारण ती दोघेही आजाच्याच देहापासून निर्मिलेली असतात. (याच्या उलटही काही वचने आहेतच! )

स्त्रीवध

मनुस्मृतीत, ती आज ज्या भृगुसंहितेच्या रूपाने आपल्यापुढे आहे, अशा स्थितीतही, स्त्रियांना ब्राह्मणांप्रमाणेच एक विशेष सवलत मात्र एकंदरीत अगदी स्पष्टपणे आणि जवळ जवळ विरुद्ध श्लोकांच्या अभावाने एकमते दिलेली आढळते. ती म्हणजे, स्त्री ही अवध्य आहे, तिला मारणे हे (महापाप) आहे. तिच्या हातून मोठमोठे अपराध घडले तरीही तिला वध-दंड होता कामा नये असा कडक दंडक घालून देणे ही होय. ह्या प्रकरणी मात्र स्त्रियांना आजच्या दंडविधानापेक्षा (क्रिमिनल लॉपेक्षा) मनुस्मृतीचे प्राचीन दंडविधानच परवडेलसे वाटते! उदाहरणार्थ, खालील श्लोक पहा -

बालघ्नांश्च कृतघ्नांश्च विशुद्धानपि धर्मतः ।
शरणागतहन्तृश्च स्त्रीहन्र्तृश्च न संवसेत् ।। १९० -अ. ११

बालहत्या, कृतघ्नता, शरणागतहत्या आणि स्त्रीहत्या ही घोर पापे करणाऱ्या मनुष्याशी (प्रायश्चित्त घेतले तरीही) कोणी कोणच्याही प्रकारचा संबंध ठेवू नये.

आतेबहीण, मावसबहीण, प्रभृतीशी विवाह करू नये!

पैतृष्वसेयीं भगिनीं स्वस्त्रीयां मातुरेव च ।
मातुश्च भ्रातुस्तनयां गत्वा चांद्रायणं चरेत् ।।१७१
एतास्तिस्त्रस्तु भार्यार्थे नोपयच्छेत्तु बुद्धिमान ।
ज्ञातित्वेनानुपेयास्ताः पतति ह्युपन्नधः ।। १७२ -अ. ११

आतेबहीण, मावसबहीण, मामेबहीण (किंवा भाची, पुतणी) ह्यासारख्या बहिणीप्रमाणे असणाऱ्या स्त्रियांशी लग्न लावणाऱ्या ( वा संभोग करणाऱ्या) पुरुषास अधोगति प्राप्त होते, तो पतित होतो. ( आज अनेक जातीतच काय पण प्रत्यक्ष ब्राह्मण जातीतही ह्या काही चाली धडधडीत चालू आहेत. आणि मनुस्मृतीत अस्पृश्याता‌दि जे आचार सांगितले आहेत त्यास तोडगा म्हणून सुधारकांवर तुटून पडणारे अनेक ब्राह्मण - ब्राह्मणेतर सनातनी ह्या चाली पाळणाऱ्या जातीतही आहेतच! त्यांनी स्वतःच पतित म्हणणे सोडून मनूंतील आचार परिवर्तनीय आहेत, त्रिकालाबाधित नाहीत आणि राष्ट्रहितास परवडतील ते घेऊन शेष सोडावे असे तरी मानले पाहिजे. तीच स्थिति कन्येच्या शुल्काविषयी. शूद्रांनी देखील शुल्क घेऊ नये. शुल्क घेणे हे प्रच्छन्न कन्याविक्रयाचे पापच आहे असे अनेक कडक निषेधाचे श्लोक मनूत असताही कित्येक

ब्राह्मण ज्ञातीसुद्धा, शुल्क धडधडीत धर्म संस्कारपूर्वक घेतात नि तरीही 'मनूतील अक्षर नि अक्षर त्रिकालाबाधित धर्म' आहे म्हणून ओरडतच असतात! शुल्कनिषेधाचे वानगी दाखल म्हणून अनेक श्लोकांपैकी खालील श्लोक पाहा)-

आर्षे गोमिथुनं शुल्कं केचिदाहुर्मृषैव तत् ।

अल्पो प्येवं महान्वापि विक्रयस्तावदेव सः ।। ५३ -अ.३

आर्ष नांवाच्या विवाहात, की जो विवाह ब्राह्मणांनाही युक्त असून ज्यांनी सात पिढया उत्तम गति पावतात म्हणून (अ. ३:३८ श्लोकात मनुभगवानांनीच सांगितले आहे, त्यातही) कन्येच्या पित्याला वराने एकदोन गायबैलांच्या जोडया द्याव्या म्हणून जरी 'कित्येक' म्हणतात तरी ते व्यर्थ आहे. कारण थोडे वा फार असो, पण शुल्क घेणे म्हणजे कन्या-विक्रयच असल्याने तो प्रकार निंद्यच होय. (फार कशाला, ब्राह्मणांनी तर काय, पण शूद्रांनी सुद्धा या पापापासून दूर राहावे.)

आददीत न शूद्रोपि शूल्कं दुहितरं ददन ।

शुल्कं हि गृहन्कुरुते छन्नं दुहितृविक्रयम् ।। ९८

नानुशुश्रुम जात्वेतत्पूर्वेष्वपि हि जन्मसु ।

शुल्कसंज्ञेन मूल्येन छन्नं दुहितृविक्रयम् ।। १०० -अ. ९

शूद्राने देखील कन्येचे मूल्यच असलेले शुल्क घेऊ नये. त्याला शुल्क नावे दिले तरी तो लबाडीने छपविलेला क्रन्याविक्रयच होय! पूर्वीच्या युगातही कन्या विक्रयांचे पाप ज्या गोंडस नांवाने छपविले जाते ते शुल्क कोणीही घेतल्याची गोष्ट आम्हांस ठाऊक नाही!

(मनुस्मृतीतले सारे श्लोक, जगदुत्पतीसहच मनुभगवानांनी सांगितले नि त्यातील अक्षर नि अक्षर अपरिवर्तनीय धर्म आहे या दोन्ही समजुती साफ खोटया पाडण्यास हे तीनचार श्लोकदेखील अगदी बिनतोड पुरावा आहे! जर जगदुत्पत्तीसहच ही स्मृती रचली तर तिच्यात वारंवार जे 'कित्येक अमुक म्हणतात' अशी भिन्न आचार्यांची मते सांगून ती खुडली आहेत ते आचार्य काय साऱ्या सृष्टीच्याही आधी झाले होते? 'कित्येक असे पुढे म्हणतील' अशी भाषा देखील नाही. 'म्हणाले म्हणतात' अशी भाषा आहे. अर्थात् ऐतिहासिक दृष्टीनेच याचा अगदी नीट उलगडा होतो की, भृगूने ही संहिता रचतेवेळी ज्या अनेक आचार्यांची मते प्रचलित होती ती उल्लेखिली आणि प्राचीन मनुस्मृतीचे हे संस्कार सिद्ध केले. अनेक स्मृत्या त्या काळी असल्याचे कितीतरी उल्लेख ' या वेदबाहयाः स्मृतयः' प्रभृति श्लोकांतून स्पष्टपणे आलेले आहेत! सर्व सृष्टी एक दिवशी झाली नाही, मनुष्यच सृष्टीनंतर लाखो वर्षांनी झाला, तर मनूंची गोष्टच दूर! ह्या सृष्टी विज्ञानाने सिद्ध झालेल्या घटना नाकारून या ग्रंथाचे योग्य ते महत्वही कमी करण्याचे पाप 'सनातन' थोतांडाने कोणी करु नये हेच युक्त. पुन्हा वरील श्लोकात 'शुल्क घेण्याची चाल आम्ही कधीही ऐकली नाही' असे ठासून सांगणारा हा ग्रंथकार स्वतःच 'आर्ष विवाहात शुल्क घेतात; ब्राह्मणांच्या सात पिढया तो विवाह उद्धारतो' हे याच ग्रंथाच्या तिसऱ्या अध्यायात तितकेच ठासून सांगतो! अर्थात् तो ग्रंथकार एकच होता हे मानून त्यास भ्रमिष्टात ढकलण्यापेक्षा हे असले अगदी परस्परविरूद्ध असे अनेक श्लोक अनेक शास्त्रकारांनी वेळोवेळी रचलेले नि नंतर एकत्र संकललेलेच मानणे

हेच त्या थोर स्मृतिकारांच्या योग्यतेस निष्कारण कमीपणा न आणणारे नाही काय? सामान्य ग्रंथकारालाही जी गोष्ट सुसंगतपणे सांगता येते ती मनुभगवानांना सांगता आली नाही आणि त्यांच्या ग्रंथात इतकी विसंगतता आहे, की त्यांचा समन्वय लावण्यास मीमांसादिकांच्या अवडंबरी नि अतथ्य गृहीतकृत्यांचे उसने साहाय्य घ्यावे लागावे असे मानण्यातच मनुभगवानांची असह्य निंदा आमच्या 'सनातनी' थोतांडात घडत आहे! )

पुरूष हा स्त्रीहि आहे, पति हा पत्नीच्या उदरी जन्मतो-

पतिर्भार्यां संप्रविश्य गर्भो भूत्वेह जायते ।
जायायास्तद्धि जायात्वं यदस्यां जायते पुनः ।।८
एतावानेव पुरूषो यज्जायात्मा प्रजेति हे ।
विप्रा प्राहुस्तथ चैतद्यो भर्ता सा स्मृतांगना ।।४५-अ. ९

पति हा गर्भरुपाने पत्नीच्या पोटी पुनः जन्मतो यास्तवच पत्नीला जाया म्हणतात. ज्या अर्थी पुरूष हा स्वयमेव पूर्ण शरीर नसून आपल्या स्त्रीशी समागम पावल्यावरच त्याचा देह पूर्णता पावतो नि प्रजोत्पादनक्षम होतो त्याअर्थी शहाणे लोक भर्ता हीच भार्या, पुरूष हाच स्त्री होय. (ते दोन्ही मिळूनच एक देह, एक जीव होतो असे म्हणतात!)

प्रसंगी स्त्रीने शिल्पवृत्ति करावी

विधाय वृत्तिं भार्यायाः प्रवसेत् कार्यवान्नरः ।
अवृत्तिकर्षिता हि स्त्री प्रदुष्येत्स्थितिमत्यपि।।७४
विधाय प्रोषिते वृत्तिं जीवेन्नियममास्थिता ।
प्रोषिते त्वविधायैव जीवेच्छिल्पैरगर्हितैः।। ७५ -अ. ९

पतीने दूर प्रवासी जाताना पत्नीच्या पोषणाची व्यवस्था करुन जावे. चरितार्थाची सोय नसली म्हणजे चांगली स्त्रीदेखील बिघडण्याचा संभव आहे. पतीमागे पत्नीने नियमपालनाने दिवस काढावे. अगदीच साधन नसेल तर योग्य ते शिल्पव्यवसायही करून पोट भरावे. (ह्या नि पूर्वी स्त्रीस्वभावाविषयी दिलेल्या अनेक श्लोकांवरुन सत्ययुगातील माणसे कलियुगातील माणसांहून काही निराळीं नव्हती हे उघड आहे. तीही 'बिघडत' असत. इतकी वारंवार की, सत्ययुगामध्येही त्यांना निर्बंधाच्या कडीकुलपात ठेवता ठेवता स्मृतिकारांनीही हात टेकून म्हणावे की, 'मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा नाविविक्तासनोऽभवेत् । बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपिकर्षति ।।' )

अनुलोमविवाही वाटणी

ब्राह्मणस्यानुपूर्व्येण चतस्त्रस्तु यदि स्त्रियः ।
तासां पुत्रेषु जातेषु विभागेयं विधिः स्मृतः ।।१४९
त्र्यंशं दायाद्वरेत् विप्रो द्वावंशौ क्षत्रियासुतः ।
वैश्याजः सार्धमेवांशमंशं शूद्रासुतो हरेत् ।। १५० -अ. ९

ब्राह्मणाला चारी वर्णांच्या चार लग्नाच्या भार्या असतील तर त्या चारींच्या मुलांनाही त्यांच्या मातेची वाटणी मिळावी. तीन भाग ब्राह्मणीपुत्र, दोनभागी क्षत्रियापुत्र, दीड वैश्यापुत्र नि एक शूद्रपुत्र. (मातृसावर्ण्य चालू केल्यावरही ब्राह्मणांदिकांकडे भिन्नवर्णीय लग्नाच्या बायका असून त्यांचे पुत्र दायादाचा धार्मिक अधिकार उपभोगीत हे ह्या प्रकारच्या अनेक श्लोकांवरुन उघड आहे. पण नेहमी प्रमाणे त्या खाली लगेच उलट श्लोक दत्त म्हणून उभा आहे की, ‘ ब्राह्मणक्षत्रिय विशां शूद्रापुत्रो न रिक्थभाक!’ ( अ. ९:११५ ) शूद्रास्त्रीच्या पुत्राला वाटा मुळीच देऊ नये!! )

( १० व्या अध्यायात प्रतिलोम विवाहापासून होणाऱ्या संतति कोणच्या जातीत मोडतात त्याचे वर्णन आहे. यावरुन आज चंडाल, अग्र, मांग, निषाद, प्रभृति अस्पृश्य जाती आहेत त्या बहुतेक चातुर्वर्ण्याच्याच रक्तबीजाच्या आहेत असे मनुस्मृतीस सर्वथैव प्रमाण मानणाऱ्यांनी तरी मानलेच पाहिजे. ) उदाहरणार्थ-

शूद्रादयोगवः क्षत्ता चंडालश्चाधमो नृणाम् ।

वैश्यराजन्यविप्रासु जायन्ते वर्णसंकराः ।। १२ -अ. १०

शूद्र पुरुषापासून वैश्यस्त्रीच्या ठायी झालेला तो अयोगव, क्षत्रिय स्त्रीच्या ठायी क्षत्ता नि ब्राह्मण स्त्रीच्या ठायी चांडाल उत्पन्न झाला. (म्हणजे समजा, एका ब्राह्मणास दोन मुली. एक ब्राह्मणाला दिली तिचा पुत्र ब्राह्मण. दुसरी शूद्राला मिळाली तिचा पुत्र चांडाल. म्हणजे आजचे महार प्रभृति अस्पृश्य हे आम्हां ब्राह्मणादिकांचे सख्खे मावसभाऊ आहेत!! त्यांच्यांत आमच्यात एकच रक्तबीज संचरते आहे! पुन्हा ब्राह्मणांनी चांडालादिक स्त्रियांशी विवाह केल्याची उदाहरणे ह्याच स्मृतीतील मागे दिलेल्या श्लोकांतून दिलेलींच आहेत. त्या चंडाल स्त्रिया ब्राह्मणीच होऊनच ‘जगद्वंद्य’ झाल्या! )

जे जे श्लोक प्रक्षिप्त ते ते

वाईटच आहेत असे नाही!

मनुस्मृतीतील महिलाविषयक बहुतेक महत्वाचे श्लोक या लेखमालेची स्थलमर्यादा सांभाळून देता आले तितके येथे दिले. मनुस्मृतीच्या यापुढच्या अकराव्या बाराव्या अध्यायांत या विषयाचे फारसे श्लोकही नाहीत. लेखावकाशही संपला. तेव्हा आता समारोपाच्या वेळी या लेखमालेत, प्रक्षेपक श्लोकांनी मूळ ग्रंथात परस्परविरुद्ध विधानांचा जो धुडगूस घातला आहे त्याविषयी वारंवार जे दोषसूचक उल्लेख करावे लागले त्यांची निःपक्षपाताने दुसरी बाजूही सूचित करणे आमचे कर्तव्य आहे.

राष्ट्राची परिस्थिती जशी बदलत गेली तसे मनुभगवानांचे काही निर्बंध, (कायदे) राष्ट्रहितार्थ पालटणे योग्य वाटूनच पुढील शास्त्रकारांनी त्यांच्या मते लोकहितास त्या नवीन परिस्थितीत ज्या अवश्य त्या नवीन सुधारणा घडवून आणण्यासाठी नवीन निर्बंध स्मृतीत घातले. ह्या हेतूने जे श्लोक मनुस्मृतीत वेळोवेळी घातले गेले ते प्रक्षिप्त असले तरी ते घालणाऱ्यांचा हेतु राष्ट्रहितकारकच होता. लबाडीचा नव्हता. व्यक्तिशः त्यांना त्यामुळे काही विशेष लुबाडायचे नव्हते हे आपण विसरता कामा नये. मूळच्या निर्बंधांना विरूद्ध असे जे श्लोक मागाहून घातलेले दिसतात ते बहुधा नीतिकल्पनांचा आणि सात्विक संयमाचा विकासच व्यक्तविणारे आहेत ही गोष्टच त्या प्रक्षेपकांच्या सद्हेतूचा बळकट पुरावा आहे. असल्या श्लोकांचे प्रक्षेपकच हे त्या त्या काळचे सदिच्छ सुधारकच होते.

उदाहरणार्थ नियोगाची रीत घ्या. आर्यराष्ट्र अल्पसंख्य होते, त्यांच्या शत्रूंचा वेढा अजित होता, राष्ट्रवृद्धी,सुपीक पण निर्जन भूमि वाटेल तेवढी पुढे मोकळी होती- तेव्हा राष्ट्रांचे संख्याबळ वाढविणे हितकर होते. यास्तव कुमारीपुत्र (कानीन) लग्नाच्या वेळी पूर्ण गर्भ असलेल्या कुमारीचा पुत्र (सहोढ) स्वतःच्या पत्नीने पतीस न कळविता परपुरूषापासून उत्पादिलेला पुत्र मानून प्रतिपाळण्याचा उदारपणा राष्ट्रहिताकडे दृष्टि देऊन दाखवावा आणि त्यायोगे आर्यबीजाचा कण नि कण राष्ट्रीय संख्याबळ वाढविण्याकडे उपयोजिला जावा हेच राष्ट्रहिताचे होते. पत्नी ही पतीचे क्षेत्र; त्यात जे उत्पन्न ते पतीच्याच स्वामित्वाचे आहे. ह्या सूत्रान्वये हे सारे पुत्र पुत्राप्रमाणे प्रतिपाळले जावे ही प्रवृत्ति अशा काळी राष्ट्रीय संख्याबळास हितकारक होती. वंशक्षय होऊ नये म्हणूनच धर्म्य मानलेल्या नियोगाचेही हेच समर्थन होय. आजकालच्या जर्मनी, फ्रान्स, इटली, रशिया प्रभृति राष्ट्रांवर जेव्हा जेव्हा संख्याक्षीणतेचे संकट कोसळले तेव्हा तेव्हा वैवाहिक निर्बंध असेच ढिले करावे लागले आणि विवाहबाह्य संततिही या सूत्रान्वये नैर्बंधिक (लेजिटीमेट ॲण्ड लिगल) मानली गेली, उत्तेजकही ठरली.

ती परिस्थिती पालटून आर्यराष्ट्र जिकडे तिकडे फैलावल्यावर संख्याबळाचा प्रश्न विचारात घेतला जाईनासा झाला; नियोगादि चालीत तोच मुख्य हेतु होता याची जाणीवही पुसट झाली; त्या वैवाहिक ढिलेपणाचे शल्य मनास बोचू लागले; त्या प्राचीन रूढीचे दुष्परिणामच तेवढे ठळकपणे दिसू लागले आणि समाजापुढे वैवाहिक नीतीचा उच्चतम आदर्श ठेवणेच त्याच्या हिताचे आहे असे त्या वेळच्या सुधारकांना वाटू लागले. वाढत्या नीतिमत्तेचा हा विकासच होता. यास्तव त्या वेळच्या ब्राह्मणक्षत्रियांनी, ब्रह्मर्षींनी आणि राजर्षींनी, वैवाहिक जीवनास नि स्त्रीपुरूषसंबधास शक्य तितके एकनिष्ठ, प्रामाणिक नि संयत करणारे नवीन निर्बंध प्रचलविले नि नियोगादिक पूर्वधर्म वर्ज्य मानले. त्या वैवाहिक उच्चतर आदर्शाचे समर्पक श्लोक मनुस्मृतीतील पूर्वश्लोकांच्या आगेमागे प्रक्षेपून त्या निर्बंधासही मनूच्या नांवाचा आसरा घेतला. या मद्यपान-निषेध, नियोगत्याग, मांसाशनत्याग, यज्ञहिंसानिषेध, कानीनादि पुत्रांचा निषेध प्रभृति प्रकरणी तरी सत्ययुगातील पूर्वाचार्यांपेक्षा अर्वाचीन आचार्यांचा, धर्माचा नि नीतीचा आदर्शच अधिक संयमशील, दयादाक्षिण्यशील नि सत्यशील असलेला आढळतो. सत्ययुगीन निर्बंधांनी ज्या भोगांना ते प्रकटपणे भोगू शकत अशा अनेक स्वैरभोगास या नव्या आचार्यांना त्यांच्या स्वतःच्या या कडक नव्या निर्बंधांमुळे आंचवावे लागले. पण हे कळत असूनही त्यांनी आपल्या स्वैरतेवर आपण होऊन कडक बंधने घालून घेतली हे त्या ब्राह्मण शासनकारांच्या नि क्षत्रियशास्त्रगोप्त्यांच्या समाजहितार्थ केलेल्या त्यागाचे नि उच्चतर नीतिमत्तेचेच दर्शन आहे. खरोखर, सत्ययुगीन, धर्मापेक्षा हे कलियुगीन धर्मच अधिक धर्मशील आहेत. कारण ह्या प्रक्षेपक अर्वाचीन आचार्यांनी प्राचीनात जे एकंदरीत वर्ज्य तेच बहुधा कलिवर्जात वर्ज्य ठरविले आहे.

ह्या गडबडगुंड्याचा सारा दोष आमच्या 'शब्दनिष्ठ सनातन' प्रवृत्तीचाच आहे!

प्रक्षेपकांचा हेतु चांगलाच होता हे वर दाखविले. आता सगळयांत मोठा दोष म्हणजे त्यांनी त्यांना चांगल्या वाटणाऱ्या सुधारणा स्वतःच्या श्लोकांत स्वतःच्या नांवावर न प्रसिद्धता प्राचीन मनुस्मृतीत मनूच्या नावे दडपून दिल्या हा होय. यायोगे त्या साऱ्या ग्रंथाची खिचडी होऊन मूळ मनु काय म्हणतात नि प्रक्षेपकांचे

प्रक्षिप्तमत कोणते हे निश्चितपणे सांगणे दुर्घट झाले. ही धादांत लबाडी होती. परंतु ती करण्यातही त्या प्रक्षेपकांचा हेतु एकंदरीत परोपकारच होता. कारण जे जे नवीन ते ते चांगले आहे म्हणून न स्वीकारता ते श्रुतिपुराणोक्त असले तरच स्वीकार्य होय असा दंडक अगदी मनूपासूनच आमच्या रोमरोमी खिळलेला होता. वेदांत आहे तेच मी सांगतो, अशा खऱ्याखोटया शपथा मनूलादेखील वारंवार ह्या स्मृतीत घ्याव्या लागल्या. तेव्हा मनुस्मृति धर्म्य ठरु शकली. स्वतः मनुस्मृतीतही 'इतर स्मृति खोट्या आहेत, त्या पाळू नका' हे सांगताना अगदी शेवटच्या १२ व्या अध्यायात ९६ व्या श्लोकात सांगितले आहे की,

'तान्यर्वाक्कालिकतया निष्फलान्यनृतानि च' १२-९६

त्या मनुस्मृतीहून इतर स्मृति त्याज आहेत का? त्यांतील निर्बंध समाजहितास बाधक आहेत असे सिद्ध होते म्हणून नव्हे, तर मुख्यत्वेकरुन त्या एकाच महाकारणासाठी! अर्वाक्कालिकतया! त्या अर्वाचीन आहेत म्हणून!! जे जे अर्वाक्कालीन, अद्यतन, अद्ययावत् ते ते टाकाऊ असलेच पाहिजे - हा मनूचाच दंडक! त्यामुळे पुढच्या शास्त्रकारांना आपल्या सुधारणा लोकांच्या गळी उतरविण्यास आपले श्लोक मनूच्या प्राचीन स्मृतीतच दडपण्यावाचून गत्यंतर उरले नाही! हा दोष मुख्यतः त्या प्रक्षेपकांचा नसून त्याचे खापर पुष्कळ अंशी ह्या आमच्या पूर्वापार 'शब्दनिष्ठ सनातन' प्रवृत्तीवरच फोडले पाहिजे!

ऐतिहासिक दृष्टीने मात्र ही अडचण
मुळीच पडत नसून सारा उलगडा
समाधनकारकपणे होतो.

परंतु कोणचा श्लोक प्रक्षिप्त, कोणचा मूळ, कोणचा वेदनिष्ठ नि कोणचा वेदबाह्य, ही भानगड ऐतिहासिक दृष्टीने हा ग्रंथ वाचणाऱ्या आम्हासारख्यांस मुळीच नडत नाही. तो एक ऐतिहासिक चर्चेचा विषय इतकेच त्याचे महत्व. राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत राष्ट्रधारणास जो श्लोक उपयुक्त वाटेल तो, मनूचा असो, प्रक्षिप्त असो, तो आम्ही आचरू; जेथे तो परवडणार नाही तेथे राष्ट्रहितसाधक असे अद्ययावत् ज्ञानाच्या कसोटीस उतरणारे नवीन निर्बंध करू. खरेखोटे, चांगलेवाईट, हे ठरविण्याची 'अर्वाककालिकता' ही एकमेव कसोटी आहे हे आम्हांस मुळीच मान्य नाही. तसेच जुने ते सोने हे जसे कधी खरे असते तसे जुने ते शिळे हेही खरेच असते.

मनूचे अक्षर नि अक्षर खरेच, ती स्मृति सुसंगतच आहे असे मानणाऱ्या शब्दनिष्ठ सनातन्यांनाही तीतील शेकडो धडधडीत अन्योन्यविरुद्ध श्लोकांचा समन्वय लावता नाकी नव येऊन शेवटी प्रत्येक टीकाकार मनुस्मृतीचे श्लोक जरी पालटत नाहीत तरी अर्थ फिरवून एकेक नवीन मनुस्मृति लिहितो. मनूत मांस खाणे धर्म्य आहे असे म्हणून ब्राह्मणांच्या काही जातीच्या जाती मांस खातात. काही मांस वर्ज्य पण मासे धर्म्य म्हणून मनूच्या नावे मासे खातात, काही मनू दोन्ही वर्ज्य मानतो असा समन्वय लावून केवळ शाकाहार करतात! ही प्राचीन परंपरा आजही चालवून कोणी अनुलोम विवाह मनूच्या नावे अधर्म्य समजतात तर कोणी त्याच मनूच्या नावे आज धडधडीत प्रतिलोम विवाह 'शास्त्रोक्त' मानून ब्राह्मणाची

मुलगी वैश्यास देतात! अशी बिचाऱ्या मनूच्या शब्दाशब्दाची कुतरओढ होऊन आजही मनुस्मृतीच श्लोकांची एकच प्रत असता तिच्या अर्थाच्या पाचशेजणांनी पाचशे मनुस्मृत्या करुन सोडल्या आहेत!

पण ऐतिहासिक दृष्टीच्या वाचकांना तसा दुसराही शब्दच्छल करण्याच कारणच पडत नाही. आजची मनुस्मृति एकटाकी, सुसंगत, एका ग्रंथकाराची मूळस्मृति नाही ; ती एक भिन्न मतांची संकलित संहिता आहे. वेदकाळच्या इतिहासाप्रमाणे ज्या रूढि अत्यंत प्राचीन ठरतात त्यांचे समर्थक श्लोक पहिले, त्यानंतरच्या इतिहासकालात ज्या रुढी गळलेल्या आढळतात त्यांच्या - नियोग, मांसाशनप्रभृति - निषेधाचे श्लोक त्यानंतरचे प्रक्षिप्त, अशा इतिहासाच्या स्वतंत्र पुराव्याने प्रक्षिप्त श्लोकांची छाननी एकंदरीत बरोबर करता येते. तरीही अमुक श्लोक मूळचा वा प्रक्षिप्त आहेच आहे असा दुराग्रहही धरणे दुर्घट आहे - इतकी ती खिचडी शिजून एकजीव झालेली आहे - हेही ऐतिहासिक वाचक विसरत नाही. शेवटी कोणचाही श्लोक मूळचा म्हणून चांगला, प्रक्षिप्त म्हणून वाईट वा स्मृतीतला म्हणूनच अनुल्लंघ्य असे मानीत नाही; तर आजच्या राष्ट्रीय परिस्थितीत हितकारक असेल तर मानतो, नाहीतर तसा हितकारक तो नवीन निर्बंध नवीन म्हणून चक्क सांगून स्वीकारतो. विज्ञाननिष्ठ, प्रत्यक्षनिष्ठ, अद्ययावत् प्रवृत्ति हीच. ह्याच प्रवृत्तीने नि ह्याच ऐतिहासिक दृष्टीने मनुस्मृतिच नव्हे, तर श्रुतिही वाचल्या असता त्यांच्या अर्थाची दुर्दशा न होता तो पुष्कळ अधिक सरळपणे लागतो, त्या ग्रंथाची नसती विटंबना टळते.

शेवटी या लेखमालेच्या आरंभी दिलेल्या कारणासाठी या प्राचीन नि पूज्य महाग्रंथाची थोरवी आठवून नि त्याचे आमच्या हिंदुराष्ट्रावर शतकानुशतके झालेले उपकार स्मरून, एका काळी जपानपासून यवनद्वीपापर्यंत ( ग्रीसपर्यंत ) धर्मग्रंथ वा निर्बंधशास्त्र म्हणून मूर्धाभिषिक्त्व पावलेल्या नि शतभाषांतून भाषांतरिलेल्या त्या मनुस्मृतीस नि मनुभगवानांसच नव्हे तर, भृगुसंहितेस नि भृगुऋषींसही वारंवार वंदून आम्ही ही लेखमाला संपवितो.

प्राचीन यहुदी योषिता

लेखांक १ ला

स्त्री मासिकात मागे आम्ही मनुस्मृतीतील महिला हा लेख लिहून त्यात सरासरी तीन हजार वर्षांपूर्वी आपल्या आर्य स्त्रियांची राहणी, समाजातील स्थान, अवस्था नि वागणूक कशी असे ते दाखविले होते.

त्याच प्राचीन काळी आपल्या आर्य स्त्रीप्रमाणेच भारताबाहेर पॅलेस्टाईन, सिरिया प्रभृति प्रांतांतून निवसणाऱ्या दुसऱ्या एका प्रख्यात जातीतील इस्त्रायल वा यहुदी राष्ट्रातील स्त्रियांची वागणूक कशी असे, स्त्रीविषयी त्या तीन चार हजार वर्षांपूर्वीच्या भारताबाहेरील राष्ट्रांच्या काय कल्पना, भावना नि निर्बंध असत, स्त्रीविषयक त्यांची नीति कशा प्रकारची असे, ती माहितीही सामान्य महिला वाचकांना मनोरंजक नि विदुषी महिलांना तर अभ्यसनीयही वाटल्यावाचून बहुधा राहणार नाही. त्याविना तीनचार हजार वर्षांपूर्वी आर्य महिला कशी असे, हे ज्यांनी वाचले असेल, त्यांना त्याच काळी आर्येतर महिलांचीही भारताबाहेर काय अवस्था नि नीतिमत्ता होती ते जाणण्याची उत्कंठा सहजच वाटणार. त्या दृष्टीने मनुस्मृतीतील महिला या लेखाचा हा 'यहुदी योषिते' वरील आजचा लेख एक पूरक उत्तरार्धच होणार आहे.

मनुस्मृतीतील महिलेची रुपरेखा आखताना ती तुटक तुटक निर्बंधाच्या रूपानेच आखणे भाग होते. कारण, मनुस्मृति हे काही कथानक नसून तो एक निर्बंध ग्रंथ (लॉ बुक) आहे. तीत नुसते निर्बंध, नियम, विधिनिषेध तेवढे क्रमवार दिलेले आहेत. परंतु ही यहुदी योषितेची जी रुपरेखा या लेखात आखावयाची आहे, तिला मुख्य आधार एका कथानकमय धर्मग्रंथाचाच असल्यामुळे प्राचीन यहुदी योषिता कशी असे ते एका मनोरंजक कथानकातून वर्णावयाचे. एखाद्या आख्यानासारख्या सोप्या नि सरस गोष्टी सांगता सांगताच समजून देण्याची सोय अनायासेच होणारी आहे.

यहुद्यांचा हा प्राचीन धर्मग्रंथ आपल्या वेदांसारखाच ईश्वरी संदेश समजला जातो. अब्राहाम, मोझेस प्रभृति ईश प्रेषितांना देवाने स्वतः सांगितलेल्या आणि काही स्फूर्तविलेल्या आज्ञा त्यात दिल्या आहेत. तसाच सृष्टीच्या उत्पत्तीपासूनचा इस्त्रायल - यहुदी - लोकांचा नि ह्या त्यांच्या ईशदूतांचा इतिहासही त्यातच आहे. त्या इतिहासावरून नि त्या आज्ञांवरूनच प्राचीन यहुदी योषितेची मूर्ति आपणांस घडविता येते. ह्या धर्मग्रंथास जगातील आज उपलब्ध असलेल्या यच्चयावत् धर्मग्रंथामध्ये वेदाच्या खालोखालचे महत्व दिले पाहिजे.

यहुद्यांचा हा 'जुना करार' नांवाचा धर्मग्रंथ त्यांच्या परंपरेच्या कालगणनेप्रमाणेच इ.स. पूर्वी ४००० वर्षाच्या इतिहासापासून तो ख्रिस्ती शकाच्या आरंभापर्यंतचा वृत्तान्त देणारा आहे, असे ते मानतात. ऐतिहासिक दृष्ट्याही तो ३००० वर्षाचा तरी असलाच पाहिजे. त्यात इतर कोणत्याही प्राचीन धर्मग्रंथाप्रमाणे प्रक्षिप्त वा प्रलुप्त भाग हे असणारच. पण एकंदर ग्रंथ असा इतक्या प्राचीन कालाचाच आरसा आहे हे निःसंशय. इतक्या प्राचीन काळची यहुदी योषिता कशी असे नि स्त्रीजातिविषयक कल्पना नि वागणूक त्या प्रसिद्ध राष्ट्रात कोणती होती ते दाखविणारे मूळचे काही श्लोक नि त्यांच्या संदर्भापुरते कथानकातील वेचक श्लोक यांचे भाषांतर या लेखात देत आहोत. त्या कालच्या त्या राष्ट्राच्या इतिहासास

हा एकच ग्रंथ खास आधार आणि अनन्य असे सुख्य साधन आहे. जगातील अति प्राचीन धर्मग्रंथातील एका धर्मग्रंथाची तोंडओळखही त्यायोगे, अभ्यासू विदुषींना अनायासेच होईल.

ह्या 'जुन्या करारा' तील पहिला विभाग 'सृष्ट्युत्पत्ति' (जेनेसिस) हा होय. त्याच्या पहिल्याच अध्यायात स्त्रीची उत्पत्ति कशी झाली त्याविषयीची दिलेली कथा अशी:-

स्त्रीची उत्पत्ति

अगदी आरंभी ईश्वराने आकाश नि पृथ्वी निर्मिली. पृथ्वी आकार नसलेली एक पोकळी होती. अगाध समुद्र अंधारात गुरफटलेला होता. त्या जलावर ईश्वरी तेज तळपले. देव म्हणाला, 'प्रकाश पडो!' आणि प्रकाश पडला. देवाने पाहिले नि प्रकाश त्याला आवडला. त्याने प्रकाशास अंधेरापासून वेगळे केले, आणि देवाने प्रकाशाला दिवस म्हटले नि अंधेराला रात्र. ती सकाळ नि संध्याकाळ हाच (जगाचा) पहिला दिवस! आणि देव म्हणाला 'जलाच्या अगदी मध्ये अंतरिक्ष होवो! ' तसे झाले. आणि देव म्हणाला 'त्या अंतरिक्षामुळे दुभंगलेल्या जलापैकी वरची जलाशये वर नि खालची खाली वेगळीं राहोत!' तसेच झाले. तो दुसरा दिवस. आणि देव म्हणाला, खालची सारी जले एकवटोत नि कोरडी भूमि प्रकटो!' तसे झाले. देव तिला पृथ्वी म्हणाला नि त्या पाण्यांना समुद्र. देवाने ते पाहिले नि ते त्याला आवडले. आणि देव म्हणाला, 'पृथ्वी आता तृण, वृक्ष, वनस्पति बीज फलादिकांना निर्माण करो!' तसेचं झाले. देवाला ते आवडले. तो तिसरा दिवस. आणि देवाने दोन मोठे तेजोदीप निर्मून एकाला दिवस नि दुसऱ्याला रात्री पृथ्वीवर उजेड असावा म्हणून प्रकाशण्यास सांगितले. देवाने तारेही निर्मिले. हा चौथा दिवस. आणि देव म्हणाला, 'आता जलातून नाना प्रकारचे प्राणी, पक्षी मासे निर्माण होवोत! ' ते तसे झाले. तो पाचवा दिवस. आणि देव म्हणाला, आता पृथ्वी पशु, कृमि, सर्प, प्राणी यांना प्रसवो. तसेच झाले. आणि देव म्हणाला, 'आता आपण मनुष्य निर्मूया! अगदी आपल्याच मूर्तीप्रमाणे, आपल्याच सारखा! ' आणि देवाने मनुष्य तसा अगदी देवासारखाच निर्मिला. स्त्रीपुरूष दोघेही! आणि देव त्यांना म्हणाला, या पृथ्वीवरील नि समुद्रातील सर्व पशुपक्षी, मत्स्य, वनस्पति, प्रभृति वस्तूंवर तुमची सत्ता चालो! तुमचा वंश वाढवा, सुखाने नांदा!' तो सहावा दिवस.

(अध्याय दुसरा) - अशा प्रकारे स्वर्ग, पृथ्वी नि हे सारे निर्मिले गेले. आणि सहा दिवस ही कामे करुन सातव्या दिवशी देवाने विश्रांति घेतली. देवाने त्या दिवसाला सुटीचा दिवस म्हणून वरदान दिले. (सरकारी शाळेतील मुलांना नि कचेऱ्यांना यासाठीच रविवारी सुटीचा हक्क आहे! -लेखक)

असे सर्व निर्मिले, पण कसे? तर पृथ्वीवर कोणीही मनुष्य नांगरण्यास नसता आणि पाऊसही पडू लागण्याच्या पूर्वीच देवाने सारी धान्ये, फळे, वृक्ष आपणच निर्मिली.

आणि नंतर देवाने पृथ्वीच्या मातीपासून मनुष्य घडविला. त्या मातीच्या मूर्तीच्या नाकपुड्यांमधून देवाने चैतन्याचा श्वास आत घातला आणि मनुष्य जिवंत झाला. नंतर देवाने ईडनला एक सुरेख उद्यान लावले. सुरेख नि रुचिर अशा प्रत्येक प्रकारच्या फळांनी ते उद्यान भरलेले असून त्याच्या मध्यभागी जीवनाचा वृक्ष होता आणि दुसरा सदसद् ज्ञानाचा वृक्ष! त्या बागेतून ज्या नद्या एथिओपिया, नि असीरिया इकडे वाहत जातात त्या सर्वच पाण्याचा पुरवठा करीत होत्या. अशा त्या बागेत देवाने मातीचा केलेला तो

पहिला मनुष्य स्थापला नि त्याला सांगितले, ‘तू येथील सारी फळे यथेच्छ खा! पण ह्या सद्सद् ज्ञानाचे फळ मात्र खाऊ नकोस! नाही तर जीवनास मुकशील!’

आणि देवाला वाटले की, ह्या मनुष्याने एकटे असावे हे काही बरे नाही. त्याला एक सहचर नि सवंगडी हवा. मी तो निर्मिणार! देवाने पृथ्वीपासून उत्पादिलेले सारे प्राणी, पशु-पक्षी त्या आदमच्या - आदि मानवाच्या - पुढे आणले त्यांना आदमने ज्या ज्या नांवाने संबोधिले ती तीच त्यांची नावे पुढे पडली; पण त्या सर्वांमध्ये आदमला सवंगडी नि सहचर असा एकही सापडला नाही.

तेव्हा प्रभूने आदमला झोपी घातले. ते गाढ झोपेत असता देवाने त्याची एक बरगडी काढली आणि तिथला घाव मांसाने भरून काढला. नराच्या त्या बरगडीचीच देवाने एक नारी केली नि आदमच्या समोर आणली!

तिला पाहताच आदम म्हणाला, ‘अहाहा, ही तर माझ्या अस्थीचीच अस्थि, रक्तमांसाचे रक्तमांस! हिला नारी (वूमन) हेच नावे हवे. कारण ती नरापासूनच (आऊट ऑफ मॅन) घडविली गेली!’ यासाठीच पुरुष हा आपल्या मातापित्यांना सोडून स्त्रीशीच संलग्न होईल. ती त्याची अर्धांगी. तो नि ती मिळूनच ते पूर्णांग!

‘आणि ती दोघेही अगदी नग्न होती तो पहिला पुरुष नि ती त्याची पहिली पत्नी. त्या दोघांनाही त्या नग्नतेत संकोचास्पद असे काहीच वाटले नाही.’

जगातील पहिल्या पतिपत्नींचा संसार

(अध्याय तिसरा) - पण ईश्वराने निर्मिलेल्या त्या साऱ्या सृष्टीत जो पुरता लबाड होता, तो साप त्या पहिल्या स्त्रीला म्हणाला, ‘ऐक, देवाने ह्या उद्यानातील सर्व वृक्षांची फळे खावयाची अनुज्ञा तुम्हांला दिली आहे ना?’ ती स्त्री म्हणाली. ‘पण ज्ञानवृक्षाचे फळ मात्र वर्ज्य, ते खाताच मराल!’ असे देव म्हणाला. सर्प म्हणाला, ‘छट् मराल कसल! देवाला हे ठाऊक आहे की, ज्ञानवृक्षांचे फळ का एकदा मनुष्याने खाल्ले, की त्याचे डोळे उघडतील आणि सदसद् ते काय हे सारे तुम्हांस समजू लागून तुम्ही माणसे देवासारखीं व्हाल.’

हे ऐकताच त्या स्त्रीला त्या दृङ्मोहक नि रूचकर अशा ज्ञानवृक्षाचे फळ खावेसेच वाटले. ज्यायोगे सद्सद्विवेकबुद्धि येते ते फळ शेवटी तिने स्वतः खाल्ले नि आदमलाही दिले. तिच्या त्या पतीनेही ते खाल्ले.

त्यासरशी त्या दोघांचेही डोळे उघडले आणि आपण नागवे आहोत याची त्यांना जाणीव झाली. त्या दोघांनीच लगेच अंजिराची पाने शिवून त्यांची अंगवस्त्रें केली.

इतक्यात दुपारी त्या उद्यानाची शीतलता उपभोगीत हिंडणाऱ्या देवाची चाहूल लागून आदम नि त्याची पत्नी देवास दिसू नये म्हणून झाडाआड लपली. तेव्हा प्रभूने त्यांना हाक मारून विचारले, ‘तू कुठे आहेस?’ आदम म्हणाला ‘तुझा आवाज ऐकून मी लपलो. कारण मी नागवा होतो, म्हणुन तुमची मला भीति वाटली!’ देव म्हणाला, ‘काय, तुला कोणी सांगितले की तू नागवा आहेस? तू त्या झाडाचे फळ खाल्लेस की जे खाता कामा नये म्हणून मी बजावले होते.’ तो पुरुष म्हणाला, ‘ज्या स्त्रीला तुम्ही माझी सांगातीण म्हणून मला दिलीत तिनेच ते फळ मला दिले नि मी खाल्ले.’

तेव्हा प्रभूने त्या स्त्रीला विचारले, 'तू हे काय केलेस? बोल!' स्त्री उत्तरली, 'त्या सापाने मला भुलविले नि मी ते खाल्ले.' तेव्हा देव त्या सर्पाला म्हणाला, 'हे ज तू केलेस, त्याचे प्रायश्चित्तही आता भोग. सर्व प्राण्यांत तू नीच नि नष्ट समजला जाशील. पोटावर फरपटत राहशील नि जन्मभर धूळ काय ती खात पडशील. स्त्रीत नि सर्पात ह्यापुढे सर्वदा वाकडे राहील. तिची संतति तुझ्या संततीचे डोके चिरडील नि तुझी प्रजा तिच्या प्रजेच्या टाचा चावतील! हा घे शाप!'

आणि स्त्रिये, तुझे गर्भ नि तुझीं दुःखे मी शतगुणित करीन. मुलास जन्म देताना तुला वेदना होतील. नवऱ्याच्या इच्छेत तुला राहावे लागेल, नि तुझा नवरा तुझ्यावर सत्ता गाजवील. हा घे तुला शाप!'

आणि हे आदम, ज्याअर्थी मी नको खाऊ म्हटले तेच तू या तुझ्या बायकोच्या नादी लागून खाल्लेस. त्याअर्थी तुझ्या प्रकरणी ही भूमिही अभिशप्त असो. काबाडकष्टावाचून तिचे फळ तुझ्या हाती पडणार नाही. काटेरी झाडेझुडपे तिच्यावर वाढतील. तिचा झाडपाला तुला खावा लागेल. काबाडकष्टाच्या घामातच भिजलेली भाकर तुला खाल्ली पाहिजे आणि शेवटी ज्या भूमीतून तुला मी काढले तीतच तू गाडला जाशील. कारण की, तू मातीच आहेस नि मातीलाच मिळशील!

नंतर आदमने आपल्या बायकोचे नावे ईव्ह असे ठेवले. कारण ती यच्चयावत् प्रजेची मूळ माता होय. मग देवाने आदमला नि त्याच्या बायकोला कातडयाचे कपडे शिवले नि त्यांना ते घातले. नंतर देव उद्गारला, 'अहो, या ज्ञानवृक्षाचे फळ खाल्ल्यामुळे माणूस हा आता चांगले काय नि वाईट काय हे ओळखू लागला. तो आम्हांसारखाच झाला. कोणी सांगावे की, तो आता ह्या दुसऱ्या जीवनवृक्षाला सुद्धा हात लावणार नाही म्हणून? जर का त्याने ते जीवनवृक्षाचे फळही खाल्ले आणि देवासारखाच अमर झाला तर!' असे चिंतून देवाने आदमला नि त्याच्या बायकोला त्या ईडनच्या उद्यानातून हाकून लावले नि त्या उद्यानाच्या पूर्वद्वारी एक जळती तरवार लटकत ठेविली. ती एकसारखी सर्व दिशांनी फिरत राही. त्या जळत्या तरवारीचा नि देवदूतांचा त्या जीवनवृक्षाभोवती असा खडा पहारा उभा केला! आणि तेथून हुसकलेला तो माणूस त्या उद्यानाबाहेर भूमि नांगरण्यास लावला.

(अध्याय ४ ते ९) - पुढे आदमचा त्याची पत्नी ईव्ह हिच्याशी संबंध होऊन तिला गर्भ राहिला. तिचा तो पुत्र 'केन'. तिला दुसरा पुत्र झाला तो, 'अवेल' त्या दोघा भावांत वितुष्ट येऊन केनने अवेलला ठार मारले. केनने आपल्या पत्नीशी संबंध केला नि तिला गर्भ राहून पुत्र 'एनाक' हा झाला. (पण आदम नि ईव्ह हे जर मनुष्य जातीचे पहिलेच जोडपे होते आणि केन हा त्यांचा पुत्र तर त्याला बायको कोठून मिळाली? ती ही त्या पहिल्या जोडप्याचीच मुलगी, त्याची बहीण. कारण तिला उपजविणारे दुसरे जोडपेच तोवर जगात नव्हते.) पुढे आदमपासून ईव्हला तिसरा पुत्र झाला. तो 'सेथ'. त्या सेथला एक मुलगा झाला. (कोणापासून?) त्याचे नावे 'एनास'. त्यानंतर पुष्कळ मुले नि मुली होऊन आदम हा नउशे तीस वर्षांचा होऊन वारला.

जलप्रलय

पुढे वंश वाढता वाढता लामेक याला 'नोहा' हा पुत्र झाला. अनेक मुली-मुले झाल्यानंतर ७७० वर्षांचा होऊन लामेक वारला. नोहाला तीन पुत्र झाले. शेम, हेम, जाफेथ ... ही मनुष्य प्रजा वाढता वाढता त्यांच्यात

फार पाप माजले. इतके की, देवाला वाटले, मी कुठून ह्या पृथ्वीवर हा मनुष्य प्राणी उत्पादिला! आणि देव म्हणाला, 'मी ह्या मनुष्यांचा नि साऱ्या प्राण्यांचा आता सर्वनाश करुन टाकणार!' पण नोहा तेवढा देवाला आवडत असल्यामुळे देव त्याला म्हणाला, 'ह्या पापी जगाचा मी नायनाट करणार, पण तुला वाचवीन. मी मोठा जलप्रलय धाडणार आहे. तर तू एक नाव कर, नि त्यात तू, तुझी बायको, मुले नि सुना इतके बसा.' त्याप्रमाणे नोहाने केले. (या पुढे त्या अद्भूत जलप्रलयाचे सविस्तर वर्णन दिले आहे. तो जलप्रलय फुगत फुगत जाऊन त्यात पर्वतांची शिखरे, पदार्थ नि माणसे बुडाली. पण नोहाची बंद नाव तरंगत होती.) तो महापूर दीडशे दिवस पृथ्वीला बुडवून राहिला होता. तोच देवाला नोहाची आठवण झाली आणि त्याने पाणी उतरविले. समुद्राचे फुटलेले झरे आणि आकाशाच्या उघडलेल्या खिडक्या पुन्हा बंद केल्या आणि अराराट पर्वताच्या शिखरावर ती नाव लागली. तेव्हा देवाच्या आज्ञेने नोहा पृथ्वीवर सहकुटुंब उतरला. त्याने एक स्थंडिल केले. त्यावर मेध्य अशा पशुपक्ष्यांचे मांस हवन केले. त्या होमिल्या जाणाऱ्या मांसाच्या सुवासाने प्रसन्न होत्साता देव म्हणाला, 'मी तुझ्याशी करार करतो की, मनुष्याच्या अपराधासाठी यापुढे मी अशी सारी पृथ्वीच दंडिणार नाही. मनुष्य स्खलनशीलच आहे! पुन्हा जलप्रलय केव्हाही होणार नाही! भिऊ नकोस! याची खूण म्हणून मी आकाशात हे इंद्रधनुष्य उगवतो पहा! हेच माझें आश्वासन ...' (अध्याय ९)

नंतर नोहाने शेती केली. द्राक्षे लावली. एक दिवस प्रमाणाबाहेर द्राक्षाची दारू पिऊन नोहा गुंग झाला. आपल्या तंबूत तो नागवा उघडा पडला. हे त्याचा पुत्र हेम याने पाहिले. त्याच्या इतर दोन्ही मुलांनी वस्त्र घेऊन तिकडे तोंड न करता मागे मागे सरकत जाऊन नोहाच्या अंगावर वस्त्र घातले. नोहा शुद्धीवर आल्यानंतर त्याने आपल्या ज्या पुत्राने आपल्यास उल्लिंग पाहिले त्या हेमला शापिले. वयाच्या ९५० व्या वर्षी नोहा वारला.

(यापुढे अध्याय दहाव्यात नोहाच्या मुलांचे वंशविस्तार दिले आहेत.)

भाषांची फाटाफूट

(अध्याय अकरावा) - तेव्हा ही सारी पृथ्वी एक भाषीच होती. सारी माणसे एकच बोली बोलत. शिनारच्या मैदानात ती माणसे आल्यावर (ख्रिस्तपूर्व २५०० वर्षांच्या संधीस ही यहुदीय पुराणगणना) ती माणसे म्हणाली, 'चला, आपण विटा पाडूया, त्या भाजूया आणि स्वर्ग गाठील इतका एक उंच स्तंभ नि एक नगर बांधू या!' जेव्हा देव ते नगर आणि कीर्तिस्तंभ पाहण्यास आला तेव्हा तो म्हणाला, 'अहो ही सारी माणसे एक झाली, एकच बोली बोलता. त्याचा हा परिणाम. त्यांनी आता हे करावयास आरंभिले! असेच चालले तर मनुष्य वाटेल ते करु शकेल. छट्, आपण खाली जाऊन त्यांची फाटाफूट केली पाहिजे आणि त्यांची भाषा गोंधळून टाकली पाहिजे. एकाची बोली दुसऱ्यास समजता कामा नये!' आणि देवाने तसेच केले. म्हणूनच त्या स्थळास 'बाबेल' म्हणतात. कारण तिथूनच देवाने पृथ्वीवरील एक भाषा मोडून तिच्या परस्परांशी भिन्न अशा अनेक भाषा केल्या आणि साऱ्यांना देशोदेशी पांगून दिले!

पैगंबर अब्राहाम नि त्यांची पत्नी सराई यांची कथा

आता तेराहची वंशावळ अशी: तेराहचे तीन पुत्र. अब्राहम, नाहर, हारन. हारनने 'लॉटला' जन्म दिल्यानंतर तो वारला. अब्राहाम याने लग्न केले. त्याच्या बायकोचे नावे सराई. अब्राहामचा बाप २०५

वर्षांचा होऊन वारला. तेव्हा प्रभु अब्राहामला म्हणाला, ‘तुझ्या वडिलांच्या देशाला नि घराला सोडून दे नि मी सांगतो तिकडे चल! मी तुझें एक मोठें राष्ट्र बनवीन, तुझें नावे जिकडे तिकडे गाजेल. ज्याला तूं आशीर्वादशील त्याला मी आशीर्वादीन, शापशील त्याला शापीन.’ देवाच्या या सांगण्याप्रमाणे अब्राहाम हा आपली बायको सराई नी पुतण्या लॉट हयांसह घर सोडून निघाला. नंतर फिरत फिरत बेथल येथे येऊन त्याने तंबू ठोकला. तिथे स्थंडिल उभारुन त्याने प्रभूस प्रार्थिले. आणखी पुढे प्रवासात अब्राहाम जातों तों दुष्काळात सांपडला, म्हणून शेवटी इजिप्तकडे गेला.

बायकोला बहीण म्हटलें

आणि जसा तो इजिप्तच्या अगदी जवळ आला तसा तो आपली बायको जी सराई तीस म्हणाला, ‘हे बघ, तू दिसायला एक सुरेख स्त्री आहेस, हे मी ओळखून आहे. यामुळे मला वाटते की, आपण इजिप्तमध्ये जाताच जेव्हा ते अजिप्शियन तुला पाहतील तेव्हा म्हणतील, ही तर ह्याची बायको! आणि म्हणून ते मला मारतील पण तुला वाचवतील! तेव्हा हे भार्ये, कृपा कर, नि तू माझी बहीण आहेस असे सर्वांना सांग, म्हणजे तुझ्या रूपाच्या वशिल्याने माझे दिवस सुखात जातील नि तूच मला जीवदान दिल्यासारखे होईल.’

नंतर काय झाले की, ते इजिप्तमध्ये जाताच तेथील लोकांनी पाहिले की, ती स्त्री फारच सुरेख आहे. तेथील राजा जो फाराहो त्याच्यापर्यंत तिच्या रूपाची कीर्ति गेली आणि फाराहोने तिला आपल्या अंतःपुरात घेतले.

‘आणि तिच्या वशिल्याने फाराहोने अब्रहामलाही फार चांगले वागविले. शेळया, बैल, गाढवे, दासदासी अशी विपुल संपत्ति अब्राहामला राजाने दिल्यामुळे त्याची चंगळ झाली.

पण पुढे देवाने सराईला अंतःपुरात घेणाऱ्या फाराहोच्या घरी दारी रोगाची साथ धाडली. तेव्हा अब्राहामला बोलावून फाराहो म्हणाला,‘अरे, हे तू काय केलेस? ती तुझी बायको आहे हे का सांगितले नाहीस? ती तुझी बहीण आहे असे न फसवितास तर मी तिला माझी बायको करतो ना! आता झाले ते झाले. तुझी बायको तू घे नि तुझी वाट धर. असे सांगून अब्राहामला त्याची बायको देऊन त्याला पूर्वी दिलेल्या विपुल संपत्तीसह फाराहोने धाडून दिले. (अध्याय १२ वा)

(अध्याय तेरावा) - अब्राहाम, त्याचा पुतण्या लॉट हयांसह इजिप्त सोडून बाहेर पडला. ते दोघेही धनधान्य पशु यांनी आता संपन्न होते. एकदा लॉटच्या मेंढपाळांत नि अब्राहामच्या मेंढपाळांत तंटा झाला तेव्हा स्वसंतोषाने आपण निराळे होऊ असे अब्राहाम म्हणाला आणि त्याला जी दिशा आवडली, त्या दिशेला लॉट दासदासी पशूंसह निघून गेला.

तेव्हा प्रभू अब्राहामला म्हणाला,‘ऊठ नि या चारी दिशांना पाहा. तुला दिसतो तो सारा प्रदेश मी तुलाच नि तुझ्या संततीलाच सदोदितचा देणार! आणि तुझी संतती मी धुळीचे कण जसे अगणित तशी असंख्य वाढविणार! ऊठ नि या साऱ्या प्रदेशाची रुंदी नि लांबी चालत जा. कारण तो सारा प्रदेश मी तुलाच देणार! ‘अब्राहामने तसेच केले नि माम्रेला तंबू ठोकला. देवाचे स्थंडिलही बांधले. पण लॉटला बायकांमुलासुद्धा शत्रूने पकडले हे एकून अब्राहामने शत्रूवर हल्ला करुन लॉटला बायकांसह सोडविले (अध्याय १५)

निःसंतान अब्राहामची नि सराईची चिंता

(अध्याय १५-१६) - नंतर एके दिवशी प्रभु अब्राहामला म्हणाला, 'भिऊ नकोस? मी तुझी ढाल आहे! 'अब्राहाम म्हणाला,' पण हे प्रभो, मला संतान नाही! माझा वारस दुसऱ्यांचे संतान होणार!' प्रभु म्हणाला, 'नाही, तुझ्याच पोटी जन्मलेले संतान तुझें वारस होईल! मी तुला खाल्डीच्या 'अर' मधून आणून हा प्रदेश दिला. जा, नि मला एक कालवड गाय, बोकड नि पक्षी मारून होमून बळी दे! तुझ्या संतानाला मी इजिप्त ते युफ्रेटीस पर्यंतचे सारे राज्य सदोदितचे दिले आहे. ..... नंतर सराई आपला पति अब्राहाम याला म्हणाली, 'बघ देवाने मला वांझ केली. माझा कुसवा निष्फळ झाला! आता असे तरी कर की, इजिप्तमधून आणलेली ही जी माझी 'हगर, नांवाची सुरेख दासी आहे ती मी तुला देते. तू तिच्याशी संबंध कर. म्हणजे तरी तुझ्या पोटी संतान होऊन आपला निर्वंश होणार नाही.'

आपल्या पत्नीने दिलेल्या ह्या दासीशी अब्राहामने संबंध केला. आणि तिला गर्भ राहिला. पण आपल्याला गर्भ राहिलेला पाहून ती दासी हगर आपली जी धनीण सराई तिला तुच्छवू लागली.

तेव्हा सराई अब्राहामला म्हणाली, 'माझ्या अपमानाचा दोष आता तुझ्याकडेच आहे! मी माझी दासी तुझ्या शेजेस दिली, पण तिला गर्भ राहताच ती मला पाण्यात पाहू लागली! आता देवच आमचा न्याय करो! ' परंतु अब्राहाम म्हणाला,'हे बघ तुझी दासी तुझीच बटीक आहे ना? तिचे काय करणे ते तुझ्या हातीच आहे. मग जेव्हा सराई त्या हगरला कडकपणे वागवू लागली, तेव्हा ती पळून गेली. ती रानावनात भटकत असता तिला एक देवदूत भेटला नि म्हणाला,'भटकतेस कुठे? तुझ्या पोटी पुत्र आहे. त्याचा वंश विस्तारेल. परत फीर!' तेव्हा ती परत घरी आली. हगरला पुढे पुत्रच झाला. अब्राहामने त्याचे नावे, इश्माएल' ठेवले. तेव्हा अब्राहाम ८६ वर्षाचा होता.

प्रभु पुढे म्हणाला,'आणि तुझी पत्नी जी सराई तिला यापुढे तू 'सरा' असे म्हणावेस. मी आता तिला देखील पुत्र देणार! होय, तिलाही पुत्र होईल नि माझ्या आशिर्वादाने ती राष्ट्राची माता होईल, लोकाधीश राजे तिच्या पोटी येतील! तेव्हा अब्राहाम दंडवत घालीत हसून मनात म्हणाला, 'काय! शंभर वर्षे उलटली त्यास पुत्र होणार, नी सराई नव्वद वर्षाची म्हातारी तिला गर्भ राहणार! देवा. माझा एक पुत्र 'इश्माईल' आहे, त्यासच उदंड आयुष्य दे!' तेव्हा देव म्हणाला,'सराला पुत्र होईलच होईल. त्याचे नावे ऐझाक ठेव. आणि मी इश्माईललाही संभाळीन. त्यांचा वंश वाढेल. बारा राजे त्याच्या पोटी जन्मतील.'

पण 'सरा' तर अगदी वृद्ध. ती मनात हसली की, या म्हातारपणात का आता मला ते गोड वाटणार? माझा नवराही म्हतारा! हे कळताच देव म्हणाला,'सरा का हसली? देवाला अशक्य असे काही आहे काय?' हे ऐकून सरा देवास भ्याली नि आपण हसलो हे तिने नाकारले. देव म्हणाला,'छट् तू हसलीस!

देवप्रिय लॉटला स्वतःच्या कन्यांपासून पुत्र

(अध्याय १९ वा) 'इकडे सोडम नगराचा देवाने नाश केल्यानंतर त्याने त्या नाशातून वाचवून बाहेर आणलेला अब्राहामचा पुतण्या नि देवाचा आवडता लॉट हा आपल्या दोन्ही कन्या तेवढ्याच घेऊन पर्वतातील एका गुहेत राहात होता. त्या दोन्ही कन्या उपवर असून त्यांना पुरुष असा माहीत नव्हता.

तेव्हा वडील कन्या आपल्या धाकट्या बहिणीला म्हणाली, 'बघ, आपला पिता आता वृद्ध झाला, पण त्याच्या पोटी पुत्रसंतान नाही. आपण दोघी येथे एकटया. जगाच्या रहाटीप्रमाणे आपल्यालाही शेजेस घेईल

असा एकही पुरुष दुसरा मिळणार नाही. यासाठी चल, आपण आपल्या या बापाला दारू पाजू ये आणि नंतर आपणच आपल्या या थोर पित्याचे बीज आता जतन करू ये!'

'यापकारे लॉटच्या दोन्ही मुली आपल्या पित्यापासून गरोदर राहिल्या. त्या वडील कन्येचा मुलगा तोच 'मोआब.' धाकटीला सुद्धा मुलगाच झाला. तो 'बेन आमी.' पहिला आजच्या मोआबाईट जातीचा पूर्वज. दुसऱ्याचा वंश म्हणजेच आजची ॲमॉन जाति.' (अध्याय १९ श्लोक ३० ते ३८)

सराला पुत्र होतो. सराचा सवती मत्सर

इकडे प्रभु सराला भेटला. देवाने म्हटले ते तिच्या विषयी केले. कारण ती गभर्वती झाली. अब्राहामच्या शंभराव्या वर्षी त्याची पत्नी सरा हिला हा पुत्र झाला. नावे ऐझाक ठेवून आठवे दिवशी देवाच्या सांगण्याप्रमाणे त्या पुत्राची सुंता केली. पण सराला इतक्या म्हातारपणी झालेल्या त्या पुत्रास पाहून हगर दासीला जो अब्राहामपासून पुत्र झाला होता तो इश्माईल हसला. हे पाहताच सरा रागावली नि अब्राहामला म्हणाली,'या बटकीला नि तिच्या त्या दासीपुत्राला आताच्या आता हुसकून दे. माझ्या मलासह तो तुझा वारस होता कामा नये. अब्राहामला हे ऐकून फार दुःख झाले. पण देव म्हणाला,'दुःख करु नकोस. कारण तुझेंच बीज असलेल्या त्या दासीपुत्राचेही मी एक राष्ट्र करीन!' तेव्हा मोठया पहाटे अब्राहाम उठला. एक पाण्याची बाटली, भाकरीचा तुकडा, आणि ते मूल हगरच्या स्वाधीन करुन तिला त्याने घराबाहेर काढून दिले.

हगर तेथून जी निघाली ती रानावनात भटकत चालली. तिच्याजवळचे पाणी संपले. दुसरे कुठे दिसेना. तेव्हा ते तिचे मूल एका झुडपाखाली टाकून ती दूर जाऊन रडत बसली. ते मूल मरताना तिला पाहवेच ना. पण देवाने तिचे रडणे ऐकताच देवदूत आला. तो म्हणाला,'रडतेस का? काय होते तुला? तुझ्या मुलाला उचल. देव तुझा साथी आहे. त्याचे एक राष्ट्र होईल.' हे शब्द ऐकून हगरने मुलाला उचलले, तो देवाने तिचे डोळे उघडले. पाहाते तो जवळच एक पाण्याची विहीर. तिने पुन्हा आपली बाटली पाण्याने भरली नि पुढे चालली. तो मुलगा रानावनातच तिने वाढविला. तो मोठा धनुर्धर झाला. इजिप्तमधल्या एका मुलीशी त्याच्या आईने त्याचे लग्न लावून दिले. (अध्याय २१)

अब्राहाम पुत्राचे बलिदान करावयास जातो

पुढे असे झाले की, अब्राहामची कसोटी पाहावयाचे मनी आणले. देवाने हाक दिली, 'अब्राहाम' 'जी, हा मी!' अब्राहाम उत्तरला, देव म्हणाला,'तुझा पुत्र, तो एकुलता एक पुत्र ऐझाक, तुझा आवडता, तोच घे. मोरियाच्या पर्वताकडे जा आणि त्यांचे हवन करुन मला बळी दे!'

आणि अब्राहाम सकाळीच उठला, आपल्या गाढवावर स्वारी भरली, हवनाची लाकडे घेतली, नि मुलासह त्या पर्वताकडे गेला. पर्वत येताच तो आपल्या मुलाला तेवढाच घेऊन पुढे चालला. मुलगा अजाणपणे म्हणाला,'बाबा बलिदानाला, चाक, लाकडें, आग घेतलीत, पण बोकड कुठे आहे?' अब्राहाम म्हणाला,'देव देईल तो बोकड!' ठराविक जागी येताच अब्राहामने स्थंडिल उभारले, लाकडे रचली आणि त्यावर आपल्या मुलाचा होम करण्यासाठी त्यास बांधून टाकले. आपला सुरा उपसून त्या मुलाच्या कंठावर हाणण्यास त्याने हात उगारला - तोच देवदूताचा ध्वनि आला,'अब्राहाम!' अब्राहाम उत्तरला,'जी, हा मी

इथे!' प्रभुध्वनि म्हणाला, 'मारू नकोस त्या लेकराला. मी तुझी परीक्षा पाहिली. तुझ्या एकुलत्या पुत्राला देखील तू बळी देत आहेस! तुझी माझ्यावरची निष्ठा खरी आहे!' इतक्यात एक बोकड दिसला, तेव्हा त्यालाच अब्राहामने त्या स्थंडलावरील अग्नीत मुलाच्या बदली होमिले. यासाठीच त्या स्थळास आजही 'जेहोवा-जिरें' असेच म्हणतात. तेथून अब्राहाम बीरशेचा येथे गेला नि तेथेच राहू लागला. (अध्याय २२)

सरा साध्वीचा मृत्यु

तिथे सराच्या वयाला १२७ वे वर्ष लागले. ती अब्राहामची बायको होती तशीच बहीणही होती. कारण अब्राहामच्या आईच्या पोटी जरी ती झालेली नव्हती. तरी त्याच्या बापाच्या पोटचीच ती होती. म्हणून बापाच्या नात्याने ती त्याची सावत्र बहीणच होती. आणि तिलाच अब्राहामने आपली बायकोही केली होती. तिला जेव्हा १२७ वर्षे झाली तेव्हा ती मृत्युशय्येवर पडली, आणि अब्राहामला दुःखात लोटून लौकरच मेली.

येथे सरा साध्वीची कथा संपली.

***

लेखांक २ रा

(अध्याय २४ वा) अब्राहाम पैगंबराची पत्नी साध्वी सरा ही वारल्यानंतर त्याने आपल्या मुख्य कारभाऱ्याला बोलावून म्हटले,'ये नि तुझा हात माझ्या मांडीखाली घाल, आणि शपथ घे की, माझ्या पुत्राला, ऐझाक याला या कॅननाईट लोकांची मुलगी करू देणार नाही; परंतु माझ्या वंशाच्या मूळस्थानी जा नि त्यातली मुलगी माझ्या मुलास कर. तुझ्यापुढे एक देवदूत चालेल नि तुला वाट दाखवील. बायको मिळताच माझ्या मुलाला परत आण. जर ती वधू इकडे यावयास नाकारू लागली, तर तुझ्याकडे बोल राहणार नाही. तू तिला सोडून दे; पण मुलाला मात्र परत आण.'

त्याप्रमाणे शपथ घेऊन तो कारभारी उंटावर सर्व सामान लादून नेहारच्या नगराला अब्राहामच्या मेसोपोटेमियातील मूळ स्थानाकडे निघाला. तिथे पोचताच गावाबाहेरच्या विहिरीवर संध्याकाळच्या वेळी आपल्या उंटांना गुढघ्यावर टेकवून तो उतरला. तिथेच गावच्या स्त्रिया पाणी भरण्यास देत. तेव्हा त्या करभाऱ्याने देवास विनविले. 'हे अब्राहामच्या प्रभो, असेच होवो की, ह्या नगरातील स्त्रिया जेव्हा पाण्यास इथे येतील तेव्हा मी जीस म्हणेन की, तुझी घागर खाली ठेव नि मला पाणी पिऊ दे, आणि जी मला म्हणेल, 'पी, तुझ्या उंटांना सुद्धा पाणी पाजते - तीच मुलगी तू ऐझाकला जी पत्नी म्हणून नेमलेली असशील ती असो!'

ही प्रार्थना संपते न संपते तोच, आश्चर्य की, रेबेका अब्राहामचा भाऊ नेहार याची नात ही बाहेर आली. कोणत्याही पुरुषाचा स्पर्श न झालेली कुवार नि दिसण्यात सुरेख अशी ती कन्या रेबेका आपल्या खांद्यावरचा घडा भरण्यासाठी विहिरीवर गेली आणि घडा पाण्याने भरून आली. त्यासरशी तो कारभारी भराभरा तिच्याकडे गेला नि म्हणाला, 'तुझ्या घड्यांतील थोड पाणी मला प्यायला देशील काय?'

'प्यावे महाराज,' असे म्हणून तिने घडा हातावर घेतला नि पाणी दिले. त्याचे पिणे होताच ती म्हणाली, 'तुमच्या उंटांना पाजण्यासाठी सुद्धा मी पाणी ओढून देते.' झटकन तिने तो घडा गुरांच्या पाण डोणीत ओतला, विहिरीवर गेली आणि पाणी ओढून त्या उंटांना पोटभर पाजले. कारभारी तिच्याकडे

आश्चर्याने पाहात होता की, देवाने हिलाच धाडले असेल का? उंटांना पाजणे संपताच त्याने सोन्याची कानबाळी नि सोन्याच्या बांगडया हाती घेऊन तिला विचारले, ‘कन्ये तू कोणाची मुलगी? तुझ्या बापाच्या घरी आम्हांला उतरायला मिळेल काय?’ रेबेका उत्तरली, ‘नेहारची मी नात आहे. आमच्या घरी उतरायला जागा नि दाणावैरण पुष्कळ आहे!’ आणि रेबेकाने पळतपळत जाऊन आपल्या आईच्या घरातील मंडळींना ते सारे सांगितले. तितक्यात रेबेकाचा भाऊ लेबन तिथे आला, आणि त्या सोन्याच्या बांगडया नि कानबाळया रेबेकाच्या अंगावर पाहिल्या आणि म्हणाला, ‘ठीक आहे.’ त्याने स्वतःपुढे जाऊन त्या कारभाऱ्याला त्याच्या साऱ्या मंडळींसह घरी आणिले नि स्वागतिले.

हातपाय धुतल्यावर त्या मंडळींना जेवावयास बोलाविले. पानावर रुचकर मांस वाढले, पण कारभारी म्हणाला, ‘माझ्या धन्याचा निरोप दिल्यावाचून मी घास घेणार नाही. सांगू का? सांगावे म्हणताच तो सांगू लागला की, ‘माझ्या धन्याने अब्राहामने त्याच्या सरा साध्वीपासून झालेल्या पुत्राचे लग्न तुमच्या घराण्यातील कोणा मुलीशी लावावे म्हणून आज्ञापिले आहे. अब्राहामच्या वडिलाचे घर म्हणजेच तुमचे. देवदूतानेच मला वाट दाखविली. विहिरीवर मी देवास विनविले की, जी वधू तू या पुत्रास नियोजिली असशील तीच मला पाणी पिण्यास देवो. त्याप्रमाणे या कुमारिकेने मला पाणी दिले आणि मी सोन्याची कंकणे तिच्या हातात घातली. तेव्हा माझा धनी जो अब्राहाम त्याच्या भावाची ही कन्या रेबेका अब्राहामच्या या मुलास तुम्ही द्याल तर आभार होतील. नसाल देणार तर तसे सांगावे.

हे त्याचे बोलणे ऐकून लेबन म्हणाला, ‘देवाची इच्छा जर तशी, तर तुला तरी आम्ही काय म्हणणार? ही पहा, रेबेका तुझ्या समोरच आहे. तिला न्या आणि अब्राहामच्या मुलाशी तिचे लग्न लावा; आमची हरकत नही.’

हे ऐकताच प्रभूला वंदून त्या कारभाऱ्याने रत्नजडित सोन्या चांदीचे दागिने रेबेकाला दिले आणि तिच्या भावाला नि आजीला मूल्यवान उपहार अर्पिले. खाऊन पिऊन सुखात ती रात त्या सगळयांनी घालविली. सकाळीच अब्राहामचा तो कारभारी उठला नि म्हणाला,‘आता आम्हांस निरोप द्यावा. आमची मुलगी घेऊन आम्ही जातो.’ तेव्हा रेबेकाची आई नि भाऊ म्हणाले, ‘इथे थोडे दिवस तरी राहा, निदान दहा दिवस तरी! मग मुलीला न्या?’ पण कारभारी म्हणाला,‘मला परत गेलेच पाहिजे.’ तेव्हा रेबेकाची माणसे म्हणाली,‘आम्ही मुलीलाच बोलावतो नि तिच्याच तोंडून तिचे मत ऐकू.’ त्याप्रमाणे तिला त्यांनी बोलाविले नि विचारले, ‘मुली तू ह्यांच्यासह आताच जाशील का?’ ती म्हणाली,‘हो, जातेच मी!’ तेव्हा तिच्या माहेरच्यांनी रेबेकाला तिच्या दाईस सोबत देऊन सासरी धाडली. जाताना त्यांनी त्यांच्या त्या मुलीला आशीर्वादून म्हटले,‘जा, बाळे, जा!’ तू आमची जशी बहीण आहेस तशीच असंख्य मुलालेकरांची आई हो! आणि तुझ्या पुत्रपौत्रांचा द्वेष करणाऱ्यांवर त्यांना सदा विजय मिळो!’ नंतर रेबेका जावयास निघाली. तिला तिच्या माणसांसह उंटावर बसवून सामानसुमान घेऊन तो कारभारी अब्राहामकडे परत निघाला.

इकडे ऐझाक, अब्राहामचा तो पुत्र, संध्याकाळच्या वेळी शेतात प्रार्थनेसाठी आला असता उंटांचा जमाव परतलेला त्याने पाहिला. रेबेकानेही आपल्या सेवकांना विचारले,‘हे कोण?’ ते म्हणाले,‘हाच तुझा धनी!’ तेव्हा उंटावरून ती खाली उतरली, पदर घेतला, आणि तिने आपले अंग झाकून घेतले. नंतर कारभाऱ्याने

ऐझाकला सारी माहिती सांगितली. तेव्हा ऐझाकने रेबेकाला आपल्या तंबूत नेले नि पत्नी म्हणून स्वीकारिले. तेव्हा ऐझाकचे वय ४० वर्षाचे होते.

अब्राहाम पैगंबराचा मृत्यु

(अध्याय २५ वा) सरा साध्वी मेल्यानंतर सव्वाशे वर्षावर वय झालेल्या पैगंबर अब्राहामने केढूस नांवाच्या स्त्रीशी लग्न केले. तिच्यापासून त्याला पुत्र झाले. त्यावाचून अब्राहामच्या ज्या रखेल्या होत्या त्यांनाही संतति झाली. त्या सर्वांना यथोचित देणग्या देऊन अब्राहामने देशोदेशी धाडून दिले. आणि मुख्य उत्तराधिकार ऐझाकलाच देऊन वयाच्या १७५ व्या वर्षी अब्राहामने देह ठेविला.

पैगंबर ऐझाक नि रेबेका यांची कथा

पुढे रेबेकाला संतान होईना. तेव्हा ऐझाकने देवास प्रार्थिले. देवाच्या आशीर्वादाने रेबेकाला जुळे झाले. वडील पुत्र ईसा - तो फारच केसाळ होता.धाकटा जेकब तो साध्यासिध्या स्वभावाचा होता. ऐझाकची प्रीती ईसावर, पण रेबेकाची जेकबवर होती.

पुढे मोठा दुष्काळ पडला. तेव्हा प्रभु त्या ऐझाकच्या साक्षात् पुढे येऊन म्हणाला,'मी सांगतो त्या देशी जा. मी तुला नि तुझ्या वंशाला हे देश देईन. मी अब्राहामशी केलेला करार सफळवीन. तुझा वंश आकाशातील ताऱ्यांसारखा असंख्य वाढेल. तेव्हा पैगंबर ऐझाक जेरार ह्या प्रांती गेला.

ऐझाक पैगंबर सुद्धा बायकोला
बहीण म्हणतो

पण जेरारमध्ये येताच (पूर्वी अब्राहामची गत झाली तशीच ऐझाक पैगंबराची होऊन) लोक विचारु लागले की, 'ही स्त्री तुझी कोण? तेव्हा आपली ती बायको असे न सांगता ऐझाकने सांगितले,'ही माझी बहीण!' कारण त्याला अशी भीति पडली की, रेबेका दिसण्यात सुरेख, तिला पत्नी म्हणावी, तर तिला नेता यावे म्हणून लोक मला ठार मारतील!

पण पुढे एकदा असे घडले की, त्या देशाचा तो फिलिस्टईनांचा राजा अभिमलेक आपल्या खिडकीतून पाहात असता त्याला अकस्मात रेबेकाशी लडिवाळपणे लगटताना ऐझाक दिसला! तेव्हा त्याने ऐझाकला बोलावून विचारले, 'हे काय, ही तुझी बायकोच असली पाहिजे. बहीण कशी म्हणालास?' तेव्हा ऐझाकने आपण जिवाच्या भयाने तसे खोटे बोललों असे सांगितले. अभिमलेक म्हणाला,'माझ्या लोकांतून कोणी हिच्याशी संग केला तर? हे पाप तू आमच्यावर ओढवून आणले नाहीस का?' असे म्हणून त्या राजाने प्रजेस समज दिली की, कोणीही रेबेकास वा ऐझाकला त्रास देता कामा नये.' (अ. २६)

नंतर तेथेच शेतीभाती करुन ऐझाक भरभराट पावला. काही दिवसांनी त्याच्या वाढत्या शक्तीला पाहून फिलिस्टाईनच्या राजाने त्याला तो प्रांत सोडून जाण्यास सांगितले.

पुढे ऐझाक काही काळानंतर वृद्ध होऊ लागला आणि त्याची दृष्टी अंधूक झाली. तेव्हा आपल्या आवडत्या पुत्राला, ईसाला जवळ बोलावून तो म्हणाला,'बघ, आता माझा काही नियम नाही. म्हणून आज एकदा तू स्वतः पारध करुन आणलेले मांस मला पोटभर खावयाची आलेली हौस पुरवून घेऊ दे. तर जा नि

पारध करुन उत्तम मांस मला खाऊ घाल नि माझा आशीर्वाद मी तुला देईन.' त्याप्रमाणे त्याचा वडील पुत्र ईसा धनुर्बाण घेऊन मृगयेस गेला.

वृद्ध ऐझाकचे हे बोलणे रेबेकास आवडले नाही. कारण तिची प्रीति तिच्या धाकटया मुलावर होती. यासाठी तिने त्याला गुपचूप बोलावून घेतले नि म्हणाली 'जेकब, तुझ्या वडील भावाला तुझ्या वडिलांनी मृगयेस धाडले आहे आणि ते त्यालाच संतोषून वरदान देतील. तेव्हा तू असं कर की, मी तुला शिजवून देते ते रुचकर मांस घेऊन तूच तुझा भाउ ईसा आहे म्हणून पुढे होऊन ऐझाकला दे. पोटभर जेऊ घाल म्हणजे हे वरदान देणे ते तुलाच दिलं जाईल!'

तेव्हा जेकब म्हणाला,'बाबांना दिसत नसलं तरी स्पर्शता येतं. माझा वडील भाऊ ईसा केसाळ आहे. तेव्हा मी जर तोच म्हणून पुढे गेलो तर ते क्वचित् माझ्या अंगावरुन हात फिरवून चाचपतील नि मी केसाळ नसल्याने माझंच कपट उघडकीस येईल!'

रेबेका म्हणाली,'भिऊ नकोस, ईसाचा हा अंगरखा मी तुला घालते. बोकडाच्या केसाळ कातडयाचे हातमोजे हातावर घाल. घे हे मांस, रोट नि तुझा भाऊ ईसा मृगया करुन येतो त्यापूर्वी वडिलांकडे जा.' त्याप्रमाणे जेकब गेला वृद्ध पैगंबर ऐझाकला तो आला तसा ईसाच आला म्हणून वाटले. त्या अंध पित्याने त्याला आनंदाने म्हटले,'ईसा, ये, मला भेट, ये मुला, ही मृगया इतक्या लौकर कशी सापडली?' जेकब ईसासारख्या आवाजात म्हणाला,'देवाची इच्छा! आता बाबा उठा नि जेवा' ऐझाक म्हणाला,'पण जवळ ये म्हणजे मी स्पर्शून बघतो तू ईसाच आहेस की नाहीस ते' तसा जेकब त्या अंध वृद्धाजवळ गेला, ऐझाकने त्याला चाचपून पहिले नि म्हणाला,'आवाज जेबकचा आहे पण हात तर ईसाचा आहे!' (कारण त्यावर केसाळ मोजे होते आणि ईसा केसाळ होता.) तेव्हा पैगंबर ऐझाकची फसगत होउन त्याने ईसाच समजून जेकबला कडकडून मिठी मारली, त्याचे मुके घेतले, त्याची वस्त्रं प्रेमभराने हगली, आणलेले मांस पोटभर खाल्ले आणि त्याला वरदान दिले की,'जा, पुत्रा तुझे सारे भाऊ तुझ्या अंकित होतील, तुझा द्वेष करतील ते नाश पावतील. तुझी भरभराट होईल. राष्ट्रं तुझ्यापुढे मान वाकवितील!'

वृद्ध ऐझाकचा आशीर्वाद उपटून जेकब परत जातो न जातो तोच ईसा स्वतः पारध करुन शिजवून आणलेले मांस घेऊन त्या आपल्या पित्याकडे आला. तेव्हा जेकबने आधीच कपटाने आपल्या नावे पित्यास कसे फसविले नि पित्याचे वरदान उपटले ते त्या ईसाच्या नि अंध पित्याच्या ध्यान्यात येऊन दोघेही शोकाकुल झाले. पण जे वरदान देण्याची दैवी शक्ति पैगंबर ऐझाकमध्ये होती ते वरदान तो जेकबला देऊन चुकला होता, हे पाहून ईसा फार शोक करता झाला.

अशाच प्रकारे त्या दोघा भावांचे भांडण विकोपास जाऊन ईसाने संधि सापडताच आपल्या धाकटया भावाला, जेकबला ठार मारण्याचा बेत केला हे जाणून रेबेका घाबरली नि तिने 'आपल्या माहेरी जाऊन तेथील कोण्या माहेरच्या मुलीशी लग्न लाव नि तिकडेच राहून संकट जाईतो जीव वाचव' असे जेकबला सांगून त्याला ईसाच्या नकळत दूर धाडून दिले.

जेकबचा राशेलशी विवाह

आपल्या मामाच्या घरी निघून जात असता वाटेत दगडाची उशी करुन जेकब निजला असता त्याला स्वप्नात दिव्य दृश्य दिसले. पृथ्वीवर ठेवलेली एक शिडी थेट स्वर्गाप्रत पोहोचलेली आणि देवदूत तिच्यावरून चढत उतरत आहेत! आणि अहो आश्चर्य! प्रभु स्वतः वर उभा राहून म्हणाला,'जेकब मी अब्राहामचा देव, ऐझाकचा देव, ज्या भूमीवर तू आहेस, ती सारी भूमि मी तुला नि तुझ्या वंशाला देणार! तुझा वंश चारी दिशांना विस्तारेल!'

जेकब स्वप्नातून उठताच म्हणाला, 'अहो आश्चर्य! स्वर्गाचं दार ते हेच हीच पुण्यभूमि!' उशी केलेला दगड त्याने तेथे त्या साक्षात्काराची स्मृति म्हणून ऊभारला, आणि त्यावर तेल ओतले. 'हा स्तंभच देवाचं गेह होईल! असे भावून जेकब पुढे चालला. (अध्याय २८)

जाता जाता तो एका विहिरीपाशी आला. तेथे मेंढपाळ मंडळी होती. आपले कळप ते तेथेच पाणवीत असत. त्यांना जेकब म्हणाला,'गडयानो, तुम्ही कुठले?' 'हेरन गावचे' ते म्हणाले. 'मग तुम्हाला लेबन, जेहारचा पुत्र माहीत आहे काय?' 'हो तर, आमच्या ओळखीचेच आहेत ते!' 'कुशल आहेत ना ती मंडळी?' 'अगदी कुशल!' अशी प्रश्नोत्तरे झाली.

तोच एक मुलगी आपल्या शेळया घेऊन तेथेच आली, तेव्हा ते म्हणाले, हीच राशेल, लेबनचीच मुलगी!

त्यासरशी जेकबने राशेलला मिठी मारली, तिचा मुका घेतला नि आनंदाने अश्रु ढाळीत म्हणाला,'मी तुझ्या वडिलांचा भाऊबंद आहे. अग मीच लेबनची बहीण जी रेबेका, तिचा मुलगा.' ते ऐकताच राशेलने लगबग घरी जाऊन ते सांगितले. तेव्हा लेबन धावत तेथे आला, नि आपल्या बहिणीच्या त्या मुलाला त्याने कवटाळून त्याचे चुंबन घेतले. त्याला घरी आणले आणि एक महिना ठेवून घेतले. मग लेबन म्हणाला,'जेकब, जरी तू माझा नातलग, तरीही माझ्या घरी तू जे काम करतोस त्याचे तुला मी काही तरी प्रतिमोल देणेच योग्य. काय पगार घेशील?'

आता लेबनला दोन मुली. वडील ली नि धाकटी राशेल. ली सौम्य नयनांची साधी मुलगी. राशेल सुरेख नि सुभग. जेकबला तीचआवडे. यासाठी जेकब उत्तरला,'माझा पगार राशेल! जर ती मला देशील तर मी सात वर्षे तुझी चाकरी करीन.' त्या प्रमाणे जेकबने सात वर्षे चाकरी केली. ती सात वर्षे त्याला सात दिवसांप्रमाणे झटकन गेल्यासारखीं वाटली. त्याची राशेलवर तशीच प्रीति होती.

मग जेकब लेबनला म्हणाला, 'आता माझी बायको राशेल मला दे. मी माझा करार पुरा केला. चाकरीची सात वर्षे भरली. आता राशेल माझी झाली. तिच्याशी संग करायला मला आता अनुज्ञा हवी.'

मग लेबनने साऱ्या मंडळींना जमवून मोठी जेवणावळ दिली. पण रात्री आपली मुलगी जी 'ली' तिलाच लेबनने जेकबच्या खोलीत धाडली, आणि त्यांचा - संग झाला. पण पहाटे दिसू लागले तेव्हा जेकब पाहतो ... तो ती 'ली' आहे! त्यासरशी जेकबने आपला मामा लेबन - त्याला विचारले,'तू हे काय केलेस? मी धाकट्या - राशेलसाठी चाकरी केली नाही काय? मग तू वडील मुलगी ... रात्री माझ्या शेजेस देऊन असे का फसविलेस?' तेव्हा लेबन म्हणाला,'आमच्या देशी वडिलीला देण्याच्या आधी धाकटीला देत नाहीत. आता तू 'ली' चा आठवडा पुरा कर. मग राशेलसाठी आणखी सात वर्षे चाकरी केलीस की ती पण तुला मिळेल!'

तेव्हा जेकबने आपली वडील मामेबहीण जी 'ली' तिच्याशी ठरावाप्रमाणे आठ दिवस संग केला. मग आणखी सात वर्षे चाकरीच्या करारावर त्याची धाकटी मामेबहीण जी राशेल तीही त्याला देण्यात आली. तिच्यावर लीपेक्षाही जेकबची अधिक प्रीति असल्यामुळे तिच्या संग सुखाने त्याला त्या दुसऱ्या सात वर्षांच्या चाकरीचे तर काहीच वाटले नाही.

बहिणींची बाळंतपणाची चढाओढ

पण देवाने जेव्हा पाहिले की, जेकब 'ली'चा तिटकार करीत आहे तेव्हा त्याने तिचा कुसवा सफळ केला. पण राशेल वांझच राहिली. 'ली' गरोदर होऊन तिला पुत्र झाला. तिने त्याचे नावे रुबेन ठेविले, आणि समजू लागली की,' देवाने मला पुत्र दिला' आता मात्र माझा पति मजवरच प्रेम करील.'

आणि 'ली' पुन्हा गरोदर राहिली. तिला दुसरा पुत्र झाला. आणि तिला पुन्हा गर्भ राहिला, नि तिला तिसरा पुत्र झाला आणि 'ली'ला पुन्हा दिवस लोटले नि तिला चौथा पुत्र झाला नंतर मात्र तिला दिवस गेले नाहीत.

आता जेव्हा राशेलने पाहिले की, आपल्याला जो तो वांझ म्हणतो, तेव्हा ती आपल्या बहिणीचा हेवा करु लागली. ती जेकबच्या गळी पडली नि म्हणाली,'मला मूल तरी दे नाही तर मी जीव देते!'

तेव्हा मात्र जेकबला राशेलचा संताप आला नि तो म्हणाला,'तुझा कुसवा देवाने वांझ केला का मी?'

तेव्हा राशेल म्हणाली,'ही बघ माझी दासी बिला. हिला भोग. ती माझ्या मांडीवरच बाळंत होईल म्हणजे तेच मूल माझें (पूर्वी गुलामांची - दासदासींची जी मुले ती धन्याचीच मालमत्ता ठरे.)

त्याप्रमाणे जेकबने बिलाशी संग केला. बिलाला पण मुलगा झाला. तेव्हा राशेल हर्षून म्हणाली, देवाने माझी पण विनंती ऐकली, मला पण मुलगा झाला. याचे नावे 'दान'. बिला पुन्हा गरोदर राहिली नि तिला दुसरा पुत्र झाला.

आता 'ली' घाबरली. तिला मुले होणे बंद झाले आणि राशेलला मुले होऊ लागली तेव्हा 'ली'ने पण आपली दासी जी झिल्फा तिला जेकबच्या शेजेस धाडली. झिल्फालाही गर्भ राहून पुत्र झाला. तेव्हा 'ली' हर्षली, 'बघा, एक सैन्यचे सैन्य येत आहे! पुत्रच पुत्र!

एक दिवस काय झाले की, 'ली'च्या एका मुलाने एक कंद आणला. राशेलला तो हवा यासाठी तिने तो 'ली' जवळ मागितला. तेव्हा ली फणकाऱ्याने म्हणाली की, 'काय, तू प्रथमपासून माझ्या पतीची प्रीति छिनावून नेली आहेस तेवढी पुरेशी नाही की काय? तर आता हा कंदही नेऊ पाहतेस? तेव्हा राशेल उत्तरली, 'ह्या कंदासाठी मी त्याला एक रात्र तुझ्याकडेच धाडीन. मला कंद दे.' त्याप्रमाणे ठरले. गुराढोरांना नि शेळयामेंढयांना चारुन जेकब संध्याकाळी शेतातून परतताच 'ली'ने त्याला हटकले, 'आजची रात्र तुला मजकडेच राहिले पाहिजे. कंदावारी मी आजची रात तुला खरीदले आहे आणि अशा रीतीने देवाची 'ली' वर पुन्हा कृपा होऊन बंद झालेला तिचा कुसवा पुन्हा सफल झाला. यथाकाल ती प्रसवली तो तिचा पाचवा पुत्र. 'ली' पुन्हा गरोदर झाली नि तिला सहावा पुत्र झाला. सातव्या बाळंतपणात 'ली' ला मुलगी झाली. तिचे नावे दीना.

पण शेवटी ईश्वराला राशेलचीही आठवण झाली. तिला स्वतःलाही गर्भ राहिला नि पुत्र झाला. तोच जोसेफ.

आता जेव्हा राशेललाही पुत्र झाला तेव्हा जेकब त्याचा मामा लेबन याला म्हणाला, ‘बघ, आता माझी तुझ्या दोन्ही मुलींसाठी ठरलेली चाकरी पुरी होऊन गेली. आता मला माझी बायकामुले घेऊन परत माझ्या वडिलधाऱ्यांकडे जाऊ दे. पण लेबन म्हणाला, ‘मी तुला आता म्हणशील ते वेतन देईन. इथेच माझ्या गुराढोरांची नि शेळयामेंढयांची ही अपार संपत्ति सांभाळून राहा.’ तेव्हा त्या कळपातील ठराविक भागाची नि प्रकारची गुरे नि शेळयामेंढया द्यावयाचा करार करुन जेकब तीच चाकरी करीत राहिला. पण पुढे जेकब जसजसा पशुधन, दासदासी, मुलेमुली यांनी संपन्न होत चालला, तसतसा लेबनला त्याचा मत्सर वाटू लागला. लेबनची वृत्ति अशी पालटलेली पाहून जेकबला भीति वाटली. त्याने तेथून निसटून जाण्याचे ठरविले.

तेव्हा त्याने राशेल आणि ली ह्या दोन्ही आपल्या भार्यांना बोलावून आणून आपला बेत सांगितला. तेव्हा त्या दोघी म्हणाल्या, ‘आमची तरी आता ही माहेरची माणसे कोण लागतात? आम्हांस ते परक्यांच्याच स्त्रिया लेखतात. त्यांच्या धनात आमचा वाटा नाही. उलट, आमच्यासाठी जे धन तू त्यांना मिळवून दिलेस ते आमच्या बापाने नि भावाने स्वतःच सारे दाबले; आम्हांस थोडेच दिले! तेव्हा आम्हीही तुझ्याबरोबर येणार!’

हे ऐकताच जेकबने आपल्या साऱ्या मुलांलेकरांना, दासदासींना, धनधान्याला घेऊन आपल्या स्त्रियांना उंटावर बसवून गुराढोरांच्या कळपांसह संधि सापडताच लेबनच्या गावातून गुपचूप यःपलायन केले!

काही काळाने लेबनला ते कळताच तोही माणसे घेऊन जेकबचा पाठलाग करीत चालला. त्याने जेकबला शेवठी गाठले. जेकब म्हणाला, ‘मी आता परतणार नाही.’ लेबन म्हणाला, ‘तू जा, पण चोरासारखा पळून का जातोस? आणि माझ्या देवघरातील देव का चोरलेस?’

जेकब म्हणाला, ‘हा आरोप मिथ्या आहे. माझ्या साऱ्या तळाची झडती घे.’ त्याप्रमाणे लेबन जेकबच्या बायकामुलांच्या तंबूची सुद्धा झडती घेत चालला.

आता पळून येताना राशेलने आपल्या माहेरच्या देवांच्या मूर्ति खरोखरच चोरुन आणल्या होत्या. झडती चालली तसे तिने त्या मूर्तींना उंटावरच्या बोचक्यात लपविले नि त्या बोचक्यांना भूमीवर टाकून ती त्यांवर बसून राहिली. लेबन तिच्या तंबूची झडती घ्यावयास येताच ती म्हणाली,‘ या आणि हवे ते पहा. तुम्ही वडील माणसे, मीच उठून उभे राहावे, तुम्हांला वंदावे. पण मी आज बाहेरची बसले आहे म्हणून क्षमावे.’ त्या लेबनच्या लोकांनी खूप शोधले, पण देव सापडले नाहीत.

तेव्हा जेकब लेबनवर फार रागावला. लेबनही ओशाळला. शेवटी त्या दोघांनीही मागचे विसरून प्रेमाने एकमेकांना निरोप दिला. एक दगडाची रास करुन तिला साक्ष ठेवून त्यांनी मैत्रीचा करार केला, जेवणावळ दिली आणि लेबनने जेकबला शपथ घातली की, त्याने लेबनच्या त्याला दिलेल्या त्या दोघी मुलींना छळू

नये किंवा दुसऱ्या बायका करू नये. मग ते पुत्रांना नि कन्यांना चुंबून दोघे दोन्ही दिशांना निघून गेले. (अध्याय ३१ )

पुढे जेकब आपल्या घरी परत चालला. पण तो पूर्वी जेव्हा ईसाच्या भयाने घरुन पळाला तेव्हा त्याच्या त्या वडील भावाने त्याला मारण्याचे मनात आणले होते त्याची जेकबला फार धास्ती पडली. तेव्हा त्याने आपल्या पुढे आपले निवडक दासदासी, पशु भावास भेट म्हणून धाडून त्याची मनधरणी केली आणि ईसा सामोरा येताच भुईवर सात वेळा डोके टेकून वंदित जेकब ईसाला शरण गेला तेव्हा त्यांचे पुन्हा सख्य झाले.

कुमारी दीनाचे अपहरण

पुढे जेकब आपल्या बायकामुलांसह नि दासदासी गुराढोराकळपांसह शालेम नगराच्या मैदानाकडे गेला आणि तंबू ठोकून त्याने तिथे तळ दिला.

जेकबची कन्या दीना, 'ली' ची मुलगी, हौसेने त्या गावच्या स्त्रिया कशा असतात हे पाहण्यासाठी त्या नगरात फिरावयास गेली.

पण तेथील राजपुत्र शेचेम ह्याने तिला पाहताच धरून नेली आणि तिच्याशी संग केला. राजपुत्रास ती जीव की प्यार झाली नि तो राजाला म्हणाला, 'ह्याच तरूणीशी मला लग्न लावायचे!'

ही बातमी जेकबच्या मुलामाणसांना कळताच आपल्या इस्त्रायलांच्या कन्येस त्या हिटाअट राजपुत्राने अशी भ्रष्टविली याचा त्यांना संताप आला पण ते बोलले नाहीत. इतक्यात जेकबकडे राजाची मागणी आली की, 'राजपुत्राला तुमची कन्या द्या. आपल्या दोन्ही जातीनी यापुढे एकत्र राहावे. आम्ही आमच्या मुली तुम्हांस देऊ, तुम्ही तुमच्या आम्हांस देत चला. वाटेल तो हुंडा नि दहेज नि देणगी तुम्ही या कन्येसाठी मागा, पण ही कन्या दीना माझ्या पुत्राला द्या!'

जेकबच्या पुत्रांनी त्या हिटाअट राजाचे हे बोलणे ऐकून राग न दाखविता उत्तर दिले, 'ते सर्व खरे; पण आमच्या जातीच्या नियमाप्रमाणे जे लोक सुंता करीत नाहीत त्यांना इस्त्रालयांच्या कन्या देणे निषिद्ध आहे! तेव्हा जर तुम्ही सारेचे सारे लोक सुंता कराल तरच आम्ही आमच्या मुली देऊ घेऊ.'

हे ऐकून राजाने त्या नगरीतल्या सर्व लोकांना समजावले की, करु या सुंता! या लोकांना आपल्या जातीशी एकजीव करुन टाकल्यास आपले सुद्धा बळ वाढेल!' हे ऐकून ते नागरिकही म्हणाले, 'ठीक; त्यांच्या मुली आपण करू आपल्या ते!' असे योजून त्या हिटाअट लोकांतील साऱ्या पुरूषांनी आपली सुंता करविली. त्या दिवशी ते सारेचे सारे त्या सुंतेच्या घावाने आजारी पडले.

तिसऱ्या दिवशी त्या नगरीत जो तो घरी विव्हळत पडलेला होता. हे पाहताच दीनाचे भाऊ जो तो तरवार उपसून अकस्मात राजवाडयात घुसले. राजा, राजपुत्र नि सैनिक यांना तरवारीच्या धारेने कापून काढले, ते सारे नगर लुटून आणि आपली कन्या दीना हिला घेऊन निघून गेले.

***

लेखांक ३ रा

आपल्या दीना नांवाच्या मुलीला नेऊन तिच्याशी संग करणाऱ्या हिटाअट राजपुत्राला फसवून दंडिल्यानंतर जेकबचे पुत्र त्याच्याकडे दीनाला घेऊन आले. तेव्हा जेकब घाबरला नि म्हणाला, 'तुम्ही

हिटाअट लोकांशी हे वैर कसे केलेत? आता आपल्याला इथे दिवस कसे काढता येतील? हे जिवावरचे संकट! येथून निसटून नाहीसे होऊ तरच बचाव! असे योजून जेकब सर्व मुलामाणसांसह एदर प्रांताकडे गुपचूप निसटून गेला. वाटेतच गरोदर असलेल्या राशेलचे पोट दुखू लागले. वेदना फार झाल्या. बाळंत होऊन पुत्र झाला, पण राशेल त्या वेदनांपायी वारली. त्याच पुत्राचे नावे बेंजामिन.

पैगंबर जेकबच्या वडील पुत्राचा सावत्र आईशी संबंध

याच प्रवासात असतांना पैगंबर जेकब याचा सर्वात वडील मुलगा जो रुबेन त्याचा जेकबच्या स्त्री आणि रुबेनची सावत्र आई जी बिला तिच्याशी झालेला संग उघडकीस आला. पुढे जेकबचा पिता ऐझाक हा १८० वर्षांचा झाल्यावर मृत्युशय्येवर पडला. तेव्हा पैगंबर ऐझाकच्या त्या मृत्युशय्येपाशी त्याचा वडील पुत्र ईसा नि धाकटा पैगंबर जेकब हे दोघेही होते. त्यांनी पैगंबर ऐझाकला यथाविधि पुरले.

विधवा सून तामर हिची कथा

जेकबचा सर्वात वडील मुलगा रुबेन हे वर सांगितलेच आहे. त्याच्याहून जो एक धाकटा मुलगा जुडा त्याने शुआ नांवाच्या कॅनेनाअट माणसाच्या मुलीशी लग्न केले. तिच्यापासून जुडाला 'एर' नि 'ओनन' असे दोन पुत्र झाले. त्याला पुढे तिसरा पुत्र झाला तो 'शेलाह.'

पुढे तिघांपैकी सर्वात वडील पुत्र जो एर त्याचे तामर नांवाच्या मुलीशी जुडाने लग्न लावले. परंतु एर हा देवास नावडता होऊन देवाने त्यास ठार मारले; तेव्हा ती तामर विधवा झाली. एरपासून तिला पुत्रही झालेला नव्हता.

आपला वडील मुलगा असा निपुत्रिक वारल्यामुळे जुडाला वाईट वाटले. यास्तव त्याने आपला दुसरा मुलगा जो ओनन त्याला सांगितले की, 'तू तुझी विधवा भावजय जी ही तामर तिच्याशी संग करुन तिची संतति वाढीव.' पण ओननने ती आज्ञा नीटशी पाळली नाही. हे पाहताच देवाला राग आला आणि देवाने त्या ओननलाही ठार केले. तेव्हा त्या विधवा तामरचा सासरा तो जुडा तिला म्हणाला,'आता तू सध्या तरी विधवाच राहा, आणि आपल्या बापाच्या घरी थांब. माझा सगळ्यात धाकटा मुलगा शेलाह हा अगदी लहान आहे. आजच मी घाई केली तर त्याच्या भावाप्रमाणे न जाणो, तोही मरेल! तेव्हा तो मोठा होईतो तरी वाट पाहा. त्याप्रमाणे ती विधवा कामिनी तामर आपल्या बापाच्या घरी जाऊन वाट पाहात राहिली.

पुढे काही दिवसांनी जुडाचीच बायको वारली तेव्हा तोच विधुर झाला. तिचे सुतक फिटताच तो आपल्या शेळयामेंढया भादरावयास टिमनाथ या स्थळी गेला. तामरला कोणी ती बातमी दिली की, 'बघ तुझा सासरा शेळया भादरावयास जात आहे.' हे ऐकताच तिने विधवेची वसने सोडून ठेविली, पदर ओढला नि अंगाभोवती गुंडाळून जुडाच्या वाटेत उघड्या जागीं बसली. कारण जुडाचा तिसरा मुलगा जो शेलाह तो आता मोठा झाला असताही पूर्वी ठरल्याप्रमाणे त्याचे आपल्याशी लग्न करण्याचे जुडा टाळीत आहे हे ती जाणून होती.

जुडाने तिला जेव्हा पाहिले तेव्हा त्याला वाटले की, ती कोणी वेश्या आहे कारण तोंड पदरात झाकलेले होते. तिला पाहताच जुडा जवळ गेला नि म्हणाला,'चल ये, मजशी संग कर.' ती बोलली, माझ्याशी संग करावयाचा? पण काय देशील?' जुडा म्हणाला कळपातील एक कोकरु धाडीन तुला.' ती बोलली,'पण ते तू

धाडीतो गहाण ठेव काही वस्तु.' 'काय ठेवू गहाण?' ती बोलली,'ही तुझी मुद्रा, ही सलकडी नि ही काठी!' जुडाने त्या वस्तु तिच्यापाशी ठेविल्या नि तिच्याशी संग केला. तिला गर्भ राहिला. मग ती लगेच उठली, ती घरी गेली. तो पदर काढला आणि विधवापणाची वस्त्रें पुन्हा ल्याली.

जुडाला ती कुणी तरी अनोळखी वेश्याच वाटली होती. म्हणून त्याने ते कोकरु तिच्याकडे आपल्या एका मित्राच्या हाती धाडले. पण तो मित्र तेथे येऊन पाहातो तो तेथे वेश्या अशी कुणीच दिसेना. त्याने तेथील लोकांना विचारले,'कुठे आहे ती वेश्या? येथे उघडपणे बसून असे नाही का?' लोक म्हणाले, 'छे बुवा, इथे तर वेश्या बिश्या कोणी नसते!'

यानंतर तीन महिन्यांच्या आत जुडाला लोक म्हणू लागले की,'तुझी सून व्यभिचारी निघाली! ती स्वैरिणी गर्भार आहे!' तेव्हा जुडा रागावला. 'तिला बाहेर आणा! जिवंत जाळून टाकली पाहिजे तिला!'

तामरला जेव्हा बाहेर काढली तेव्हा तिने आपला सासरा जो जुडा त्याच्या कडे त्या वस्तु धाडून त्याला म्हटले, ज्या मनुष्याच्या ह्या वस्तु असतील त्याच्यापासूनच मला गर्भ राहिला. सांग मला, मी विनविते की, ह्या वस्तू कोणाच्या? ही मुद्रिका, ही सलकडी, नि ही काठी कोणाची?'

तेव्हा जुडाने ह्या वस्तु आपल्याच आहेत हे मानिले नि तो म्हणाला, 'तीच माझ्याहुन अधिक निर्दोषी आहे. कारण मी तिला कराराप्रमाणे धाकटा मुलगा जो शेलाह त्याची पत्नी केले नाही. (तेव्हा तिने माझ्यापासूनच संतति उत्पादिली.) पुढे सासऱ्याच्या त्या गर्भापासून त्या विधवा सुनेला जुळे मुलगे झाले. त्या पुत्रांची नावे फारेस नि झाश. आणि हे दोन्ही जेकबचे नातू, जुडाचे पुत्र या नात्याने जेकबच्या कुटुंबात सामावले गेले.

(ज्या देवाने एर नि ओनन ह्या दोघांना सापेक्षतः क्षुल्लक अपराधासाठी रागावून ठार मारले म्हणून ही कथा सांगते, त्याच देवाने जुडाच्या ह्या कपटाचा वा या वेश्यागमनाचा वा त्या सुनेच्या श्वशुर संबंधाचा साधा निषेध सुद्धा वेळच्या वेळी कसा केला नाही? का त्याला ते कृत्य तितकेसे निषेधार्ह सुद्धा वाटले नाही? जेकबला जो देव पदोपदी नित्य दिसे नि हितगुज सांगे, त्या देवाने सुनेशी तिचाच सासरा जेकबचा पुत्र असा संग करू जात असता परमभक्त जेकबला वेळीच सावध कसे केले नाही? ह्या दोन्ही मुलांना जुडाची मुले म्हणून जेकबच्या कुटुंबात देवाने कसे सामावले? याचा उलगडा या कथेत सांपडत नाही; ते ठीकच. कारण अशा भक्तिविजय छापाच्या जेवढ्या कथा, तेवढया ज्यू लोकांत वा मुस्लिमांत वा आमच्यांत युक्तिसंगत अशा कधीच नसायच्याच! देवभोळेपणा हाच त्यांचा अलंकार!! फार काय, प्रत्यक्ष पैगंबर जेकबचा वडील मुलगा रुबेन हा आपल्या त्या बापाच्या दुसऱ्या पत्नीच्या शेजेस गेला तेव्हा देखील देवाने जेकबला ती आगाऊ सूचना दिली नाही! आणि लहानसहान प्रकरणी देखील वारंवार त्या भक्ताला देव म्हणे भेटून आगाऊ सावध करी! -लेखक)

समारोप

या यहुदी लोकांचा पवित्र धर्मग्रंथ, ज्याला ख्रिश्चन लोक जुना करार म्हणतात, त्याचा प्रथम खंड जो 'सृष्ट्युत्पत्ति' (द जिनेसिस) त्यातील स्त्रीविषयक माहिती देणारे मुख्य श्लोक एकत्र गुंफून त्यांचा अनुवाद या तिन्ही लेखांकांत आम्ही दिला. या तिन्ही लेखांकांतील नाना कथांवरुन न्यूनाधिक तीन सहस्त्र

वर्षापूर्वी पॅलेस्टाइन ते इजिप्तपर्यंत ये-जा करणाऱ्या अजपाल (धनगर) वृत्तीच्या प्राचीन यहुदी लोकांतील स्त्री एकंदरीत कशी असे याचे अगदी यथावत् चित्र वाचकांच्या डोळ्यांपुढे उभे राहते.

यहुदी लोकांचा हा धर्मग्रंथ इतिहास ह्या दृष्टीने अवघ्या मानव जातीची एक अत्यंत मूल्यवान ठेव आहे. अत्यंत प्राचीन अशा मानवी इतिहासाचे वेदअवेस्ता नि हा जुना करार हे धर्मग्रंथ म्हणजे जिवंत बोलपटच आहेत.

परंतु ह्या ग्रंथांविषयी त्यांच्या धार्मिक अनुयायांची जी आजवरची निष्ठा असे की, ते धर्म त्रिकालाबाधित, सर्वज्ञानमय, त्रिकालदर्शी आणि ईश्वरोक्त होत, ती निष्ठा मात्र हया धर्मग्रंथातील तार्किक कसोटीत चुकीची ठरते. ह्या तीन लेखांकांत ह्या एका धर्मग्रंथांतील अगदी पहिला नि अग्रगण्य खंड जो सृष्ट्युत्पत्ति, त्याच्यातील ज्या बहुतेक कथा नि कथानके आम्ही अनुवादिली आहेत, त्यांवरुनही तेच मत निर्विवादपणे स्पष्ट होते. कारण त्यातील सृष्टीज्ञान आज प्रयोगान्ती अनेक प्रकरणी अगदी भ्रांत ठरत आहे. देवाच्या लीलांची वा देवपणाची वर्णने भाकड ठरत आहेत, देवपणाला न शोभेशी आहेत. एका सर्वज्ञानमय धर्मग्रंथात ईश्वरोक्त म्हणून दिलेल्या आज्ञा वा ज्ञान तशाच ईश्वरोक्त म्हणविणाऱ्या दुसऱ्या तितक्याच प्राचीन धर्मग्रंथाशी अगदी विसंगत नि परस्पर विरुद्धही असलेली आढळत आहेत.

उदाहरणार्थ, या यहुदी धर्मग्रंथातील लेखमालेत अनुवादिलेल्या भागात देव स्वतः प्रकटून ईशप्रेषितांना ( पैगंबरांना) सांगतो की, मला गाईचा वा वृषाचाच बळी द्या. मोठेमोठे देवप्रिय कुलपति गाईला मारून गोमांसाची पक्वान्ने ह्या ग्रंथातील माहितीप्रमाणे धार्मिक संस्कारात खात होते. पण आमच्या इकडच्या त्याच काळच्या धर्मग्रंथांमध्ये गोवध हा कोणत्याही मनुष्याने काही केल्या करू नये, गोमांस खाणे हे पंच महापातकांप्रमाणे महापातक होय. कुठलेही असले तरी गोघ्न हे अत्यंत पापी नि बहिष्कार्य लोक होत, असे देव कंठरवाने आज्ञापीत आहे! एकाच वेळी देव अत्यंत विरुद्ध अशा आज्ञा सार्वभौम धर्म म्हणून, सार्वकालिक, त्रिकालाबाधित कर्तव्य म्हणून, आपल्या मानवी वंशाच्या प्रजेला निरनिराळया देशांत सांगून अश दुटप्पीपणाने त्यांच्यात भयंकर तेढ माजवून ठेवील हे शक्य नाही. असा दुटप्पीपणा साध्या माणुसकीला देखील कलंक - मग देवाच्या देवपणाला, देवस्कीला तर ते अगदीच हीनविणारे कृत्य ठरते!

दुसरे उदाहरण याच प्रकरणातील भाषांच्या गोंधळाविषयींचे पहा. पूर्वी सारी मनुष्यें एकच भाषा बोलत. त्यामुळे त्यांच्यात एकी होऊन ते मोठमोठीं कामे पार पाडू लागत. त्यांनी एक अत्युच्च मनोरा बांधण्यास आरंभिले. ते काम पाहण्यास देव आला. पण तो उच्च स्तंभ पाहताच देव म्हणाला,‘अरे, हे काय, ही माणसे अशीच जुटीने वागू लागली, तर आकाशास पोचेल असा उंच स्तंभसुद्धा हे बांधतील! छट्! हे उद्या देवासारखे समर्थ होतील! मग मला देव म्हणून कोण विचारतो?’ असे भिऊन नि रागावून देवाने माणसांची भाषा गोंधळून टाकली! भाषांत फूट पाडली? त्यामुळे एकाची भाषा दुसऱ्यास कळेनाशी होऊन मनुष्यांत पृथक भाषाभाषी जाती झाल्या, त्यांचे बळ घटले! (अध्याय ११ )

आता एक भाषा ठेवली तर त्याचा परिणाम काय होईल हे प्रथमच कळण्याइतका देखील देव दूरदर्शी नव्हता की काय? ‘देव तो स्तंभ बघण्यास आला तेव्हा त्याला ते कळले हे देवाच्या सर्वसाक्षीपणास लांछन

लावीत नाही काय? तिसरी विसंगति ही की, मनुष्यजातीत एकी नि जूट झालेली पाहून ज्या देवास आनंद न वाटता उलट मत्सर वाटतो, आपले देवपण जाऊ नये म्हणून जो मनुष्यांत फूट पाडतो तो देव, की कोणी 'फोडा नि झोडा' असे डुरकत प्रजेस पिळून काढणारा छळक कंस? नरास नारायण करील, मनुष्यास देव करील तो देव ही देवाची व्याख्या कुठे, आणि हा आपले देवपण जाऊ नये म्हणून मनुष्यांत फूट पाडणारा, आपल्या प्रजेस वेठीचे दास बनविणारा देवाचा दैत्यपणा कुठे!' अर्थात् अज्ञानी, भाबडया, अजपाल अवस्थेतील त्या तीन सहस्त्र वर्षापूर्वीच्या एका धनगर जातीतील ही एक दंतकथा होय! ज्याचे अक्षर नि अक्षर परम सत्य ईश्वरोक्त, त्रिकालदर्शी प्रेषितांनी प्रकटविलेले आहे, अशा, कोण्या धर्मग्रंथातील सूक्त नव्हे. धनगरांतील शिळोप्याची एक गोष्ट मनुष्याच्या भाषा भिन्न कशा झाल्या,ह्या विषयीच्या भाबडया साध्यासीध्या धनगर मंडळींतील एका शहाण्याचा एक तर्क, ह्या दृष्टीने वाचू गेले असता ही कथा किती गमतीची नि छान वाटते! पण अस्खलनीय, अशंकनीय, धार्मिक, ईश्वरी सूक्त, म्हणून ती वाचू लागताच तो निव्वळ वेडगळपणा वाटू लागतो. देवाची थोरवी वाढविण्याच्या ठायी देवाला दैत्याचे स्वरुप येते!

आणि ह्या भक्तिविजय छापाच्या भाबडया कथा ईश्वरोक्त, परमसत्य नाहीतच नाही, हे दर्शविणारा प्रबळ पुरावा म्हणजे हा की, देवाने बेबलच्या ह्या स्तंभासाठी तोवर साऱ्या मनुष्यजातीची असलेली एक भाषा गोंधळवून तीत फूट पाडली नि अनेक भाषा केल्या ती घटना, ह्या ईश्वरोक्त धर्मग्रंथात साडेचार हजार वर्षांपूर्वी घडली म्हणून निश्चित काळ दिलेला आहे. पण त्या काळी पॅलेस्टाईन पलीकडे प्राचीन चीन नि भारतासारख्या महाद्वीपांतून अनेक भिन्न भाषा शतको-शतके आधीच पकर्ष पावलेल्या होत्या! बिचाऱ्या पॅलेस्टाईनच्या अजपाल जातींना त्यांची नावेसुद्धा माहीत नसावीत हे अगदी साहजिक आहे. पण 'देव' ही इतका गैरमाहितगार असावा हे मात्र साहजिकच नाही. कारण सर्वसाक्षी, सत्यमूर्ति नि सर्वज्ञानमय तो देव ह्या देवाच्या व्याख्येशी हे अज्ञान पूर्णपणे विसंगत ठरते.

तिसरे आणि सर्वात निर्णायक उदाहरण म्हणजे या लेखमालेच्या आरंभीच अनुवादलेला या धर्मग्रंथातील पहिलाच अध्याय पहा. त्यात सृष्ट्युत्पत्तीची कथा आहे. आपल्या इकडील धर्मग्रंथातही सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधी अगदी प्राचीन काळी त्या काळच्या ज्ञानी सज्जनांनी किंवा कवींनी केलेले तर्कानि रचलेल्या कथा आहेतच. त्या वेदादिक आपल्या इकडच्या ग्रंथात चंद्र, सूर्य, वायु, वीज, पृथ्वी प्रभृति पदार्थांच्या उत्पत्ति नि व्यापार यांविषयी रचलेल्या कथा जशा आज विज्ञानाच्या प्रत्यक्ष प्रयोगसिद्ध ज्ञानाने लटक्या पाडल्या तशीच ही या मुस्लिम, ख्रिस्ती नि यहुदी लोकांच्या धर्मग्रंथांतील सृष्टीच्या उत्पत्तीची कथाही अक्षर नि अक्षर लटकी पाडली आहे! एक प्राचीन बुद्धिविकासाची चुणूक म्हणून, एक प्राचीन गमतीची कल्पना म्हणून, एक कथा, एक कविता म्हणून, हे सृष्टीच्या उत्पत्तींचे ह्या धर्मग्रंथाच्या अगदी आरंभीच हे ईश्वरोक्त म्हणून दिलेले सूक्त अगदी वाचनीय, गमतीचे नि गोड सुद्धा आहे. पण तीच मनुष्याच्या अज्ञानाची, एक कल्पित कथा आहे, विज्ञानाने तिला साफ चुकीची ठरविली आहे. तिला ईश्वरीय ज्ञानाची सत्यकथा, जिचे अक्षर नि अक्षर त्रिकालाबाधित सत्य आहे नि प्रत्यक्ष देवाने सांगितली आहे अशी ती अशंकनीय, पवित्र ईश्वरोक्ति आहे असे म्हणणे ईश्वरीय ज्ञानालाच अज्ञानग्रस्त ठरविण्यासारखे होते.

थोडी चुणूक म्हणून खालील दोनतीन विधेयेच ह्या दृष्टीने पाहू. ह्या सृष्टी कथेत म्हटले आहे, देवाने प्रथम पाणी निर्मिले, नंतर पृथ्वी, नंतर वनस्पति, आणि मग पृथ्वीवर उजेड देण्यासाठी सूर्य नि चंद्र निर्मिले! आता प्राचीन मनुष्याच्या सृष्टीची रहस्ये उलगडण्याचा एक आरंभीचा प्रयत्न, एक कल्पना म्हणून हे सूक्त विचारार्ह, मनोरंजक नि वाचनीय आहे. पण त्रिकालाबाधित ईश्वरी सत्य म्हणून त्याला मिरविले म्हणजे त्याला किती हास्यास्पद नि टाकाऊ ठरविले पाहिजे हे काय सांगावयास पाहिजे? आज विज्ञानाच्या प्रत्यक्षावगम्य पुराव्याने सिद्धिलेल्या ज्ञानाशी ते पूर्णपणे विसंगत आहे, अगदी लटके आहे. सूर्य प्रथम झाला, आणि तो केवळ पृथ्वीवरील माणसांना उजेड देण्यासाठीच काय तो झालेला नाही. वेळी सारी पृथ्वी, तिच्यावरील सारे धर्मग्रंथ, देवळे, मशिदी, चर्चेस सुद्धा क्षणार्धात भस्म करुन टाकण्यासही तो सूर्य सोडणार नाही. मनुष्य केला तो म्हणे या साऱ्या पृथ्वीचा भोग घेण्यासाठी! पण हजारो माणसांनाच वाघ, सिंह गट्ट करुन आजवर माणसांचा भोग घेत आले, त्याचे काय? प्रथम पुरुष केला, नि त्याची एक बरगडी घेऊन त्यावर रक्त, मांस थापून देवाने स्त्री 'केली'! ज्यांनी ह्या कथा रचल्या त्यांना जवळचा कोणी कुंभार मूर्ति, पुतळे, मडकी मातीची बनवितो हे दिसत होते; याच किल्लीने त्यांनी मनुष्य नि स्त्री 'करण्याचें' 'बनविण्याचे' हे कोडे सोडविले! देव हा एक महान कुंभार. त्याला वाटले, पुरुष 'केला' त्याचीच एक बरगडी घेऊन स्त्री 'केली!' स्त्रीची ऐटीची ठेवण पाठीच्या बाजूने बरगडीसारखी बाकदार दिसतेही! जी सृष्टि केली ती सारीची सारी किडामुंगीसुद्धा एका सहा दिवसांत करुन टाकून थकलेला देव विसावा घ्यावयास ज्या दिवशी गेला, तो रविवार! म्हणूनच आपण साऱ्यांनी आता देखील रविवारी कामकाज बंद केले पाहिजे!

पृथ्वी उत्पादिल्यानंतर तीन दिवसांतच मनुष्य बनविला असे ही कथा सांगते. पण विज्ञानाने भूगर्भाधारे सिद्धिले आहे की, पृथ्वी प्रकटल्यानंतर लाखो वर्षे मनुष्य अस्तित्वाच नव्हता. तो एका झटक्यासरशी कुंभाराने मडके करावे तसा केला नाही, तर तो सर्पस्तन्यप्रभृति प्राणिवर्गाचा विकास होता होता विकसत आलेला आहे!

मुले विचारतात, 'आजी, हे गडगडते ग काय?' तेव्हा आजी सांगते,'बाळा, एक म्हातारी आकाशात आहे ती तिच्या घरच्या एका मोठया जात्यात हरभरे भरडते आहे हो!'

आजीबाईंचे हे बालोपयोगी सृष्टिविज्ञान जसे गमतीचे तसेच आपल्या वा मुस्लिम, ख्रिश्चन, यहुदी प्रभृति अनेक प्राचीन धर्मग्रंथांतील सृष्टीविषयीच्या या कल्पित कथा गमतीच्या आहेत! सृष्टिविज्ञान म्हणून त्यापेक्षा त्यांचा आज काही उपयोग नाही.

परंतु त्यांना धर्मग्रंथातील त्रिकालाबाधित सत्यज्ञान समजले गेल्याने त्यांच्यापासून हानि मात्र अतोनात झाली आहे. वरील आजीबाईच्या गोष्टीतील गडगडण्याचे कारण ईश्वरोक्त सत्य म्हणून शाळेत मुलांना जर आपण शिकवीत राहिलो तर जितकी हानि होईल त्याच्या लक्षपट हानि वरील दंतकथांना धर्मकथा म्हणून, अशंकनीय सत्य म्हणून शिकवीत राहिल्याने झालेली आहे, होणारी आहे. कसे ते पहा.

ह्या सूक्ताला ईश्वरोक्त सूक्त मानल्याने युरोप उणेपुरे एक सहस्त्र वर्षे सृष्टिविज्ञानविषयक अज्ञानाच्या अंधकारात गाडले गेले होते. कोणी म्हटले पृथ्वी गोल आहे, की तो या सूक्ताविरुद्ध बोलतो

म्हणून ठार झालाच! कोणी म्हटले पृथ्वी फिरते, की तो हया सूक्ताविरुद्ध बोलतो म्हणून जिवास मुकलाच! कुणी म्हटले सूर्य पृथ्वीआधी होता, सात दिवसांत सारी सृष्टि, कोट्यविध प्राणी, कीडमुंगी मनुष्यप्राणीसुद्धा सायसंगीत केली ही या सूक्तातील क्लृप्ति भ्रम असून लक्षावधि वर्षांनी विकसत सृष्टि होत गेली; आजही प्राणी, मनुष्य, पक्षी विकसत जात आहेत असे जेव्हा विकासवादी (इव्होलूशनिस्टस) म्हणू लागले तेव्हा पोपची पाखंडनाशक गदा त्यांच्या डोक्यावर आदळली! सशस्त्र क्रान्त्या होऊन बॅस्टीलचा बंदीगड फोडून टाकून जसे बंदिवान सोडवावे लागले, तसे या सूक्ताचे तट फोडून सृष्टिविज्ञानास धर्मवेडाच्या बंदीतून सोडवावे लागले! तेव्हाच काय ते गेल्या तीनशे वर्षांमध्ये युरोपात सृष्टिविज्ञान बुद्धिवादाच्या पायावर उभारले गेले, आणि त्यासरशी युरोप आज सृष्टिशक्तींना आपल्या सेवेस, गाडीला बैल जुंपावे तसे जुंपीत चालला आहे. युरोपात आज या कथेस एक शिळोप्याची गप्प यापलीकडे कोणीही शिक्षित अधिक महत्व देत नाही.

ईश्वरकृत वा ईश्वरप्रेषित म्हणून मानले जाणारे सर्व धर्मग्रंथ हे मनुष्यकृत आहेत हे वेदादिकांच्या बुद्धियुक्त निरीक्षणावरून जसे ठरते, तसेच मुस्लिम कुराण, ख्रिस्ती बायबल नि यहुदी धर्मग्रंथांचे मूळ जो हा जुना करार, हे 'बुक ऑफ मोझेस' त्यावरुनही सिद्ध होते. त्या सर्व ग्रंथांचे ऐतिहासिक, वाङ्मयिक महत्व अपूर्व; मनुष्यजातीची ती अत्यंत आदरणीय, अभ्यसनीय वाक्संपत्ति इतकेच काय ते खरे. त्यातील शब्दन शब्द खरा नाही. अनेक कथा निव्वळ कल्पना! विज्ञानाच्या कसोटीस न टिकेल ते हया वेद, अवेस्ता, कुराण, बायबल, मोझेसोक्तादि ग्रंथांत असले तरी ते टाकाऊ हेच सत्य. पूर्वीचे युग ते सत्ययुग नव्हे! अतिप्राचीन ते ते अतिपूज्य, अतिध्येय, अतिपवित्र असले पाहिजे ही गोष्ट खोटी आहे.

या लेखमालेत स्त्रीविषयक तेवढाच भाग जरी या धर्मग्रंथातून अनुवादिणे भाग पडले असले, तथापि तेवढयावरुनही आपल्या वेदांत वा यहुद्यांच्या जुन्या करारात जे वर्णिले तेच सत्ययुग ही आपली, वा मुस्लिम, ख्रिश्चन, पार्शी, यहुद्यांतील पौराणिकांची समजूत किती भ्रांत आहे हे स्पष्टपणे उलगडून दाखविता येते. स्त्रीविषयक कल्पना, आचार, वर्तन, व्यवहार जे हया लेखमालेत हया यहुद्यांच्या अतिप्राचीन ईश्वरोक्त ग्रंथांतून दिले आहेत, त्यांतील दोनचार उदाहरणांची छाननी केली असता हे सहज सिद्ध होते.

पहिले उदाहरण म्हणून स्त्रीच्या उत्पत्तीचीच कथा पहा! स्त्रीनेच मनुष्यजातीचा सर्वनाश केला! स्त्री हीच मनुष्यजातीतील पहिला पापी! तिसऱ्या अध्यायात सांगितले आहे की, आदम नि त्याच्या बरगड्यापासून निर्मिलेली स्त्री, ईव्ह. हया जगातील पहिल्या स्त्रीपुरुषांना देवाने सांगितले की, 'ज्ञानवृक्षाचे फळ खाऊ नका!' कारण, नाही तर मनुष्य देवासारखा ज्ञानी होईल अशी देवाला भीति पडली!! ('न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते!' हे सांगणारा गीतेतील भगवान कुठे आणि मनुष्यांनी अज्ञानी राहावे म्हणून जिज्ञासेसच निषेधिणारा हा जेनेसिसमधला देव कुठे?) परंतु देवाचा डोळा चुकवून सापाने ईव्हला म्हटले, 'ते ज्ञानफळ खा.' म्हणून तिने ते खाल्ले, आदमने पण खाल्ले, आणि त्यामुळे देव रागावला! शिक्षा काय दिली ईव्हला? तर स्त्रीला यावच्चन्द्रदिवाकरौ प्रसूतिवेदना भोगाव्या लागतील! आता या गोष्टीवरुन हे उघड होते की, पहिली स्त्री नि पहिला पुरुष हे खोटे बोलणारे, देवाधर्माला न जुमानणारे, पहिले पापी होते!

तेव्हा सत्ययुगात जिकडे तिकडे देवप्रिय, पुण्यवान धर्मभीरु, संयमी स्त्रीपुरुषांची रेलचेल उडालेली होती, ही समजूत आपल्या पुराणांतील वर्णनाप्रमाणेच यहुदी पुराणांवरूनही लटकी पडते.

आदम आणि ईव्ह - मनुष्यांची अगदी आद्य मातापितरे - अगदी नग्न असत. देवाला तेच फार आवडे! पण पुढे ती दोघे ज्ञानफळ खाऊन देवापुढे नागवेपणी यावयास लाजू लागली; तेव्हा देव त्यांच्यावर त्यांच्या संकोचाविषयी भयंकर रागावला! नागवेपणाच्या संकोचामुळेच आदम नि ईव्ह ही देवमाणसे नागवली गेली हे वाक्य कोणत्याही अर्वाचीन नग्न संघाच्या द्वारावर कोरून ठेवण्यास हरकत नाही! सत्ययुगात नग्नसंघांना प्रतिबंध नव्हता. सत्ययुग ज्यांना चांगले म्हणावयाचे त्यांना नग्नसंघास एकदम वाईट म्हणता येणार नाही! नग्नसंघ ही काही नवमतवादाची संस्था म्हणता येणार नाही!

ईव्ह नि आदम ह्यांना नग्नतेची जाणीव झाली, त्यांनी ज्ञानफळ खाल्ले, या त्यांच्या अपराधासाठी देवाने त्यांना नंदनवनातून हुसकून देण्याची शिक्षा दिली. अपराध ईव्हचा, तिला प्रसूतिवेदनांचा दंड झाला तोही चालेल; पण त्या एका ईव्हच्या अपराधासाठी साऱ्या स्त्रियांना वंशपरंपरा, सीतेसारख्या साध्वीस सुद्धा जो त्या प्रसूतिवेदनांचा दंड देवाने दिला म्हणून ही कथा सांगते तो खरा असल्यास आदम, ईव्ह ह्या सत्ययुगातील माणसांप्रमाणे सत्ययुगातील तो देवही अगदी अविचारी होता असे तरी म्हटले पाहिजे, नाही तर ही कथा ईश्वरोक्त, परमप्रमाण त्रिकालाबाधित धर्मकथा नसून एक कुतूहलप्रिय साध्याभोळया माणसाची दंतकथा आहे असे म्हटले पाहिजे. पुन्हा ईव्हसाठी प्रसूतिवेदनांचा शाप मानवी स्त्रियांना दिला म्हणून ही कथा म्हणते. पण पशूंतील माद्यांनाही प्रसूतिवेदना होतात त्या का? ईव्ह स्त्री होती म्हणून केवळ मानवी स्त्रियांनाच नव्हे, तर अवघ्या स्त्रीलिंगालाच तो शाप भोवला असेल तर ती अन्यायाची परमावधि झाली म्हणावयाची! ख्रिश्चन साधूंच्या मठात पूर्वी ब्रह्मचर्याचा असा कडक नियम असे की, मठात स्त्रीच काय, पण स्त्रीलिंगी मांजरी, कुत्री, हरिणी, उंदरी, घुशी सुद्धा कोणताही प्राणी फिरकता कामा नये! त्यातलीच ही एक गोष्ट म्हणावयाची! उद्या एखादी स्त्री चोरी करताना पकडली की, तिच्या अपराधासाठी अवघ्या स्त्री जातीलाच नव्हे तर स्त्रीलिंगी, त्या त्या पशुपक्ष्यांतील साऱ्या माद्यांना सुद्धा वंशपरंपरा पंचवीस पंचवीस फटके मारण्याचा दंड जर कोण्या वेड्या महंमद तघलकाने दिला, तर त्याला आपण काय म्हणू? परंतु ही कथा खरी धरल्यास सत्य युगात हाच न्याय होता असे म्हणणे भाग पडेल!

सत्ययुगातील स्त्रीपुरुष संबंध

आपल्या पुराणांतून प्राचीन स्त्रीपुरुषांच्या आणि मोठमोठया ऋषिपत्न्या, राजकन्या, महर्षि, राजर्षि यच्च्याच चरित्रांतून नव्हे, तर देवदेवतांच्या चरित्रांतूनही काही काही प्रसंगी आजच्या बोल्शेव्हिक रशियातील स्त्रीपुरुषसंबंधांनाही मागे सारणारी वर्णने जशी आढळतात, तशी या यहुदी देशातही आढळतात. ही गोष्ट त्या ग्रंथातील स्त्रीविषयक जी जी चरित्रे या मालेत वानगीदाखल अनुवादिली आहेत, त्यावरुन वाचकांचे ध्यानी आलीच असेल. यासाठीच 'न देवचरितं चरेत्!' किंवा ऋषीचे कूळ नि नदीचे मूळ शोधणे कठीण असे म्हणण्याचा शिष्टसंप्रदाय पडला आहे नि तो योग्यही आहे. परंतु सत्ययुगात जिकडे तिकडे न्याय, नीति, शील, संयम यांचेच राज्य होते, पापाची प्रवृत्तिच माणसात नसे, नव्हे माणसे, माणसे

नसून देवच होती ही जी पौराणिकांची कल्पना असते, ती आमच्या पुराणांप्रमाणेच ह्या यहुदी पुराणांवरुनही साफ चुकीची आहे हे कोणी विसरु नये. एवढयासाठीच या गोष्टीस उल्लेखिणे भाग आहे.

त्यातही आमच्या हिंदु पुराणांतील काही घटना घेऊन त्यांचाच तेवढा पक्षपाती बोभाटा करणाऱ्या आणि आपल्या पायाखाली वा पदराखाली काय आहे ते मात्र लपवून ठेवू पाहणाऱ्या पोटभरू मिस मेयो प्रभृति अहिंदु विदूषकांची तोंडे बंद पाडण्यासाठी निर्भेळ न्यायाच्या दृष्टीनेही खालील उल्लेख आवश्यकच आहेत.

बहीणभावांची लग्ने (अ. ४ ते ५); देवप्रिय कुलपति नोहा मद्यातिरेकाने बेशुद्ध होते (अ. १०) देवप्रिय साक्षात्कारी अब्राहाम लोक आपणांस मारतील ह्या भयाने आपल्या बायकोला बहीण म्हणून म्हणतो, नि तिला तिच्यावर लोलूपलेल्या परपुरुषाच्या घरी राहू देतो; सावत्र बहिणीशी लग्ने, अनेक स्त्रियांशी लग्ने, दासीशी संबंध, सख्या बहिणी सवती होतात, चुलतबहीण, मामेबहीण, आतेबहीण ह्यांशी लग्ने; सवती सवतींचा साध्वी स्त्रियांतही माजलेला भयंकर मत्सर यांची उदाहरणे तर पानोपानी आहेत. देवप्रिय थोर लॉट निपुत्रिक मरू नये यासाठी त्याच्या दोन्ही कन्यांनी त्या पित्यापासूनच धारण केलेले गर्भ (अ. १९ ), देवप्रिय जेकब आपल्या पित्याला फसवितो (अ. २७ ) लेबन हा जेकबला धाकटी मुलगी देतो असे सांगून रात्री त्याच्या शेजेस कपटाने वडील मुलीलाच धाडतो, दिराचा विधवा भावजयीशी नियोग; याच लेखात दिलेल्या विधवा तोमरने आपल्या सासऱ्याशीच कपटसंभोग; त्यापासून झालेले संतान कुलीन ठरविणे; भाऊ भावाला ठार मारण्यास सोडीत नाहीत; बायकांना कोणत्याही प्रकारचे विवाह स्वातंत्र्य नसणे, जेकब कुलपतीच्या दुसऱ्या स्त्रीचा त्याच्याच मुलाने (रुबेनने) संभोग घेणे इत्यादि अनेक घटना या लेखमालेत ह्या ग्रंथांतून ज्या आधारांसह अनुवादिल्या आहेत त्यावरुन आमच्या इकडील सत्ययुगाप्रमाणेच यहुद्यांच्या, ख्रिस्त्यांच्या, मुस्लिमांच्या या सत्ययुगातही माणसे कितीही थोर झाली तरी माणसेच होती हेच सिद्ध होत नाही काय? सत्ययुग पूर्वी होऊन गेले. त्या काळचे हे धर्मग्रंथ ईश्वरोक्त, ईशप्रेषित आहेत, सत्ययुगातील ऋषि, राजे, पैगंबर, स्त्री-पुरुष, सारेच अतिमानुष होते; ते सत्याचे, संयमाचे, ब्रह्मचर्याचे, पुण्याचे निरपवाद आदर्श होते, ह्या आमच्या इकडच्या पौराणिकांच्या प्रमाणेच यहुदी ख्रिस्ती, मुस्लिम पौराणिकांच्या समजुतीही त्यांच्या या ग्रंथाधारेच पूर्णपणे भ्रामक ठरतात हे दाखविण्यासाठीच काय तो वरील घटनांचा उल्लेख करावा लागतो. ज्या ख्रिस्ती सोवळया चर्चांमधून आजचे रशियन बोल्शेव्हिक वाङ्मय अनैतिक म्हणून निषेधिले जाते त्यात ह्या कथा धर्मकथा!

परंतु समारोपातील ह्या सर्वसामान्य विधेयांचा उल्लेख केल्यानंतर, ह्या साऱ्या आज भ्रामक ठरणाऱ्या समजुती वजा घालताही ही या धर्मग्रंथांची जी थोरवी उरते तीही इतकी मोठी आहे की, ज्यांनी तो ग्रंथ वेळोवेळी रचून संग्रहिला, त्यांनी अवघ्या मनुष्यजातीवर एक उपकारच केला आहे. त्याची भाषा नि वर्णनशैली इतकी साधी नि चटकदार आहे की, त्या कथा कितीही वाचल्या तरी वाचाव्याशाच वाटतात. त्या वेळच्या समाजाचे चित्रच त्या डोळयापुढे उभे करतात. ज्या अब्राहाम, ऐझाक, जेकब, जोसेफ, मोझेस प्रभृति थोर थोर कुलपतींच्या कथा त्यात गोविल्या आहेत त्यांत, आणि ज्या घटना त्यांत उल्लेखिल्या आहेत त्यांत एकंदरीत ऐतिहासिक तथ्य पुष्कळच आहे. ईश्वरोक्त म्हणताच त्याची थोरवी जरी कितीही

उणावत असली, तरी मनुष्यकृत म्हणताच ती किती तरी दुणावते! अशा या जागतिक महत्वाच्या ग्रंथास आणि अत्यंत कर्त्या अशा हिब्रू जातीच्या, यहुदी कुलाच्या अब्राहाम, जेकब, मोझेस प्रभृति प्राचीनतम कुलपतींना वारंवार वंदून आम्ही ही लेखमाला पुरी करतो.

-(स्त्री मासिक, मार्च, एप्रिल, मे १९३६)

www.savarkarsmarak.com

रशियातील घटस्फोट - स्वातंत्र्याचा प्रयोग

रशियामध्ये बोल्शेव्हिक क्रांति झाल्यावर जी उलाढाल झाली, ती काही इतर अनेक क्रांत्यांप्रमाणे केवळ राजकीय स्वरुपाचीच काय ती नव्हती. किंवा इतर अनेक सामाजिक वा धार्मिक क्रांत्यांप्रमाणे निव्वळ धार्मिक वा सामाजिक कक्षेतच काय ती सामावलेली नव्हती. तिचे आनुवंशिक परिणामच नव्हेत तर तिचा हेतूच तिचे सुस्पष्ट ध्येयच, मुळापासून मनुष्यसमाजाच रचनाच नव्या पायावर करावयाचे होते. राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक - समाजाचे सर्व पैलू नव्याने पाडायचे काम त्या क्रांतीने हाती घेतले होते.तिला मानवी समाजाच्या जीवनाचीच दिशा बदलावयाची होती. ती एक नुसती राज्यक्रांति, एक नुसती धर्मक्रांति, एक नुसती अर्थक्रांति किंवा एक नुसती समाजक्रांतिच काय ती नव्हती, तर ती रशियन क्रांति होती एक जीवनक्रांति!

प्रत्येक क्रांति हा एक प्रयोग असतो. आजवरच्या साऱ्या क्रांत्यांमध्ये अधिक सर्वंव*ष नि मानवी जीवनचे जीवनच बदलू पाहणारी रशियन क्रांति ही त्याच कारणासाठी एक अत्यंत अपूर्व, सर्वंकष, जितक्या धाडसाचा तितक्याच धोक्याचा असा मनुष्य समाजाने केलेला एक मोठयातील मोठा सांघिक प्रयोग होता.

त्याच्या पंधरावीस वर्षांच्या अनुभवानंतर आता असे म्हणावयास हरकत नाही की, तो कल्पनेबाहेर यशस्वी झाला आणि अपेक्षेबाहेर फसला. दोन्हीपक्षी मनुष्याच्या ज्ञानात नि अनुभवात त्या प्रचंड प्रयोगाने अपूर्व नि अमूल्य भर टाकली.

मानवी जीवनातील इतर संबंधांप्रमाणेच त्याच्या वैवाहिक संबंधातही आमूलात् क्रांति घडवून विवाहाचे मूल्यमापन बदलून टाकण्याचा त्या जीवनक्रांतीने केलेला यत्नही तसाच अपूर्व धोक्याचा नि धाडसाचा होता. त्याचे परिणाम काय होतील याचे त्या प्रयोगकर्त्यांना देखील अचूक निदान करता येण्यासारखे नव्हते. पण आता इतक्या वर्षांनंतर ते परिणाम निश्चित रूपकाही अंशी धरू लागले असल्यामुळे त्यांची पाहणी करण्याचे काम रशियन पुढाऱ्यांनी जे हाती घेतले ते योग्यच केले.

विवाहसंबंधातील सुधारणांमध्ये सगळ्यात धाडसाची आणि कोणत्याही राष्ट्राने आजवर अशा प्रमाणात प्रयोजून न पाहिलेली सुधारणा म्हणजे ‘घटस्फोट स्वातंत्र्य’ हीच होती. क्रांतीपूर्वी रशियातील लग्नबंधने अगदी करकच्च आणि घटस्फोटाची अनुज्ञा अगदी अपवादात्मक असे. क्रांति होताच स्त्रीपुरुषांची ही करकच्च विवाहबंधने अकस्मात गळून पडल्यासारखींच झाली! पक्का बंधारा घालून अगदी थेंबदेखील न वाहू देता तुंबवून ठेवलेला तुंबळ प्रवाह, तो बंधारा एकदम फुटताच त्याच्याच उखळलेल्या भिंती, पायाच्या दगडांनासुद्धा लाटांवर भिरकावीत धो, धो करीत अस्ताव्यस्त दाटीने जसा वाहू लागतो, तशीच स्थिति रशियामध्ये क्रांति होताच स्त्रीपुरुषांसंबंधीची झाली. समता दुथडी भरभरुन वाहत चालली! नातेगोते, जात-पात, वय-वशिला, मुहूर्त - मध्यस्थी, टिपण-टीका-धरबंध तेवढा सुटून वाटेल त्या स्त्रीने वाटेल त्या पुरुषाशी वाटेल तेव्हा ‘संबंध’ ठेवावा; सरकारी नोंदवहीत तो संबंध नोंदविण्याची लहर जर कोणास आली तर त्याच संबंधाला लग्न म्हणावयाचे! संपले. हाच विवाह. आणि ज्या वेळी ज्यास वाटेल त्या स्त्रीने वा पुरुषाने तो संबंध अथवा विवाह संपला असे सरकारी नोंदवहीत

लिहावे की झाला घटस्फोट. त्या घटस्फोटास एकच काय ते कारण पुरे! इच्छा! क्रांतीनंतर रशियामध्ये विवाहस्वातंत्र्य आणि घटस्फोटस्वातंत्र्य जे प्रत्येक स्त्रीपुरुष नागरिकाला एक जन्मसिद्ध अधिकार म्हणून मिळाले, त्याची या लेखापुरती ही रूपरेषा पुरेशी आहे.

पण! या स्वातंत्र्याचे सहचारी असे एक बंधन मात्र कोणासही टाळता येणारे नव्हते. या संभोगस्वातंत्र्याच्या अधिकाराचे प्रतियोगी असे एक जे अपरिहार्य कर्तव्यही प्रत्येक नागरिकास पाळावेच लागे, ते अपत्यसंगोपन हेच होय. कोणच्याही राष्ट्रात नसेल इतक्या कडकपणे रशियन सरकार ह्या अपत्यसंगोपनाच्या कर्तव्याची बजावणी प्रत्येक नागरिकाकडून करुन घेत आले आहे.

विवाहबंधनाच्या पायावर उभारलेली साऱ्या जगातील मानवसमाजाची रचनाची रचना एखाद्या बौद्ध विहारासारखी जशीची तशी आमूलात् उचलून घटस्फोटस्वातंत्र्याच्या पायावर नेऊन स्थापण्याचा, बौद्ध विहारांचे बोलपटगृह बनवून सोडण्याचा, अद्भुत रशियन क्रांतीचा हा प्रयोग पंधरा वर्षे सतत जो चालला त्याचे परिणाम तरी काय झाले? आज रशियात माणसाचा अतिमानुष झाला की अमानुष? का माणसाचा माणूसच राहिला?

प्रत्येक चिंतनशील व्यक्तीला हा प्रश्न अभ्यसनीयच वाटणार ; अगदी साध्या संसारी स्त्रीपुरुषांना आणि अल्लड कुमारीकुमारांनाही त्याची माहिती हवीशीच वाटणार ; यामुळेच जगातील यच्चयावत् वृत्तपत्रांतून रशियातील या स्त्रीपुरुषसंबंधातील अपूर्व क्रांतीच्या वर्णनाविषयी नि परिणामाविषयी उलटसुलट लिखाण सारखे येत असते. पण स्वतः रशियन लोकांचा प्रत्यक्ष अनुभव काय आहे, त्या प्रयोगाची शास्त्रोक्त छाननी होऊन त्याच्या परिणामाच्या पद्धतशीर नि अधिकृत चौकशीमध्ये त्या घटस्फोटस्वातंत्र्याचा दुरुपयोग होत चालला आहे की सदुपयोग, समाजाच्या हितास एकंदरीत तो प्रयोग अनुकूल ठरत आहे की प्रतिकूल, मनुष्यसमाज त्या पायावरही अस्थिर राहू शकतो की कोलमडून पडतो, याची त्या वृत्तपत्रांतील खऱ्याखोटया भरमसाट लेखांतील उलटसुलट चर्चेमुळे, सामान्य वाचकांना काहीच नक्की कल्पना येत नाही. यास्तव रशियन सरकारचे सरकारी वृत्तपत्र जे 'अज्व्हेस्टिआ' त्या अधिकृत रीत्या प्रसिद्ध झालेल्या अलीकडच्या लेखात एका तज्ज्ञ रशियन महिलेने चौकशीमंडळाचे घटस्फोट स्वातंत्र्यावरील प्रतिवृत्त पकाशिले आहे. त्यातील मुख्य भावार्थ आम्ही या लेखात अनुवादीत आहोत. त्यावरुन ज्याचे त्यास काय अनुमान बांधावयाचे ते बांधता येणे पुष्कळ सोपे जाईल. स्वतः रशियनांनीच चौकशी करुन छापलेले हे प्रतिवृत्त असल्यामुळे त्यांना स्वतःला आज ते कितपत मानवेलसे वाटते, ते तरी त्यांच्याच अधिकृत शब्दांमध्ये आपणांस ह्या प्रतिवृत्तात ऐकावयास मिळते, हे या लेखाचे एक वैशिष्टयदेखील अभ्यासूंना केव्हाही उपेक्षणीय वाटणारे नाही ; सर्वसाधारण वाचकांनाही आकर्षक वाटल्या वाचून राहणार नाही. महिला वर्गाला तर हा घटस्फोटस्वातंत्र्याचा प्रश्न अगदीच जिव्हाळयाचा; कारण घटस्फोटाच्या खिंडीत जर कोणाच्या जिवास अधिक धोका असेल तर तो आसन्नप्रसवा महिलांच्याच होय. सृष्टीनेच ती विषम वाटणी केलेली आहे. स्त्रीपुरुषांमध्ये ह्या प्रसवविषमतेचीही समसमान वाटणी करणे आज तरी मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे; तिथे आजचा बोल्शेव्हिक झाला तरी करणार काय?

दहा शतकांनंतरचे प्रगत विज्ञान तशी एखादी युक्ति काढते की काय ते कोणी सांगावे? वरील चौकशीमंडळाच्या प्रतिवृत्तातील महत्वाचा भाग असाः

‘ एके दिवशी सकाळी एव्हान अलेक्झेव्हिच नांवाच्या रशियन नागरिकास मोठा अचंबा वाटला की, त्याला आपल्या बायकापोरांच्या पोषणार्थ काय व्यवस्था करतोस ते विचारण्यासाठी ‘जनिक न्यायालया’चे बोलावणे आत्ताच्या आत्ता हे असे काय म्हणून यावे? गोष्ट खरी की त्याने अलीकडेच आपल्या पत्नीशी घटस्फोट करण्याची अनुज्ञा घटस्फोट-अधिकाऱ्यांकडून मिळविली होती. आपण तुझ्याशी घटस्फोट केला आहे ही बातमीसुद्धा त्याने तिला अजून कळविली नव्हती. कारण रशियातील नव्या निर्बंधाप्रमाणे (कायद्याप्रमाणे) पतिपत्नींपैकी कोणीही एकटयाने जरी घटस्फोट कार्यालयात जाऊन घटस्फोट मागितला, तरी तो का हे काही एक कारण न विचारता आणि दुसऱ्या पक्षाची त्यास संमति आहे की नाही, दुसऱ्या पक्षाला ती गोष्ट कळली आहे की नाही, हे देखील न पुसता त्याला घटस्फोटाची अनुज्ञा द्यावी लागते. बायकोलाही इच्छा होताच, नवऱ्यास न विचारता, काही कारण न सांगता, वाटेल तेव्हा सरकारी कार्यालयात जाऊन, आपण घटस्फोट करणार असे सांगण्यासरशी काडीमोड करता येते. अलेक्झेव्हिच त्याच्या बायकोला आपण काडीमोड करण्याची बातमी हळुहळु कळविणार होता. लग्नातील त्याच्या मुलांच्या पोषणाचा भारही तो तिच्या विचारे विभागून घेणार होता. पण ते काही असले तरी त्याला विचारणारे हे ‘जनिक’ (पब्लिक) अधिकारी कोण? याचा त्याला राग आला! मी रशियन नागरिक, घटस्फोट हा प्रत्येक रशियन स्त्रीपुरुषांचे एक जन्मसिद्ध स्वातंत्र्य! जसे मतस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, विवाहस्वातंत्र्य, संभोगस्वातंत्र्य, तसेच प्रत्येक नागरिक स्त्रीपुरुषास घटस्फोटस्वातंत्र्य हेही एक जन्मसिद्ध स्वातंत्र्य आहे! मग हे न्यायालयाचे बोलावणे काय, उत्तर विचारण्याची ऐट काय! - असे रागाने पुटपुटत तो अलेक्झेव्हिच त्या सरकारी कार्यालयात काय गैरसमज झाला ते बघण्यास तावातावाने गेला.

पण वास्तविक गैरसमज असा अधिकाऱ्यांचा झालेलाच नव्हता! रशियन निर्बंधाप्रमाणे प्रत्येक नागरिकला घटस्फोटांचे स्वातंत्र्य जसे होते, तसेच त्या स्वातंत्र्याचे प्रतियोगी असे अपत्य संगोपनाचे एक बंधनही धातलेले होते. अलेक्झेव्हिच याने काडीमोड केली ती एकपक्षी होती, त्याची पत्नी या वेळी अधिकाऱ्यासमोर उपस्थित नव्हती, मुले आहेत हे मानले असताही त्यांची जोपासना कोण करणार, त्यांची हमी कोण देणार, पण पतिपत्नीत त्या बोजाची वाटणी ते दोघे कशी करणार, हे काहीच अलेक्झेव्हिचने घटस्फोटाधिकाऱ्यांना सांगितलेले नव्हते. अशा प्रकरणी घटस्फोट जरी देण्यात आला तरी रशियन निर्बंधाप्रमाणे ते प्रकरण त्या अपत्यसंगोपनाच्या चौकशीसाठी ‘जनिक न्यायालय’ नांवाच्या विशिष्ट संस्थेकडे धाडावे लागे, आणि त्या अधिकाऱ्यांकडून त्या घटस्फोटी व्यक्तीला बोलावून वरील व्यवस्था करण्यात येत असे. पण घटस्फोटस्वातंत्र्याची तेवढी सोयीची नैर्बंधिक माहिती खडान खडा असणाऱ्या त्या अलेक्झेव्हिचला ह्या अपत्यसंगोपनविषयक कर्तव्यासंबंधी रशियाचा सरकारी निर्बंध आहे ती गैरसोयीची नैर्बंधिक माहिती तेवढी नव्हती! ‘घटस्फोट’ किंवा ‘विवाह’ किंवा नुसता ‘संबंध’ हे जरी सर्वस्वी व्यक्तीच्या आवडीनिवडीचे प्रश्न म्हणून रशियन निर्बंधाने व्यक्तीच्या इच्छेवर सोपविले असले, तरी रशियन निर्बंध, सोव्हिएट सरकार, अपत्यसंगोपन हा विषय काही व्यक्तीच्या इच्छेवर सोडीत नाही. तो

व्यक्तिस्वातंत्र्याच्या कक्षेबाहेरील राष्ट्राच्या अधिकारातला विषय. रशियनांची अपत्ये ही रशियन राष्ट्राची संतति. ते जे राष्ट्रीय सोव्हिएट सरकार 'स पिता पितरस्तेषाम् केवलं जन्महेतवः!' ही जाणीव अलेक्झेव्हिचला नव्हती म्हणून त्याला अधिकाऱ्यांचाच गैरसमज झालासे वाटले. वास्तविक पाहता गैरसमज असा त्याचाच झालेला होता.

रशियन नागरिकांमध्ये घटस्फोटविषयक निर्बंधाची ज्याला यथास्थित जाणीव नाही आणि त्यामुळे ज्याला अपत्यसंगोपनाचे आपले दायित्व (जबाबदारी) काय याची बिनचूक माहिती नाही असा वरील अलेक्झेव्हिच हा एकच गृहस्थ होता काय? जर तो तसा एक अपवाद नसेल तर वैवाहिक कर्तव्याविषयी जाणीव नसलेले असे किती नागरिक रशियामध्ये आहेत? किती लोक अगदी अशाच निष्काळजी बेछूटपणे लग्नाच्या पाशात शिरतात? रशियाने चालविलेल्या या स्त्रीपुरुषसंबंधविषयक क्रांतिकारक प्रयोगाचे काय परिणाम झाले आहेत? लग्न, संभोग, संबंध, घटस्फोट, अपत्य नि कुटुंब या अत्यंत गंभीर विषयांसंबंधीच्या आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची हेळसांड इतक्या मोठया जनसंख्येकडून होत आहे की काय, की ते रशियन समाजाचेच एक सांघिक व्यंग समजणे भाग पडावे?

या प्रश्नाची योग्य नि सशास्त्र चौकशी करण्यासाठी रशियातील मातृपद नि बाल्यावस्था यांच्या संरक्षणार्थ स्थापलेल्या संस्थेने एकटया मॉस्को नगरातील दोन हजार कामकरी कुटूंबाची म्हणजे जवळ जवळ सात हजार लोकांची पाहणी नि छाननी केली. आमच्यापुढे मुख्य प्रश्न होते ते हे; लग्ने किती अवधीपर्यंत टिकतात? जे घटस्फोट होतात त्यांची मुख्य मुख्य निमित्ते काय असतात? काय काय उद्देशाने लोक लग्ने करतात? लग्न लावण्यापूर्वी त्या स्त्रीपुरुषांचे पूर्वीचे दाट परिचय असतात काय? त्या परिचयात एकमेकांचे स्वभाव एकमेकांच्या कसोटीस किती प्रमाणात उतरलेले असतात? साधारणतः विवाहितांची वये लग्न होताना किती असतात?

या चौकशीत प्रत्यक्ष वस्तुस्थितीची नि गणिताची रुक्ष भाषासुद्धा आम्हांस हेच स्पष्टपणे सांगती झाली की, कामकरी वर्गातील बहुसंख्य लोक विवाह नि घटस्फोट यांच्या प्रकरणी गंभीरपणे नि विचारपूर्वकच वागतात.

तरी देखील अद्यापकाही उदाहरणांतून हलकट ढोंगधत्तुरा, स्त्रियांची पूर्वीप्रमाणेच हेळसांड आणि आमच्या विवाहस्वातंत्र्याच्या निर्बंधाचा घेतलेला अन्याय्य लाभ, ही व्यंगेही आढळून येतात.

साधारणतः रशियन स्त्रिया सध्या कोणत्या वयात विवाह करतात?

आमच्या पाहणी मंडळाने निरीक्षिलेल्या प्रत्यक्ष उदाहरणावरुन नि संख्येवरुन हे सिद्ध होते की, क्रांतीपूर्वी शेकडा ३० मुली सतराव्या वर्षाच्या आतच लग्न करीत. शेकडा ७० सरासरीने विसाच्या आतबाहेर. चोवीस वर्षानंतर लग्न केलेली मुलगी आढळणे दुर्मिळच असे. एकंदरीत असे नक्की विधान करता येते की, क्रांतीपूर्वी मुलींच्या लग्नाचे वय सतरा हे असे. चोविसाव्या वर्षानंतर मुलींना लग्नाचे ठिकाण मिळणेच दुर्घट होई. लग्ने इतक्या लवकर म्हणजे सतराव्या वर्षीच होण्याचे मुख्य कारण म्हणजे बहुतेक मुलींची लग्ने पूर्वी आईबापच आपल्या सोयीप्रमाणे नि आपल्या इच्छेप्रमाणे, आपल्यास आवडेल त्या स्थळी लावून देत. उशीरा स्वतः लग्न करणाऱ्या मुली दुर्मिळ असत; याचे मुख्य कारण हेच की,

मुलींना लग्नावाचून स्वतःचा योगक्षेम चालविण्याचा दुसरा मार्गच मोकळा नसे. यासाठी शक्य तितक्या लवकर त्यांची सोय आईबाप कुठेतरी लावून देण्याच्या, लग्न करुन टाकण्याच्या घाईत असत.

पण क्रांतीनंतरच्या विवाहाच्या चौकशीत ही स्थिति पालटलेली आढळली. आज सरासरी शेकडा ४८ मुली विशीच्या नंतर लग्ने करतात, शेकडा ३६ चोविसाच्या आत. वयाच्या अठ्ठावीस-एकुणतिशीपर्यंत लग्नाची अधिकांत अधिक वयोमर्यादा पडलेली आढळते. आईबापांच्या लाभालाभाच्या अनुषंगाने बळेबळे लावलेल्या-मुलींच्या लग्नांची उदाहरणे आढळत नाहीशी झाली आहेत. सोव्हिएट रशियातील मुलगी आता तिच्या इच्छेविरुद्ध अल्पवयात् कुठेतरी ढकलणे बंद पडलेले असून ती स्वतःचे लग्न स्वतःच्या विवेकाने ठरविण्याइतकी उपवर असते, हे तिच्या वाढलेल्या वयोमानावरुनही स्पष्ट होते. विवाहसंस्थेची महती महिलावर्गास पटत चालली असून त्या प्रश्नाचा स्वतः गंभीरपणे नीट विचार केल्यावाचून लहरीसरशी काहीतरी करुन टाकण्याची ती गोष्ट नव्हे, हे सोव्हिएट मुलींना चांगले कळू लागले असल्याचा तो स्पष्ट पुरावा आहे.

विवाहपूर्व परिचयः विवाह ही विचारपूर्वक करण्याचीएक महत्वाची गोष्ट आहे, ही जाणीव सोव्हिएट महिलांमध्येही दिवसेंदिवस वाढत चालली आहे, याचाच दुसरा पुरावा म्हणजे, विवाहपूर्व परिचयांची वाढ. क्रांतीपूर्वी शेकडा ५३ लग्ने वधूवरांची ओळख एक महिनादेखील झाली नाही तोच घडत असे आढळून आले. ज्या वधूवरांचा परिचय लग्नापूर्वी निदान एक वर्षभर तरी होता अशी लग्ने शेकडा २२ देखील आढळून आली नाहीत. ज्या कारणासाठी क्रांतीपूर्वी मुलींची लग्ने लाविली जात, त्या कारणांची शेकडेवारीसुद्धा वरील प्रकारची पूर्वपरिचयावाचून लागलेली लग्ने अतकी पुष्कळ का असत ते उलगडून दाखविते. आईबापांच्या संतोषासाठी किंवा श्रीमंतीच्या हौसेने निव्वळ व्यापारी सौदा म्हणूनच लागलेली लग्ने क्रांतीपूर्वी शेकडा ५३ या प्रमाणात आढळत. अर्थातच क्रांतीपूर्वी अशा लग्नांमध्ये पूर्वपरिचयाची आवश्यकताच अशा अल्पवयी वा अल्पबुद्ध वधूवरांना वाटत नव्हती, ही अगदी क्रमप्राप्तच गोष्ट होती.

पण क्रांतीनंतर पूर्वपरिचयाची आवश्यकता एकसारखी वाढत चालली. सध्याचे आकडे पाहिले तर वधूवरांचा दाट पूर्वपरिचय निदान सहा महिन्यांहून अधिक काळ झाल्यानंतर जी लग्ने झाली त्यांची संख्या शेकडा ५३ पडते, आणि एक महिन्याच्याच पूर्वपरिचयांची संख्या शेकडा २१. यद्यपि जास्त दिवस पूर्वपरिचय झाल्यानंतर लग्ने जी होऊ लागली त्याचे कारण पूर्वपरिचयाची आवश्यकता लग्न सुखावह होण्यास अवश्य आहे याची मुलींना जाणीव झाली, हेच काय ते नाही हे खरे; तथापि बहुसंख्य उदाहरणांमध्ये लग्नापूर्वीच पूर्वपरिचय जितका दाट होईल तितके परस्परांचे स्वभाव, व्यंगे, आकांक्षा निध्येये ही अन्योन्यांना कळून आल्यामुळे मग स्वेच्छेने झालेल्या त्यांच्या विवाहात फसगत होण्याचा संभव कमी कमी होत जातो हे पटल्यामुळेच पूर्वपरिचय पुष्कळ दिवस चालविला नि मग विचारपूर्वक पटले म्हणूनच लग्न केले असे आढळून आले. तरीदेखील अद्याप एकपंचमांश लग्ने एका महिन्याच्या घाईघाईच्या परिचयानंतर लगोलग घडत आहेत ही गोष्ट चिंताजनक आहे. अशामुळेच लग्नानंतर लवकरच वधूवरांत असंतोष माजून काडीमोड करण्याचे प्रसंग येतात.

आता घटस्फोटाकडे वळू: बहुतेक सोव्हिएट दांपत्यांचे संसार टिकून राहतात, घटस्फोट होत नाहीत. ज्यांचे घटस्फोट होतात त्यांची कारणे बहुधा अशी असतातः स्वभावविरोध हे घटस्फोटाचे मुख्य कारण दिसते. जास्त संख्या याच कारणाची. शारीरिक कारणेही घटस्फोट घडवून आणतात. मनुष्याच्या स्वभावाची कितीही परीक्षा केली तरी काही कालाने अपूर्व संकटात, परिस्थितिभेदात, मनस्तापात किंवा अपूर्व आमिषाने पूर्व स्वभावात अचानक नि अनपेक्षित पालट होतो हे मानवी मनाच्या रचनेचे मोठें व्यंग आहे. ह्या नैसर्गिक परिवर्तनशीलतेला उपाय नाही. अगदी लहानपणापासून ज्यांचा पूर्वपरिचय, ज्यांची परस्पर अखंड प्रीति, अनेक वर्षाच्या सहवासानंतर ज्यांनी विवाह विचारपूर्वक केला, त्यांच्याही स्वभावात परिस्थिति बदलताच काही शारीरिक वा मानसिक व्यंगें अकस्मात प्रादूर्भवून इतका तीव्र विरोध येतो की, त्यांचे एकत्र राहणे म्हणजे दोघांचेही जीवन मातीस मिळविणे होते. अशी उदाहरणेही आमच्या चौकशीत आढळली. अशा प्रकरणीच घटस्फोटस्वातंत्र्य जे सोव्हिएट क्रांतीने स्त्रीपुरुषांना पूर्णपणे दिलेले आहे त्याविषयीचे आमचे सोव्हिएट निर्बंध (कायदे) किती उपयुक्त नि न्याय्य आहेत ते पडताळून पाहता येते. अशा अपरिहार्य स्वभावचंचलतेमुळे वा कोणाच्याही चुकीमुळे जे विवाह अत्यंत दुःखदायक, द्वेषपूर्ण नि राष्ट्रीय अहिताचे ठरतील त्यांना दिखाऊ एकीत डांबून ठेवून त्या दोन्ही जीवांना बळेबळे दुःखात पिचत ठेवणे, गुप्तरूपाने विवाहबंधन हवे इतके वेळा अन्योन्यांचा विश्वासघात करुन अन्योन्य तोडीत असताही त्या दांपत्यास तसे ते विवाहबंधन प्रामाणिकपणे आणि प्रकट रीतीने मात्र तोडू न देणे, घटस्फोट करू न देणे, कपटालाच उत्तेजन दिल्यासारखे होते. ह्यालाच लेनिन 'हलकट' ढोंग म्हणे! प्रत्येक मनुष्यास प्रामाणिकपणे आपले जीवन सुधारण्याची संधि दिली पाहिजे. कौटुंबिक आततायीपणा, कलह, हत्या, नि असह्य दुःख टाळणारा सोव्हिएटचा घटस्फोटस्वातंत्र्याचा निर्बंध हा अशाच प्रसंगी मनुष्यास एखाद्या वरदानासारखा उपयोगी पडतो, जीवनाचा पुनरुद्धार करतो.

घटस्फोटांच्या कारणात आणखी एक कारण विशेषतः उल्लेखनीय आहे. तो 'जुन्या' नीतिकल्पनांचा एक दुष्ट अवशेष अद्याप टिकून राहिलेला आहे. ते कारण म्हणजे, पुरुषवर्गातील काही काही माणसांनी केलेला पत्नीवरील ठराविक आक्षेपः 'मला वाटले, लग्नाच्या वेळी तिचे कौमार्य अखंडित होते; पण लग्नानंतर मला समजून आले की, माझी वधू अखंडकौमार्य नव्हती! म्हणून मी घटस्फोट करणार!' हे पुरुषी गाऱ्हाण्याचे उदाहरण झाले. स्त्रीने तेवढें लग्न होईतो अखंडितकौमार्य असले पाहिजे, पुरुषाने कसेही असले तरी हरकत नाही, ही जुनाट नीतिमत्ता पक्षपाती नि टाकाऊ आहे. घटस्फोटाचे दुसरे ठराविक कारण म्हणजे मद्यपान. स्त्रिया नि पुरुष दोघेही केव्हा केव्हा या व्यसनापायी संसार चालविण्यास सर्वथैव अयोग्य होतात. स्त्रियांना मारहाण करण्याची पाशवी प्रवृत्तिही पुरुषांतून अजून थोडयाफार प्रमाणात सापडते. अशा उदाहरणात स्त्री जेव्हा जेव्हा घटस्फोट मागावयास येते, तेव्हा तेव्हा घटस्फोट स्वातंत्र्यामुळे सोव्हिएटमधल्या स्त्रिया दिवसेंदिवस धीट, स्वावलंबी, आणि प्रेमादरावाचून धंदेवाइकपणे कोणाही परपुरुषाशी संबंध न ठेवणाऱ्या होत चालल्या आहेत, ही समाधानकारक गोष्टच प्रत्ययास येते.

तो थोर लेनिन म्हणाला होता की,'स्त्रीपुरुषांच्या वैवाहिक जीवनात जी क्रांति आम्ही घडवून आणली आहे ती आम्हांस अत्यंत अभिमानास्पद आहेच आहे. घटस्फोटस्वातंत्र्याचा, संभोगस्वातंत्र्याचा,

स्त्रीपुरुषसमतेचा नि अपत्य संगोपन बंधनाचा, असे या प्रकरणी जे जे निर्बंध सोव्हिएटने केले ते असामान्य नि अद्भुत होते यात शंका नाही. पण अशा असामान्य नि अलौलिक निर्बंधांची बजावणीही तशीच असामान्य सक्तीने नि दक्षतने झाली पाहिजे तर खरे! घटस्फोट-स्वातंत्र्याने विवाहसंस्था उच्छेदिली गेली नाही, तर ती पूर्वीच्या अनुमानधपक्याच्या पायापेक्षाही बळकट अशा सुबद्ध, सुसंस्कृत नि सुस्थिर पायावर पुनरुद्धारिली गेली आहे, हेच आमच्या चौकशीत उघड झाले. तर देखील अजूनही खालील प्रकरणी आमच्या वैवाहिक निर्बंधांची बजावणी अधिक कसोशीने करणे अवश्य आहे.

पहिली गोष्ट अशी की, एकच जण जेव्हा घटस्फोट मागावयास येतो, त्यास घटस्फोटाची अनुज्ञा मिळण्याच्या आधीच दुसऱ्या पक्षास समक्ष बोलावून घटस्फोटाची कारणे सांगणे अधिक युक्त होईल. आजच्यासारखी घटस्फोट झाल्याची सरकारी सूचना नुसती धाडणे पुरेसे नाही. विशेषतः पुरुष एकपक्षी घटस्फोट मागण्यास आला तर स्त्रीला समक्ष बोलावून ती गर्भार आहे की काय, असल्यास तिच्या जोपासनेचा नि अपत्यसंगोपनाचा बोजा दोन्ही पक्षांवर समतेने टाकण्याची कडक व्यवस्था आधी ठरवून मगच घटस्फोट करु देणे बरे. दुसरी अगदी निकडीची गोष्ट म्हणजे प्रचार! अद्याप पुष्कळ तरुणतरुणींना आमच्या वैवाहिक निर्बंधांचे ज्ञान मुळीच नसते. ते अजाणपणाने लग्ने लावतात आणि त्यामुळे या लेखात प्रथमारंभी दिलेल्या अलेक्झेव्हिचच्या उदाहरणाप्रमाणे अपत्यसंगोपनाचा बोजा त्यांच्यावर कसा पडणारा असतो याविषयी त्यांना असावी तशी सुस्पष्ट जाणीव नसते; यास्तव लग्न नोंदतानाच वधूवरांनी आपली पूर्वी नोंदविलेली वा बिननोंदीची किती लग्ने झाली होती नि अपत्ये किती याची बिनचूक माहिती सरकारास दिली पाहिजे आणि ती नि इतर माहिती देण्यात जर कोण्या स्त्री-पुरुषाने कपटी लपवालपवी केल्याचे उघडकीस आले, तर त्यांना कडक शिक्षा झाली पाहिजे. सोव्हिएटसारख्या समाजसत्तावादी राज्यात प्रत्येक स्त्री-पुरुषाला विवाहनिर्बंधाची नि अपत्यसंगोपनाच्या दायित्वाची (जबाबदाराची) पूर्ण माहिती असणे आणि स्त्रियांना नि मुलांना कोणत्याही प्रकारे वाईट रीतीने वागविण्याची सक्त बंदी असणे हे अगदी अवश्य आहे. अपत्यसंगोपनाच्या कर्तव्यात यत्किंचित् ढिलाईसुद्धा अक्षम्य आहे.'

विवाहविषयक निरीक्षण-मंडळाच्या ह्या चौकशीवरील प्रतिवृत्तामध्ये प्रतिपादिलेली मते चर्चिण्याचा या लेखाचा उद्देश नसल्यामुळे रशियन लोकांच्या स्वतःच्याच आत्मनिरीक्षणात, त्यांच्या क्रांतिकारक वैवाहिक स्थित्यंतराविषयी त्यांना काय वाटते, त्या अर्थी प्रयोगाचे परिणाम त्यांना किती परवडतात, त्याची ताजी नि अधिकृत माहिती इकडील वाचकांना कळावी, एवढ्याचसाठी ते प्रतिवृत्त संक्षेपतः वर अनुवादिलेले आहे. त्यात दिलेल्या घटना नि गणना (फॅक्टस् ॲण्ड फिगर्स) आपला जो काय मथितार्थ व्यक्तवावयाचा तो स्वयमेव व्यक्तवीत आहेतच.

-(स्त्री मासिक,फेब्रुवारी १९३६)

****

ललनांच्या लावण्याचे हानिलाभ

पर्यायपीतस्य सुरैहिमांशोः!
कलाक्षयः श्लाघ्यतरो ही वृद्धे.!!
- कालिदास

युरोपच्या एका नामांकित व्यक्तीने लिहिलेला 'डेबिटस् अॅण्ड क्रेडिटस् ऑफ ब्यूटी' हा आमच्या महिला वाचकांच्या वाचनात येण्याजोगा एक लेख अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे.

युरोपमध्ये सध्या सौंदर्याची जिकडेतिकडे पूजा होत आहे. पण पूर्वी एकदा याच युरोपमध्ये रोमन कॅथॉलिक पंथाचे वर्चस्व चालू असता लावण्य हा ललनांच्या अंगचा, पुरुषांनी ज्यापासून अत्यंत सावध राहावे असा एक घातक दोष समजला जाई. त्या काळच्या युरोपीय धार्मिक वाङमयात या घातक लावण्याची यथेच्छ निर्भर्त्सना केलेली आढळते. ख्रिश्चन धर्मात जीजसच्या खालोखाल ज्यांचे शब्द धर्माज्ञेसमान पवित्र मानले जातात, त्या सेन्ट पॉल, सेन्ट पीटर प्रभृति आद्य महंतांच्या प्रत्यक्ष बायबलमध्येच ग्रंथिलेल्या उपदेशातून स्त्रीस्वातंत्र्याची, स्त्रीमोहाची आणि एकंदर स्त्रीत्वाचीच कशी विटंबना केलेली आहे हे बायबल मधील खालील दोन उताऱ्यांवरुनदेखील दिसून येईल.

'स्त्रियांनी चर्चमध्ये मौन धारण केले पाहिजे! कारण तिथे बोलण्याची त्यांना आज्ञा नाही! अज्ञान हाच त्यांचा मूळचा स्वभावधर्म, त्यातही जे शिकणे ते घरच्या घरी - आपल्या पतीकडूनच शिकले पाहिजे. कारण चर्चमध्ये बोलणे स्त्रियांना लज्जास्पद आहे. (connthians XIV, 34)'

'पत्नींनो, आपल्या पतीलाच तुमच्या सर्वस्वाचा स्वामी माना! ख्राइस्ट जसा जगाचा प्रमुख धनी आहे, तसाच पति हाच पत्नीचा नेता आहे; स्वामी आहे ... आदमनंतर ईव्ह उपजली. (पुरुष वडील; स्त्री मूळचीच धाकटी) त्यातही आदम (पहिला पुरुष) हा न फसता ईव्हच (पहिली स्त्रीच) पहिल्याने फसली. अर्थात् स्त्रीच खरी अपराधिनी होय. (टिमोथी-ए-१४).'

स्त्रीला स्वतःच्या लावण्याची पहिली जाणीव
आणि तिचे पहिले पतन!

ख्रिस्ती आणि मुसलमानानी धर्मपुस्तकांमध्ये मूळ यहुदी लोकांच्या धर्मग्रंथांत सांगितलेली जगदुत्पत्तीची कथाच ईश्वरोक्त सत्य म्हणून मानलेली आहे. थोडासा फेरफार असला तरी त्याच कथेतील पुरुष नि स्त्री यांची प्रथम उत्पत्ति कशी झाली ते वृत्तही त्या तिन्ही धर्मग्रंथांतून असे सांगितले आहे, की देवाने आदम हा पहिला पुरुष निर्मिला आणि मग त्याची एक बरगडी काढून तिच्यावर मांसमज्जा मढवून पहिली स्त्री 'ईव्ह' ही निर्मिली. त्याकारणे त्या तिन्ही धर्माच्या अनुयायांच्या मते स्त्री ही मूळचीच पुरुषाचे धन नि मत्ता असून पुरूष हाच तिचा स्वामी होय. यानंतरची माहिती त्यांच्यातील कित्येक पंथांची पुराणे अशी सांगतात, की ती पहिली स्त्री ईव्ह ही जरी अत्यंत सुंदर होती, तथापि तिला तिच्या निष्पाप स्थितीत तिच्या लावण्याची जाणीव नसे. तिचे रूप तिला स्वतःला काही स्वतःच्या डोळयांनी समग्र दिसत नसे.

'परांचि खानि व्यसृजत् स्वयंभूः!' आपले चक्षुरिंद्रिय दुसऱ्यांस पाहाते - स्वतःस नव्हे! पण एक दिवस काय झाले, की ईव्ह स्वर्गीय उद्यानात विहरत असता एका स्वच्छ सरोवराच्या काठी बसून त्यात लीलया डोकावती झाली. पाहते तों आत एक कधीही न पाहिलेली अत्यंत मनोहर मूर्ति विलसत आहे! त्या मूर्तीच्या लावण्याने ईव्ह मोहित झाली. तेव्हा तिच्या ध्यान्यात आले, की ती मूर्ति ही तिचेच प्रतिबिंब असून तीच मुळी स्वरुपाने तशी नयनमनोहर आहे! स्त्रीला स्वतःच्या लावण्याची हीच पहिली जाणीव आणि तिला तशी जाणीव करुन देणारा स्वच्छ जलाशय हाच पहिला आरसा!

त्या पाण्याच्या आरशात आपले लावण्य असे मोहक आहे ही जाणीव पहिल्या स्त्रीला जेव्हा पहिल्याने झाली तेव्हा तिचा तिला अभिमान वाटू लागला. लावण्याच्या जाणिवेसरशी ती मानिनी झाली. इतक्यात तो लबाड साप! त्याने तिची स्तुति करण्याची संधि साधून ती त्या स्तुतीने वाहवत चालली आहेसे पाहताच तिला ते निषिद्ध ज्ञानफळ खावयाची भर दिली. 'देवाने तुला अज्ञानी ठेवण्याच्या कपटहेतूनंच ह्या ज्ञानवृक्षाचे फळ खाऊ नको म्हणून सांगितलं आहे. तेव्हा हे चतूरे, तू ते अवश्य खा, की तुलासुद्धा सगळं बरंवाईट कळू लागून तुम्ही माणसं देवच व्हाल!' पाणी हा जसा पहिला आरसा - तसाच साप हा स्त्रीचा पहिला पंतोजी! 'देवाच्या सांगण्यापेक्षा सापाची शिकवण तिला पटकन पटते! पाहिलेंत!' ही कथा सांगणारे ख्रिश्चन पुराणिक तिच्यावर आपले भाष्यही लगोलग करीत असत! पुढे ईव्हच्या नादी लागून आदमही त्या कटात शिरला आणि त्या दोघांनी मिळून ते ज्ञानफळ गट्ट केले! त्यासरशी ते दोघे पहिले स्त्री-पुरुषच नव्हे; तर यच्चावत् स्त्रीजात नि पुरुषजात वंशपरंपरा पतित झाली! देवाने शाप देऊन त्यांना स्वर्गीय उद्यानातून हुसकले. स्त्रीला सांगितले,'तुला शिक्षा हीच, की तुला गर्भदुःख, प्रसववेदना सळो का पळो करुन सोडतील' आणि पुरुषास सांगितले, की तुझे जीवन कष्टप्रद होईल!' ख्रिश्चन धर्मोपदेशक ह्या स्त्रीच्या आद्य अपराधावरुन असे सिद्ध करतात, की 'पुरुषाच्या पतनाचे कारण स्त्री! ती जगातील पहिली अपराधिनी - पहिली पापी! संभाळून असा अं तिला, तिच्या त्या लावण्याच्या मोहाला!

पण स्त्रीच्या त्या लावण्याच्या मोहाला पहिला पुरुष असा भाळला नि बळी पडला, तसे पुढे कोणी भाळू नये म्हणून स्त्रीला नित्याची दासी करुन ठेवण्याचा कितीही कडक उपदेश ख्रिश्चन धर्माने जरी शतकोशतके युरोपला केला, तरी शेवटी स्त्रीने त्याचा सूड उगवावयाचा तो उगवून त्या एकांगी उपदेशाची प्रतिक्रिया म्हणूनच की काय, आजचा पुरुषी युरोप स्त्रीच्या लावण्याचाच दास करुन सोडला आहे! लावण्य हे लांछन होय, असा घोष चर्चाचर्चांमधून रोमन कॅथॉलिक ख्रिश्चन धर्म ज्या युरोपमध्ये मध्ययुगात एकसारखा दुमदुमवीत राहिला होता, तोच युरोप आज ललनांच्या लावण्याचा निःसीम उपासक बनला आहे! वैयक्तिक अपवाद वजा जाता वरील दोन्ही विधाने सामुदायिक अर्थी वस्तुस्थितीस धरुन आहेत. कित्येक सुंदर स्त्रियांच्या दातांचे, केसांचे, वर्णाचे विमे कित्येक मुख्य प्रधानांच्या जीवनांच्या विम्यांहूनही अधिक रकमेचे काढले जात आहेत! कित्येक लावण्यवती नटींचा पगार कित्येक मुख्य बिशपांच्या पगाराहून अधिक असतो! युरोप-अमेरिकेतील मोठमोठया राजधान्यांतून सौंदर्याची स्पर्धा होते आणि त्या स्पर्धेत जी रमणी सर्व स्पर्धातून अत्यंत लावण्याची ठरेल, तिच्या छायाचित्रांच्या प्रती पोपच्या

छायाचित्रांच्या प्रतीपैंक्षा लाखालाखांनी अधिक खपतात; प्रासादापासून पर्णकुटिकेपर्यंत भिंतीभिंतींवर सुरेख चौकटीतून विलसत असतात.

ललनांच्या लावण्याला लांछन समजण्याच्या धर्मवेडया अतिरेकाच्या टोकापर्यंत पोचलेला युरोपचा नीतिलंबक लावण्याचा दास होऊन पडणाऱ्या लंपटतेच्या उलट अतिरेकेला जाऊन पोचला! अशा स्थितीत त्या दोन्ही अतिरेकांतील आंशिक सत्य डोळयांआड न करता ललनांच्या लावण्याचे मूल्यमापन, ह्याचे हानिलाभ समतोलपणे जोखून ठरविण्याचा यत्न युरोपातील एका अनुभवी व्यक्तीने केला हे चांगले झाले. ह्या दृष्टीने आम्ही आरंभी उल्लेखिलेला उर्सूला ब्लूक ह्यांचा ‘डेबिटस् ॲण्ड क्रेडिटस् ऑफ ब्यूटी’ हा लेख आमच्या महिलावाचकांना त्यांच्या जिव्हाळयाच्या एका प्रश्नाची बरीच विचारार्ह छाननी करणारा वाटल्यावाचून राहणार नाही. त्यातील काही उतारे खाली देत आहो. आणि मग त्याविषयी आम्हांला काय म्हणावयाचे ते सांगू.

Ursula Blook यांच्या लेखातील महत्वाचा भाग

‘ललनांच्या लावण्यापासून होणारे लाभ थोडक्यात असे सांगता येतील -

चटकन स्नेह जुळविण्यास सौंदर्य उपयोगी पडते. कारण, पाहणारांचे मन सुंदरपणावर पहाताक्षणीच लोलुपते. साध्या स्त्रीची ओळख करुन घेण्यापेक्षा सुंदर स्त्रीच्या ओळखीकडे लोकांच्या मनाचा ओढा अधिक; त्यातही पुरुषांचा विशेषच.

तिच्याविषयी पुरुषांना सहानुभूतिही अधिक वाटते; तिचे मन मोडणे अधिक जड जाते. कारण तिच्या लावण्याने त्यांच्या भावनांना मोह पडतो.

मूळचेच रूप सुंदर असले म्हणजे स्त्रीला आपल्यापरीने आपली अधिकात अधिक छाप पाडण्यास उत्तेजन मिळते, सुलभ जाते. आपण शक्य तितके आकर्षक व्हावे; निसर्गाने दिलेले सौंदर्याचे उदार आभुषण अधिकच खुलून दिसावे आणि त्याचा शक्यतों उपयोग स्वतःला करुन घेता यावा ह्यासाठी रूपवती स्त्रियांचा प्रयत्न सारखा चालू असतो.

लावण्यावर लुब्ध झालेल्या प्रियकरांची संख्या नेहमी अधिकच असणार. त्यामुळे साधारण स्त्रियांना वरांची निवड करणे जसे जड जाते, तसे सुंदर स्त्रीला जाण्याचे कारण नसते. माता नि पत्नी ह्या दोन्ही नात्यांची कर्तव्ये पुरी करण्यातच स्त्रीजीवनाचे जे खरे साफल्य असते, तेही रुपवती महिलेला सहजसाध्य होते. रमणीय वधूला वर मिळणे सुलभतर असते, इतकेच नव्हे, तर उलट वरांमध्ये आपल्याला रुचेल तोच वर निवडण्याची संधिसुद्धा तिला केव्हाही दुष्प्राप्य नसते. कारण वधू याचना करणारे अनेक पुरूष तिच्या लावण्याने तिच्याचकडे आकर्षिले जात असल्यामुळे तिचे स्वयंवरक्षेत्र अधिक विस्तृत नि विविध असते. ज्यांना मागणी घालणारे मुळातच थोडे, त्या साध्योसिध्या स्त्रियांपेक्षा सुंदर स्त्रियांना आपल्या अनेक इच्छुकांतून मनाजोगी निवड करण्यास कितीतरी वाव सापडतो.

या सर्व लाभांवरुन ज्या स्त्रियांना सुंदर रूपाची देणगी मुळातच लाभलेली आहे त्यांचे जीवन अधिक सुखमय नि अधिक सफल होत असावे असे कोणासही सहजच वाटेल!

पण मला त्याची शंका वाटते!

कारण लावण्यापासून जरी हे इतके महत्वाचे लाभ होत असले तरी त्याच्यापासून होणारे तोटेही काही थोडे नाहीत!

पहिला तोटा असा, की सुंदर स्त्रीला पुष्कळ लोक जरी भाळतात, तरी ते नेहमी चांगलेच असतात असे नाही. बहुधा वाईट तेच तिच्याभोवती जमा होतात. पुन्हा दुसरे असे की, अनेक चांगलेवाईट लोक तिच्यापुढे धूप जाळीत राहिल्याने तीही उगीच फुगून जाते; ती भानावर रहात नाही; ती छचोर होते; लहाडी बनते; गर्वाने बिघडते. विवेक न सोडता संभाळून वागणे तिला फार कठीण जाते.

आपल्याला काय कमी; हवे तितके लोक आपल्याला वरण्यासाठी लोलुपलेले हवे तेथे सापडतील, अशा घमेंडीपायी ती ज्याला त्याला झिडकारीत जाताजाता शेवटी ‘अति शहाणा त्याचा बैल रिकामा,’ अशी तिची फसगतही होण्याचा संभव असतो. हे नको, ते नको, असे करताकरता शेवटी हाताशी काहीच राहत नाही किंवा जे टाकाऊ तेच स्वीकारणे भाग पडते.

याच कारणाने आणि अशाच चोखंदळ चुकीमुळे जगातील काही नामांकित लावण्यवतींना शेवटी सुखाचा संसार थाटता आला नाही, मनासारखे दांपत्यसुख मिळाले नाही. स्वतःची भरमसाट आकांक्षा नि स्वतःचे फुगीर मूल्यमापन या आपल्याच दोषांमुळे कित्येक सुंदरचे विवाह श्रीमंतीचे झाले, पण सुखाचे झाले नाहीत!

आज तरी अशीच स्थिती आहे! कारण आजकाल पुरुषांचा ओढा तारुण्याकडे फार! नुसती दिसायलाच नव्हे, तर वयानेदेखील जी खरोखरीच तरुण आहे तिलाच आज जो तो इच्छितो.

त्यांतही लोकांमध्ये अशी एक घातक समजूत बळावलेली आहे, की कांति नि बुद्धि ही जुळीं भावंडे नसतात. सुंदर मनुष्य बहुधा शहाणे नसते. ‘देखनेमे ढबू और चलनेमे शिवराई’ असाच प्रकार फार. ज्या व्यवसायात बुद्धीलाच मागणी अधिक, त्यात अर्थातच सौंदर्य फिके पडते; त्याचा भाव उतरतो. साधारण नोकरीतही नुसत्या देखण्या स्त्रियांना त्यांच्या देखणेपणाचे फारसे साहाय्य न होता उलट कित्येकदा तो एक अडथळाच होऊन बसतो.

रमणीच्या मागे तिच्याच स्त्रीजातीचा मत्सर सारखा हात धुऊन लागलेला असतो; हे तर फार त्रासदायक असते. विवाहित स्त्रिया अशा सुंदरीकडे नेहमीच शंकेखोर दृष्टीने पाहतात. सुंदर मुलीविषयी लोक अशा सहजासहजी कंडया पिकवतात, तसा त्रास साध्यासिध्या मुलींना कोणी फारसा देत नाहीत; पण सुंदर तरुणीवर ज्याचा त्याचा डोळा.

सुंदर स्त्रीलाही इतर लोकांची योग्य परीक्षा करणारा विवेक फारसा राहत नाही. बहुधा तिच्या स्वतःपेक्षा तिच्या लावण्यावर लोकांची दृष्टि खिळलेली असते. तिच्यापेक्षा तिचे सुंदर मुख त्यांना आवडलेले असते. तिचे खरे स्नेही कोण, कोणाचे प्रेम प्रामाणिक, ते ओळखणे कठीण जाऊन माणसाची परीक्षा करण्यात तिची अनेकदा फसगत होते. केवळ मी चांगली दिसते म्हणून काय ते हे माझ्याशी लाडीगोडी लावतात असे ज्यांच्याविषयी तिला वाटते, तेच मात्र क्वचित् तिच्यावर खरेखरे प्रेम करणारे असतात, आणि ज्यांना ती खरेखरे मित्र म्हणून शपथपूर्वक मानते, तेच अंती अप्रामाणिक ठरतात. वारंवार अशा फसगतीने शेवटी ती सर्वांनाच संशयास्पद मानू लागते; तिला कोणीच खरा वाटेनासा होतो.

त्यातही सौंदर्याला सारखी झीज लागलेली असते! ती भरुन काढण्यासाठी सारखी खटपट करावी लागते. रमणीला ती आपली पदवी राखण्यासाठी आपल्या परीने शक्य तितके सर्वांगसुंदर दिसावेच लागणार! लोक कुजबुजू लागले की काय की'ही उतरलेली दिसते नाही का?' अशी तिला सारखी शंका येत राहते. आपल्या लावण्याची ख्याति फिकी पडू नये यासाठी प्रयत्न करताना सुंदर स्त्रीला पराकाष्ठेचा ताण सोसावा लागतो.

आणि सौंदर्यांचे सर्वात असह्य व्यंग म्हणजे वार्धक्य!

जिचे रूप मनोहर; जिच्या पायाशी तिच्या त्या लावण्याने मोहित होऊन सारे जग लंपटलेले आहे अशी रमणी अशा एका उंच पदावर चढलेली असते, की त्यावरुन उतरणे अगदी दुर्घटच व्हावे. प्रभुत्वाची रुचि चाखलेली असावी, प्रभुत्व गाजविलेले असावे आणि नंतर ते प्रभुत्व आपल्या हातून दिवसानुदिवस निसटून जाऊं लागावे, हे कोणासही असह्यच वाटणार! जो मोहक हावभाव नि खेळकर हंसणे रुसणे सुंदरीच्या तारुण्यांत इतके आकर्षक भासते, तेच त्या स्त्रीच्या वयोमानाने पुढे एकाएकी पाचकळ नि तिरस्कारार्ह ठरु लागलेले पाहून त्या सौंदर्य सुकत जाणाऱ्या वार्धक्योन्मुख स्त्रीच्या मनास धक्का बसल्यावाचून कसा राहील? लावण्यवती स्त्रींचे खरे कौशल्य वृद्धपणी वार्धक्याला शोभून जाण्यातच आहे!

सुंदर ललनांच्या या दुर्गतीची कीव करण्याचे सोडून लोक उलट तो चेष्टेचाच विषय समजतात. वृद्धपणी सगळे जवळजवळ सारखेच दिसतात. उभ्या आयुष्याच्या सवयी बदलणे आणि ज्या वार्धक्यांत, प्रभुत्व गाजविण्याचे साधन जे लावण्य त्यालाच अंतरावे लागते त्या म्हातारपणात दिवस काढणे हे कोणत्याही स्त्रीला दुःसह, दुर्घटच असणार.

लावण्याचे हे हानिलाभ मोजून जमेची नि व्ययाची वजावट करता लाभापेक्षा हानिच अधिक भरल्यामुळे आणि म्हणूनच आयव्ययाची तोंडमिळवणी करणे देखील अशक्य झाल्यामुळे मला असेच सांगणे भाग आहे की, की एकंदरीत लावण्य हे ललनांस सुखप्रद होत नाही; सौंदर्याच्या पदरी शेवटी निराशेचा फोल हंगामच बहुधा पडतो.

सौंदर्याच्या ठेवीवर आधी म्हणण्यासारखे व्याजच मिळत नाही. जे मिळते त्यावर भारी कर द्यावा लागतो; ज्या पेढीवर ती ठेव ठेवलेली असते, ती पेढीच मुळी केव्हा बुडेल याचाही नेम नसतो. अगदी बिनधोक नि सुरक्षित अशा कोणत्याही रोख्यांत हे सौदर्यधन गुंतविता येत नाही! साधे रूप तेच एकंदरीत स्त्रीला सौदर्यापेक्षा अधिक हिताचे नि कमी धोक्याचे आहे!'

लावण्य हे जितके लोभनीय तितकेच हितकारकही आहे!

वर उतारलेल्या उर्सूला ब्लूक यांच्या लेखात लावण्यापासून हानिलाभ हे पुष्कळ विचारपूर्वक नि समतोलपणे सांगण्याचा यत्न केलेला आहे खरा; परंतु त्या विचारांची मांडणी सुसंगत नाही आणि त्या हानिलाभाची तुलना करुन काढलेले तात्पर्य तर अगदीच एकांगी आहे. आयव्ययातील रकमा टिपतानाच मुळी भलत्याच्या नावे रकमा पडल्या! कारण सौदर्यापासून होणारे म्हणून जे तोटे दिले आहेत ते वस्तुतः सौदर्यापासून होत नसून त्याच्या दुरुपयोगाने किंवा सदुपयोग न केल्याने जे होतात ते आहेत.

सौंदर्यापासून होणार जे तोटे वर दिलेले आहेत, त्यांपैकी अनेक ‘दृष्टीपासूनही होतात’ असे दाखविता येईल. चांगले दिसते म्हणून अनेक प्रसंगी पाहू नये ते उद्वेजक पाहवे लागते. आपल्या प्रियकराला अपघातात रक्तबंबाळ झालेला पाहून किंवा कुपुत्राला दारूपायी दारोदार भीक मागताना पाहून किंवा पेशवाईच्या शेवटच्या दिवशी त्या मानधन श्रीमंतांच्या शनवारच्या वाडयावरील हिंदुपदपादशाहीचा जरिपटका खाली पाडून त्यावर अंग्रजांचा जॅक सरसर वर चढताना पाहून - दुखावलेले मनुष्यमात्र वैतागाने असेच म्हणून जाते, की ‘अरेरे! ही दुर्दशा पाहवी लागण्यापेक्षा देवाने डोळेच दिले नसते तर किती बरं झालं असतं!’ तशा वैतागाने ‘लावण्यच’ नसते तर माझी अशी दुर्दशा का होती असे एखादी हेलन किंवा क्लिओपात्रा किंवा पद्यिनी दुःखावेशात उद्गारली, तरी त्यामुळे लावण्य स्वयमेवच टाकाऊ ठरत नाही; घातकही ठरत नाही. दृष्टीने कधी-कधी दुर्दशा पाहावी लागते, म्हणून दृष्टि हीच घातक आणि एकंदरीत दोन्ही डोळयांनी अंधळे असणे किंवा निदान अंधूक दिसणे हेच चांगले असे का म्हणावयाचे?

लावण्य वयोमानाने झिजते तशी दृष्टी मंदावते; बुद्धिही झिजते. लावण्यवतींची म्हातारपणी केविलवाणी स्थिति होते; तशी बुद्धिवानांची आणि डोळसांचीही होते. वृद्धपणी डोळे अंधळे नि बुद्धि निकम्मी होत चालली असताही मनुष्यास असह्य खेद वाटतो. लावण्याच्या पायी अनेक उन्माद घडतात. तसेच उन्मार्गगामी बुद्धीकडून घडतात, दृष्टीकडूनही घडतात. म्हणून निर्बुद्ध मनुष्य किंवा जन्मांध मनुष्यच खरा सुखी असे काही त्याचे तात्पर्य काढता येणार नाही!

मनुष्याला आपल्या बुद्धीच्या बळाने आजवर अनेक सोयिस्कर शोध लावता आले; जे मनुष्याला जन्मतः मिळालेले नाहीत असे अनेक लाभ संपादिता आले. मोटारी-आगगाडयांच्या साधनांन त्याने आपली गति शतपटीने वाढविली; नावा, आगनावा काढून समुद्र उल्लंघिले; विमानांनी पंखांची उणीव भरुन काढली; अनेक रोगांचा औषधांनी नि शल्यांनी त्याने पाडाव केला; पण अजूनही जन्माने जे मिळाले नाही ते लावण्य संपादिण्याइतकी, आपले मूळचे साधे वा ओंगळ रुप बदलून ते सुंदर नि सुरेख करण्याची युक्ति शोधण्याइतकी त्याच्या विज्ञानाची प्रगति झालेली नाही; सन्निद्धच्या भविष्यकाळातही कुरूपाला सुस्वरुप करण्याची तर दूरच, पण काळयांना गोरे करण्याची युक्तिसुद्धा मनुष्याला सापडेलच अशी हमी आज देत येत नाही; मनुष्याला अशा प्रकारे यत्नाने जे संपादता येत नाही, पण जे अत्यंत, लोभनीय वाटते, ते दुःसाध्य स्वरूपसौंदर्य ज्याला जन्मतःच लाभलेले आहे त्या पुरूषाने वा स्त्रीने ती एक दैवाची स्पृहणीय देणगीच मिळाली आहे असे समजणे आणि त्या मानाने त्या त्या प्रकरणी स्वतःस भाग्यशाली मानणे हे अगदी साहजिक नि उचित आहे. या राष्ट्रातील पुरूष ‘दिर्घोरस्को वृषस्कंधः शालप्रांशुर्महाभुजः’ अशा पौरूषी सौंदर्याने आणि स्त्रीला जिला पाहताच विरक्त तपस्व्यांनीही ‘त्वमस्य विश्वस्य च नेत्रकौमुदी! असे संबोधावे; अशा लोभनीय लावण्याने विलसत आहे; त्या राष्ट्राने त्या आपल्या रूपसंपदेस एखाद्या स्वर्गीय वरदानासारखे जपले पाहिजे; सृष्टीच्या त्या विशेष उपकृतीस्तव तिचे आभारीच असले पाहिजे.

त्यातही ललनेचे लावण्य हा तर सृष्टीच्या कलाकुसरीचा अत्यंत कमनीय असा कांचनी कळसच आहे! चित्रलेखा एकाहून एक सुंदर पुरुषांची चित्रे रेखीत-रेखीत जेव्हा प्रद्युम्नाचे चित्र रेखिती झाली, तेव्हा उषा जशी अत्युत्कट समाधानाने उठून वदली, ‘थांब सखे, ठेव खाली ती कुंचली! माझ्या स्वप्नातील मनोहर

आकृति ती हीच! ' तसेच एकाहून एक सुंदर आकृति कल्पीत, चितारीत ती मनाजोगी न झाल्याने भूगर्भीय (Geological) रद्दीच्या टोपलीत टाकीत सृष्टिदेवी आपल्या कलागृहात (Studio) युगेयुगे चितारीत बसली असता जेव्हा तिच्या कुशल कुंचलीतून अंती लावण्यवती ललनेचे चित्र उतरले, तेव्हा ती सृष्टि, ती आद्य नि अमर चित्रलेखा, ती आपलीच अपूर्व कलाकृति पाहून आपणच विस्मय पावली नि आपल्याशीच कलानंदात तन्मय होऊन म्हणाली, 'अहाहा! हीच ती माझ्या सौंदर्याच्या स्वप्नातील मनोहर कलाकृति! माझं आदर्श चित्र!' कवितादेखील ललनेच्या त्या मनोज्ञ लावण्याला पाहून उदगारली, वा रे वा!'

अस्याः सर्गविधौ प्रजापतिरभूच्चंद्रो नु कांतिप्रदः।  
शृंगारैकरसः स्वयं नु मदनो मासो नु पुष्पाकरः।।  
वेदाभ्यासजडः कथं नु विषयव्यावृत्तकौतूहलो।  
निर्मातुं प्रभवेन्मनोहरमिदं रूपं पुराणो मुनिः ।।

कोमल कविता तर काय! - पण तो महादेव, तो विरूपाक्ष उग्र? तोदेखील त्या रमणीय ललनेला पाहून क्षणैक विचलित झाला! 'चंद्रादयारंभ अवाम्बुराशिः' आणि कुमारसंभवात वर्णिल्याप्रमाणे 'उमामुखे बिंबफलाधरोष्ठे । व्यापारयामास विलोचनानि ।।'

आजही सृष्टीच्या कलागृहात लावण्यवती ललनेच्या त्या सुंदर चित्रापेक्षा अधिक लोभनीय अशी दुसरी कलाकृति आढळत नाही. ललनेच्या लावण्याहून सरस असे दुसरे सौदर्यस्वप्न सृष्टीलाही अजून पडलेले नाही; तिच्या कल्पनेला सुचलेले आजतरी दिसत नाही! उद्याचे कोणी सांगावे?

असे हे ललनेचे लावण्य जर नामशेष झाले तर जीवनाला एका अत्यंत विमोहक आनंदास मुकावे लागेल; नव्हे, जीवनाची एक प्रेरणाच पंगु होईल.

कारण, ललनालावण्य ही जीवनाची एक नयनानंदक अशी शोभाच काय ती नसून ते सृष्टीच्या प्रजननलालसेचे वशीकरणचूर्ण आहे. लावण्य हे भगवान मदनदेवाच्या हातातील अमोघ अस्त्र आहे! याच अस्त्राच्या बळावर 'कुमारसंभावाचें' लोकहितकारक देवकार्य साधण्यासाठी सिद्ध झालेल्या परंतु त्याचे वज्रही ते देवकार्य साधण्यास अक्षम झालेले पाहून चिंतातुर असलेल्या इंद्रास मदन सावेश आश्वासू शकला, की 'प्रसीद विश्राम्यतु वीर वज्रं शरैर्मदीयैर्क तमः सुरारिः! बिभेतू मोघीकृतबाहुवीर्यः स्त्रीभ्योपिकोप्रस्फुरिताधराभ्यः!!'

ज्या हेतूसाठी प्रथमप्रसव मातेला सृष्टीने पुढे दूध दिले, मुख्यतः त्याच हेतूसाठी तिने कामिनीकुमारीला आधी लावण्य दिले. प्रजाजनन हाच नव्हे तर सुजनन (Eugenics) हाच, ललनेला ही विलोभनीय लावण्याची दैवी देणगी देण्यात निसर्गाचा मुख उद्देश आहे; हीच निसर्गाची अपेक्षा आहे.

तेव्हा लावण्यवती कुमारींनो, जननींनो, तुम्हांस जन्मतःच निसर्गाने दिलेल्या ह्या दैवी देणगीस आपल्या पूर्वपुण्याईचे वरदानच माना आणि त्यास अत्यंत जपा! लावण्यच नव्हे तर प्रत्येक स्त्रीने तिला जे रूप जन्मतः लाभलेले असेल ते त्यातल्या त्यात खुलून दिसावे असा यत्न अवश्य करावा. प्रसाधनांनी आपली कांति, वर्ण, शोभा वाढवावी. स्त्रीचे सौदर्य ज्यायोगे विकासेल तिला त्याचा योग्य तो लाभ लागेल असे उत्तेजन तिला मिळाले पाहिजे.

आपल्या आर्य राष्ट्रात पूर्वी स्त्रियांच्या लावण्याचा गौरव होत असे. लावण्य हे लांछन नसून ललनांचे एक स्पृहणीय विभूषणच कसे मानले जाई त्याचेही पुरावे आपल्या संस्कृत वाङ्मयात आढळून का येतात? रामायण, महाभारतासारख्या आर्य ग्रंथांतही स्त्रियांना लावलेली संबोधने पहा! ब्रह्मर्षि नि राजर्षिसुद्धा त्यांना 'हे सुकेशि, हे सुलोचने, हे सुमुखि, हे रंभोरु' असे संबोधताना आढळतात. स्त्रीवाचक शब्द नि विशेषणे पाहा - रमणी, ललना, रमा, सुंदरी वरोरु, सुमध्यमा पृथुजघना, कामिनी, कांता! स्त्रियांच्या प्रत्येक अवयवाचे नि एकंदर देहलतेचे सुगठन नि सौंदर्य हे असे एक गौरवार्ह आभूषण समजले जात असल्याने स्त्रियांकरवी ते जन्मजात सौंदर्य शक्यतों जपून, कांतिवर्धक चूर्णादिक प्रसाधनांनी जोपासून आणि आपल्याला मिळालेली ती पैतृक देणगी होती त्याहून वाढवून आपल्या संतानांच्या हाती सोपविली जाई. स्त्रियांना आपल्या लावण्याचा असा सदुपयोग करण्यास समाजाकडून उत्तेजन मिळत गेल्याने पिढीपिढींचे सौदर्य वाढत जाई आईहून मुलगी सुंदर, पित्याहून पुत्र अधिक सबळ असे ज्या राष्ट्रास आपले शरीरसौष्ठव प्रतिपिढीस वाढत जावे असे वाटते, त्यांची संस्कृतिही कलासुंदर बनते.

जी जितकी गबाळ नि जितकी कुरुप - ती तितकी सुवृत्त नि सुशील असे मानणारी कलाहीन संस्कृति ही संस्कृति नसून विकृति आहे. पिढीपिढी अशा अरसिक उपेक्षेने ती अधिकाधिक ओंगळ, बैडोल नि भेसूर होत जाते!

परंतु लावण्यवतींनो, तुम्ही हे मात्र विसरता कामा नये, की लावण्य ही तुमच्या हाती सोपविलेली निसर्गाची दैवी ठेव आहे. म्हणूनच त्या अनर्घ्य निक्षेपाची (ट्रस्ट ची) नैसर्गिक अटही तुम्ही पाळली पाहिजे. ती अट म्हणजे सुजनन, सुप्रजनन! जी लावण्यलतिका निःसंतान, ती निष्फळ आम्रलतिकासमान व्यर्थ आहे; निकम्मी आहे. जीवन हाच एक यज्ञ आहे; सद्‌गुण वा दुर्गुण ठरविण्याची मानवी कसोटी एकच, की मनुष्यजातीच्या सामुदायिक हितार्थ त्या यज्ञास जो उपकारक तो सद्‌गुण; अपकारक तो दुर्गुण! जर तुमचे लावण्य तुमचे लांछन न ठरविता, दुर्गुण न ठरविता तुमचा एक अत्यंत सौभाग्यास्पद सद्‌गुण ठरविणे असेल, तर त्या लावण्याचा असा सदुपयोग करा, की त्यायोगे तुमच्या राष्ट्राचे कल्याणच व्हावे. तुमचे सुख नि हितही त्यातच सामावलेले आहे, असले पाहिजे. जर एकाद्‌या आम्रवल्लरीला नुसता मोहोरच मोहोर फुलेल; पण फळ धरणार नाही; तर तिला कोण विचारतो? अमृतोपम मधुर आम्रफळांनी लवलेली आम्रवल्लरीच खरी स्पृहणीय! तसेच जी स्त्री स्वतःचे लावण्य झिजू नये म्हणून नुसती नट्टापट्टाच करीत मिरवीत राहते आणि सुरेख संतान प्रसवण्याचे नि जोपासण्याचे आपले जीवन-कर्तव्य तशा राक्षसी हावेने टाळते; ती स्वतः तर वात्सल्याच्या एका अत्यंत मधुर आनंदास आंचवतेच; पण राष्ट्रावरीलही एक आपत्ति होऊन बसते! ज्या हेतूने निसर्गाने ते लावण्य तिला दिले तो हेतु, ती अट, न पुरविल्याने आणि ते निसर्गधन संततिहितार्थ न नियोजिल्याने ती नैतिक चौर्याची अपराधिनी ठरते.

'भुज्यन्ते ते त्वघं पापाः ये पचन्त्यात्मकारणात्' संततिनियमन ते, की जे उत्तम संतति प्रसवण्यासाठीच काय ते आचरले जाते. संततिनियमन म्हणजे संतत्युच्छेदन नव्हे! तो आत्मघात तर आहेच आहे; पण राष्ट्रघातही आहे! अप्पलपोटेपणाची ती राक्षसी परिसीमा होय!

संतत्युच्छेदन हे लावण्याची जोपासना नसून लावण्यहत्याच होय!

ही काही अलंकारिक अतिशयोक्ति नाही; तर एक सामाजिक सत्य आहे. वर दिलेल्या Ursula Blook यांच्या लेखात लावण्याचे सर्वात दुःखप्रद व्यंग म्हणून जे सांगितले आहे, ते म्हणजे त्याची भंगुरता हेच होय. लावण्य हे फूल आहे आणि फुलाप्रमाणेच देखतदेखत फुलते न फुलते तोच सुकते. 'गलितयौवना कामिनी' हे एका भर्तृहरीच्याच नव्हे, तर मनुष्यजातीच्या हृदयात सलणारे शल्य आहे! ललनांनो, आपले लावण्य ओसरू नये म्हणूनच जर आपल्या सुप्रजननाच्या अत्युदार सामाजिक कर्तव्यालाही चुकण्याची अधम इच्छा आणि वात्सल्याच्या अत्यंत मधुर सुखास मुकण्याची चुकी होत असेल तर ध्यान्यात धरा, की ते लावण्य तुम्ही काय वाटेल ते केलेत तरी गळत्या घागरीतील पाण्यासारखे भरता भरता ओहोटीस लागणारच लागणार! ते झिजणारच झिजणार! साचवू म्हटले तरी ते आटणार; टिकवू म्हटले तरी ते नासणार. सोळापासून सव्वीस वर्षापर्यंत फुलणारे हे पावसाळी फूल! फारफार तर दहा वर्षाची सौंदयाची शिदोरी! तुमची चाळीस वर्षे म्हणजेच बहुतेक जीवन लावण्याच्या उपासमारीतच तुम्हांस काढावे लागणार! अशा ह्या लोभनीय पण अत्यंत क्षणिक नि नश्वर अशा सौदर्याच्या नादी लागून साऱ्या जीवनाच्या कल्याणास नि कर्तव्यास मुकण्याची नि हुकण्याची चुकी कोणती विवेकी वनिता करील?

आणि तरीही एका अर्थी व्यक्तीचे नसले तरी समाजाचे लावण्य अमर करण्याची एक युक्ति निसर्गाने मनुष्याच्या हातीच ठेवलेली आहे. लावण्य झिजेल म्हणून ज्या सुप्रजननाची वेडसर वनितांना भीति वाटते त्या प्रसवानेच लावण्याची झीज भरुन निघते.

व्यक्तीचे नसले तरी राष्ट्राचे लावण्य अमर करण्याची युक्ति

एखाद्याला गुलाबाची बागची बाग सदा टवटवलेली, सदा बहरलेली हवी असेल तर माळी काय करतो? दहापाच गुलाब एकदा लावून काय तो स्वस्थ बसत नाही. ते गुलाब हळूहळू झिजणारच, निःसत्व होणारच. यासाठी ते जोवर बहरलेले आहेत, तोवर त्यांची कलमे करुन माळी सर्वत्र नवेनवे गुलाब लावतो. त्यायोगे एक गुलाब निःसार होतो तों त्याच्याच जीवनाचे पागोरे असलेल्या अकरा गुलाबांना नवनवा बहार येतो. ती गुलाबाची बाग अशी सदा बहरलेली असू शकते. तसेच ललनांनो, तुमच्या लावण्याचे आहे! ते जोवर खुललेले आहे, तोवर त्या लावण्यतेची कलमे नवजीवनाच्या भूमीत लावीत चला. ज्या एका सुंदर मातेच्या सभोवती तिच्या चार सुंदर शोभिवंत सुतसुतांचा मेळावा विलसत, विहरत रमलेला आहे - तिचे लावण्य सफल झाले; जीवन पुन्हा ताज झाले. तिच्या स्वतःच्या यौवनाचा बहर ओसरतो न ओसरतो तोच तिच्या लावण्यानंदाची झीज शतपटीने भरुन काढणारा वात्सल्यानंद तिच्या हृदयात उचंबळू लागतो. तिच्या जीवनाचा पूर्वार्ध जसा लावण्याने तसाच उत्तरार्ध वात्सल्याने रसरसलेलाच राहिल्याने तिचे आयुष्य केव्हाच नीरस होत नाही, तिचे लावण्य नि तारूण्य तिच्या कन्यापुत्रांत पुन्हा वाढीस लागते; तिच्या राष्ट्राचे लावण्य नि तारूण्य अमर होते!

लावण्य विलोभनीय आहेच; पण लावण्याहूनही शील अत्यंत विलोभनीय होय!

यास्तव लावण्याची जोपासना तर कराच; पण महिलांनो, ज्यायोगे मनुष्यजातीच्या कल्याणार्थच त्याचा विनियोग होईल अशाच प्रमाणात नि पकाराने सौदर्यास महत्व द्या; त्यास सत्कारणी लावा. हेच शील! हे शील जन्मभर पुरणारी नि मृत्यूनंतरही पुरून उरणारी संपदा आहे. तिला रूप नाही, पण हे परोपकारी

वत्सल नि विवेकी शील आहे ती स्त्री जिला नुसते रुप आहे पण हे वत्सल नि प्रामाणिक शील नाही तिच्यापेक्षा अधिक गौरवार्ह समजली पाहिजे. ती एकंदरीत अधिक सुखी नि समाजाला शेवटपर्यंत अधिक हवीशी असते. पण जिला लावण्य नि शील ही दोन्ही आभूषणे लाभलेली आहेत, तिला लावण्यापासून होणारे लाभ तर मिळतातच; पण Ursula ह्यांच्या वरील लेखात सांगितलेले तोटेही त्याच्या सदुपयोगाने बव्हंशी टाळता येतात. आप्पलपोटया वांझेचे लावण्यही झिजतेच; पण एखाद्या कंजुषाचे धन नाहीसे होताच त्याला जशा असह्य वेदना होतात, तशी तिची त्या लावण्यास वयाने हरल्यानंतर दुर्गति होते. आपल्या बीजांना नवजीवनाच्या क्षेत्रात पेरून जी सुंदर संततीचे उद्यानचे उद्यान उगवते नि जगताची शोभा नि संपदा वाढविते त्या शीलवती मातेचेही लावण्य झिजतेच! -पण जसा तो दानशील आर्यसम्राट् सर्वदक्षिण यज्ञात आपली सारी मत्ता प्रजाजनात वाटून देऊन 'मृत्पात्रणेषामकरोद्विभूतिम' तसे त्या मातेचे लावण्य नाहीसे झाल्यानेच ती लावण्य होते तेव्हापेक्षाही अधिकच मनोज्ञ भासू लागते! तिचे लावण्यदारिद्रयच तिला तिच्या लावण्यसंपदेहूनही शोभू लागते. 'आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव!'

आपल्या पुराणातील अनेक सुरेख कथांत अशी एक कथा आहे, की पौर्णिमेच्या पूर्णचंद्राला अमृताच्या काठोकाठ भरलेल्या पेल्याप्रमाणे देव पिऊ लागतात. त्या सुधाकराच्या कला पितापिता शेवटी देव एक कला तेवढी त्याला उरू देतात. तीच प्रतिपदेची चंद्रकोर! पण म्हणूनच पुनवेच्या प्रफुल्ल चंद्राला जो मान नाही तो देवकार्यी आपले सर्वस्वी वाहून क्षीण झालेल्या त्या प्रतिपदेच्या चंद्रकोरीला आहे- लोक तिला पूजितात; पूर्णचंद्राला नव्हे!

जिच्या कौमार्यात लावण्याचा नेत्रानंददायी चंद्र आरोग्याच्या सकल कलांही प्रफुल्ल झालेला आहे; सच्छील यौवनात जिच्या उदरी देवदूतासारखीं सुंदर नि सुलक्षणी बालके जन्मली आहेत, आणि त्यांना आपल्या त्या लावण्याचे नि शीलाचे ते वत्सल दूध पाजून संबंधिताना जी स्वतः प्रतिपदेच्या चंद्रकोरीसारखी क्षीण कलांनीच पूर्ण कलांपेक्षाही प्रौढावस्थेत सुभग भासत आहे; त्या जननीला आमचे शतवार वंदन असो!!

तिच्या यौवनाचा नि लावण्याचा तो-

पर्यायपीतस्य सुरैः हिमांशो
कलाक्षयः श्लाघ्यतरो हि वृद्धेः!!

****

जगातील आजच्या थोर स्त्रियांपैकी तीन -

१) चीनच्या सौ. चंग.

२) इटालीच्या सौ. मुसोलिनी.

३) अबिसीनीयाच्या सम्राज्ञी.

थोर पुरुष म्हटला म्हणजे आजवरच्या समजुतीप्रमाणे तरी, जो पुरुष स्वतःच काही विशेष गुणाने आणि मोठ्या कृत्याने नावालौकिकास चढलेला असतो तो, असा अर्थ होतो. परंतु थोर स्त्री म्हटली म्हणजे जी स्त्री स्वतःच एखाद्या महत्कृत्याने वा गुणाने थोरपणा पावलेली आहे ती, असा एकच अर्थ होत नाही, तर थोर स्त्री म्हणजे ती किंवा कोण्या थोरपणा पावलेल्या पुरूषाची जी पत्नी आहे ती, असा दुहेरी अर्थ संभवतो. पत्नी ही पतीचे अर्धांग होय, ह्या परंपरागत शिष्ट समजुती प्रमाणे थोर पुरुषाची पत्नीही अर्ध्या थोरपणाची भागीदार ठरतेच ठरते. सावकाराची पत्नी सावकारीण, वकिलाची वकिलीण, पाटलाची पत्नी पाटलीण. स्वतः डॉक्टरीचे तर काय, परंतु; मिश्रकाचेही औषधीज्ञान नसलेली स्त्री तिचा पती डॉक्टरी परीक्षा उतरला की त्या पुस्तकातील 'अ आ' सुद्धा तिला स्वतः न वाचता आला तरी तिच्या नवऱ्याची ती डॉक्टरीची परीक्षा उतरल्याची बातमी ज्या पहिल्या वृत्तपत्री छापून येते, त्याच वृत्तपत्रांतल्या त्या बातमीसरशी स्वतःही डॉक्टरणीची परीक्षा उतरते. डॉक्टरणीची पदवी तरी तिला मिळतेच.

अनेक प्रकरणी पुरुषांपेक्षा स्त्रियांना समाजात अधिक हीनपणा आणि कमी सवलती बहुतेक देशातून दिलेल्या असतात. निर्बंधही स्त्रियांपेक्षा पुरूषांनाच अधिक अनुकूल असतात. रोमन, मुस्लीम, हिंदू, यहुदी, ख्रिश्चन प्रभृति बहुतेक धर्मातून, नि निर्बंधातून स्त्रीवर पुरुषाचे स्वामित्व या वा त्या प्रमाणात स्थापिलेले असून स्त्रियांना सामाजिक सुखसोयी पुरुषा इतक्या सहजा सहजी भोगू देण्यात येत नाहीत. पुरूषांना जीवन सहजासहजी सुखदायी करण्यात आणि स्त्रियांपेक्षा पुरूषांना कमी कडकपणे नि अधिक सवलतीने वागविण्यात अशा प्रकारचा पक्षपात जरी इतर प्रकरणी होत असला, तरीही या प्रकरणी तरी, स्त्रीलाच पुरूषापेक्षा अधिक सवलत शिष्टाचाराने दिलेली आहे. थोर म्हणवून घेण्यासाठी पुरूषाला जे कष्ट करावे लागतात जी योग्यता संपदावी लागते नि पराक्रम गाजवावे लागतात त्याच्या सहस्त्रांशानेही काही एक विशेष खटपट न करता स्त्रियांना बसल्याबसल्या थोरपणा मिळविण्याची जी एक पक्षपाती सोय समाजात आहे, ती ही की, स्त्रीने कोणातरी होतकरु वा होणाऱ्या वा झालेल्या थोराची पत्नी व्हावे. तोफांच्या भडिमारास तोंड न देता राज्य जिंकल्यावाचून राणी व्हायचे की, कोणातरी महाराजाशी लग्न लावताना जो अक्षतांचा मारा होतो तेवढा सोसला की झाले! शेटाणी व्हायचे की कोणातरी शेटजीच्या गळयात पहिली, दुसरी, तिसरी कोणची तरी एक फुलमाळ घातली की त्या लखपतीची पेढीची पेढी त्या टोपलीभर फुलांवारी खरेदली गेलीच म्हणून समजावे. थोराची बायको होणे हीच एक स्त्रियांची थोर करामत समजली जाते. थोर मनुष्याच्या बायकोची थोरवी आपोआपच वाढते.

पण या प्रकरणी समाजनियम, शिष्टाचार, रूढ समजूत ही सारी पुरुषांवर मात्र मोठा अन्याय करीत आहेत. कारण स्त्रियांना दिलेली वरील सवलत पुरुषांना मिळू शकत नाही, इतकेच नव्हे, तर त्यांना त्या वर्तनासाठी उलट एक अपमानाचा दंड भरावा लागतो. कोण्याही साधारण शिकलेल्या पुरुषाने वकिल

झालेल्या स्त्रीशी लग्न केले तर त्याला काही कोणी गौरविण्याच्या सद्‌हेतूने 'वकिल महाशय' म्हणत नाही! जर डॉक्टर महिलेशी कोणी साध्या पुरुषाने विवाह केला तर त्यालाही कोणी 'या डॉक्टर'! म्हणून स्वागतीत नाही. आणि जर कोणी डॉक्टरणीचे यजमान म्हणूनच काय ते कोणा निरक्षर पुरुषास 'या डॉक्टर' म्हणून म्हटलेच तर सारी मंडळी खो खो हसल्यावाचून रहात नाहीत. म्हणजे अयोग्य स्त्री सुद्धा जर कोण्या थोराची पत्नी झाली तर तिला जशी ती होती त्याहून शतपटीने थोर समजले जाते, तसे कोण्या पुरुषाने त्याच्याहून थोर स्त्रीशी लग्न केले तर त्या पुरुषाची थोरवी काही त्यासंबंधाने वाढली आहे असे कोणी समजत नाही. उलट आपल्याहून अधिक योग्यतेच्या पदवीच्या वा कर्तृत्वाच्या स्त्रीचा नवरा होणे म्हणजे पुरुषाने स्वतःची असती नसती थोरवी बुडवून बायकोच्या नावे विकणे होते.

ज्या सवलती पुरुषांप्रमाणे स्त्रियांना समाजात समतेन मिळत नाहीत, त्या मिळविण्यासाठी स्त्री विमोचक मंडळे जशी झटताहेत, तसेच थोरपणा संपादन करण्याच्या या सवलतीच्या प्रकरणी पुरूषांना ज्या अन्याय्य विषमतेने वागविण्यात येत आहे, त्या ह्या अन्यायास नाहीसे करण्यासाठी एखादे पुरूषविमोचक मंडळही स्थापावे की काय असे मनात आल्यावाचून रहात नाही.

स्त्रियांवरील अनेक विषम अन्याय दूर करून स्त्री पुरूषांना समानाधिकार देण्याच्या कामी राममोहनांसारखे अनेक पुरूष आजवर झटत आले आहेत. पुरूषांच्या हृदय स्त्री दाक्षिण्याचे उतराई होण्यासाठी वरील प्रकारचे एखादे पुरुष विमोचक मंडळ काढण्यासाठी एखादी स्त्री-मोहन पुढे येईल काय?

थोर पुरूषाची स्त्री ती थोर स्त्री; किंवा जी स्त्री स्वतःच्याच थोर गुणांनी वा कृत्यानी थोरपणा पावते ती थोर स्त्री, ह्या स्त्रियांच्या थोरवीच्या दोन रुढ अर्थापैकी आम्ही ज्या आजकालच्या तीन थोर स्त्रियांचा परिचय या लेखात देणार आहोत, त्या तिन्ही स्त्रिया पहिल्या अर्थी तरी थोर आहेतच आहेत. कारण त्या तिघींचे भ्रतार जगाच्या डोळ्यांसमोर सारख्या असलेल्या आजच्या राजकीय उलाढालीतील तीन राष्ट्रांचे धुरंधर नायकच आहेत. चीनचे सर्वाधिकारी चंग कै. शेक, ॲबिसीनीयाचे बादशाह रासतफारी आणि इटलीचे सर्वाधिकारी मुसोलिनी हया तिघां आजच्या राजकारणातील पदावरील पुरुषांच्या बायका आहेत तरी कशा, हे जाणण्याची उत्कंठा कोणाही वृत्तपत्रवाचकाला, त्यातही स्त्रीला लागलेली असणारच. यास्तव या तिघींच्या विषयी निरनिराळया लेखकांनी प्रत्यक्ष पाहून ग्रंथिलेली फुटकळ माहिति संकलून त्यांचा परिचय 'स्त्री'च्या महिला - वाचकांस या लेखात खाली करुन देत आहो. थोर पुरुषांच्या भार्या ह्या नात्याने ह्या तिन्ही स्त्रिया थोर आहेतच. स्वतःच्या कर्तृत्वानेही त्या तशा ठरतात की नाही ते आता वाचकांनीच ह्या परिचयापुरते ठरवावे.

( १ )

चीनचे सर्वाधिकारी चंग-कै-शेक ह्यांच्या पत्नी-सौभाग्यवती चंग.

नानकिंग नगराच्या कक्षेतच असलेल्या एका उपनगरातील वाडीत डॉ. कुंग हे चीनमधील चंग-कै-शक पेक्षांच काय ते दुय्यम असलेले थोर सरकारी अधिकारी रहातात. चंग-कै-शेक हे १९३३ पर्यंत, चीनमध्ये अगदी पराकोटीस गेलेल्या यादवीत, बंडाळीत नि परचक्रांच्या आक्रमणात नानकिंगच्या राष्ट्रीय प्राजकाची सत्ता अबाधित ठेवण्यासाठी जीवापाड श्रम करीत होते. तेव्हां त्यांना अगदी विश्वासाचा, अदम्य कर्तृत्वाचा

आणि वैयक्तिक स्नेहरज्जूंनी त्यांच्या जीवनाशी निगडीत झालेला जो एक बलवत्तर साथीदार लाभला तोच हे डॉ.कुंग होत! सन १९३३ पर्यंत चीनच्या राष्ट्रीय प्राजकाच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ सर्वाधिकारी सर सेनापति चंग-कै-शेक ह्यांच्या संगतीत डॉ. कुंग हे ही नेहमी परचक्राच्या व्यूहात सापडू नये म्हणून आपल्या छावण्या एकसारख्या फिरत्या ठेवीत पण १९३३ च्या शेवटी ह्या राष्ट्रीय नानकिंग सरकारची सत्ता पहिल्यापेक्षा पुष्कळच प्रबळ, स्थायी नी सुरक्षित झाल्यामुळे डॉ. कुंग ह्यांच्यासह सर्वाधिकारी चंग हे ही नानकिंग ह्या राजधानीमध्ये उघडपणे स्थायी झाले. नाना प्रकारच्या लतावृक्षांनी मांडवलेल्या आपल्या वाडीत नानकिंगच्या वरील उपनगरात, तिथे डॉ. कुंग हे रहातात तिथेच चीनचे सर सेनापति चंग नी त्यांच्या पत्नी सौभाग्यवती चंग ह्यांचेही आवडते निवासस्थान आहे.

चंग-कै-शैक हे चीनच्या राष्ट्रीय प्राजकाचे सध्याचे सर्वाधिकारी नि सरसेनापति असून डॉ. कुंग हे अर्थसचीव आहेत. हया दोन व्यक्तींचे जीवन परस्पर स्नेहाने अगदी समरस झाले आहे. म्हणूनच आज चीनच्या राष्ट्रीय सरकारात इतका तरी एकसूत्रीपणा, व्यवस्था नी बळ उरले आहे. डॉ. कुंग आणि सरसेनापति चंग हयांच्यात हा जो वैयक्तिक जिव्हाळा वसत आहे, त्यांची दोन व्यक्तिमत्वे जी अशी अगदी एकजीव झालेली आहेत, ती कोणत्या ममत्वशृंखलेने त्यांना असे स्नेहबद्ध केले म्हणून असावी बरे? चीनच्या राष्ट्रशक्तीचे आज आधारस्तंभच असलेल्या ह्या दोन पुरुषांना परस्पराचे असे जिवश्चकण्ठश्च मित्र नि एकनिष्ठ सहकारी करुन सोडणाऱ्या, त्यांना परस्पर आकर्षणाने एकत्र बांधून ठेवणाऱ्या स्नेहाच्या सोनेरी साखळ्या म्हणजे -

सौभाग्यवती चंग नी तिची बहीण सौभाग्यवती कुंग हयाच होत!

ह्या दोघां बहिणीपैकी एक सरसेनापति चंग यांची नि दुसरी डॉ. कुंग यांची पत्नी असल्याने त्या दोघां थोर पुरूषाच्या राजकीय सहकार्यास ह्या प्रेमळ नात्याने एकनिष्ठ अशा वैयक्तिक विश्वासाचे नी आपुलकीचे पाठबळ अनायासेच मिळत आहे. चीनच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यास आणि सत्तेस जर आजही काही स्थैर्य नी बळकटी असेल तर ती चंग-कै-शेक ह्यांनी संघटीत केलेल्या नव्या एकसूत्री सैन्यबळामुळेच होय. चंग-कै-शेक यांचा सर्व भार ह्या सैन्यबळावरच आहे. आणि चंग-कै-शेक यांचा धाक चहूकडे बसून चीनमध्ये यादवी नी गुंडपणा जर आज काही दबला असेल तर तोही त्यांच्या हाती ही दंडशक्ती एकवटलेली आहे म्हणूनच होय. परंतु ह्या सैन्याची सारी शक्ती त्यांच्या तरवारीतच काय ती नाही, तर ती पुष्कळ अंशी त्यांच्या तिजोरीत आहे! जर चंग-कै-शेकना या सैन्याचा पगार, दारुगोळा नि शस्त्रात्रे प्रभृति खर्चास अवश्य लागणारे द्रव्य चीनच्या राष्ट्रीय कोषात नसेल तर हे सैन्यबळ बोलता बोलता लुळे होईल. अर्थात राज्याची आर्थिक घडी नीट बसवून उप्तन्न नि कर वेळच्या वेळी कोषात सारखे ओतीत रहाण्याचे जे अत्यंत अवश्य कार्य ते वेळच्या वेळी अद्याप होत आहे. म्हणूनच आज चिनी राष्ट्रीय प्राजक स्वतंत्र आहे. जिवंत आहे. सैन्यबळ नि कोषबळ म्हणजेच सरसेनापति चंग नि अर्थसचीव डॉ. कुंग! ह्या दोघांत निःशस्त्र सहकार्य आहे म्हणून आज चीनचे प्राजक इतके तरी बलवान आहे. आणि चीनमध्ये प्रत्येक व्हाअसरॉय, गव्हर्नर, सेनापति दुसऱ्या गव्हर्नर - सेनापतीशी लढत असता, प्रांताप्रांताचे अधिकारी आणि मंत्रीमंडळातील प्रधान एकमेकाविरुध्द बंडे पुकारीत असता सेनापति चंग नि अर्थसचीव कुंग हे दोघे प्रबळ अधिकारी तरी इतके

एकवटून आपुलकीच्या भावनेने राष्ट्रीय कार्य ते करु शकताहेत, त्यांच्यात फाटाफूट होण्याचा आज तरी जो असंभव वाटत आहे त्याचे एक मुख्य कारण म्हणजे ह्या दोन स्त्रियांचे - ह्या दोघी बहिणींचे - प्रेमपाश, कर्तृत्व, नी आकर्षण हे होय!

हे चौघेजण नानकिंग जवळच्या त्या उपवनातील, वाडीतच बहुधा रहातात. चीनचे राष्ट्रीय सरकार आज ह्या चौकडीतच सामावलेले आहे ह्या एका कटुंबात जे संध्याकाळच्या चहाच्या वेळी ठरते तेच बहुधा उद्या चीनच्या राष्ट्रसभेत ठरते. राष्ट्रीय कर्तव्याला ह्या दोघां बहिणींच्या जादुगारीने, कौटुंबिक ममत्चाचा मोहकपणा आला आहे. ह्या दोघां बहिणींचे हे नाते आणि त्यांच्याशी झालेल्या विवाहामुळे सर्वाधिकारी चंग आणि डॉ. कुंग हयांची जडलेली कौटुंबिक ममता ही आज चीनची एक राष्ट्रशक्ती आहे असे म्हणण्याचा प्रघात चिनी लोकांत पडला आहे.

ह्या आपल्या बहीणींच्या वाडीत सौभाग्यवती चंग-चीन चे सरसेनापति नी सर्वाधिकारी चंग-कै-शेक यांच्या पत्नी उद्यानात कधी कधीच काय त्या विहरताना आढळतात. वयाने तरुण, रूपाने सुंदर, प्रफुल्ल नि निष्कपट नयनांची ती प्रमदा आपल्या थोर पतीच्या अर्धांगीस शोभेल अशाच प्रमाणात त्यांचा कठीण राजकर्तव्याचा भार वहाताना नि त्यांच्याशी गंभीर राजकारणीय प्रश्न चर्चिताना बहुधा दिवसभर गुंतलेली असते. ती दोघे सकाळीच उठतात. राज्यातील निरनिराळ्या विभागांकडून आलेली प्रतिवृत्ते, परराष्ट्रीय दूतांच्या भेटी-प्रतिभेटी, शत्रूंच्या हालीचालींची चर्चा या सर्व कार्यी सरसेनापतीबरोबर त्यांच्या पत्नी सौ. चंग ह्याही गुंतलेल्या असतात. त्यांच्या यजमानांना स्वतःचे हसण्या बागडण्याचे मित्रमंडळ असे नाहीच. डॉ. कुंग हयांच्या घरी जेवताना किंवा कुटुंबीय गप्पागोष्टी करताना चंग-कै-शेक यांना जो काय विसावा किंवा मोकळेपणा मिळतो तेवढीच त्यांची सुटी. सरसेनापति चंग यांचा सारा परराष्ट्रीय पत्रव्यवहार सौभाग्यवती चंग ह्याच वाचतात नी त्याच बहुधा उत्तरे देतात. परकी वृत्तपत्रे वाचून त्यातील सार काढण्याचे कामही सौ. चंग हयांचेच. युरोप नी अमेरिका ह्यांतील विचारांशी नी उलाढालींशी चंग यांची ओळख ताजी ठेवण्याचे कामही त्यांच्या पत्नीकडेच असते. बहुतेक सभातून नि मंडळांतून परराष्ट्रीय दूतांशी वा मंत्र्यांशी संभाषण करताना सौ. चंग ह्याच आपल्या सरसेनापतींच्या नि पतीच्या दुभाष्याचे काम करतात.

वैमानिक प्रवास हा तर आजकालच्या पाट्यावरच पूजलेला आहे. ज्या प्रांताची पाहणी करावयाच्या कार्यी पूर्वी नुसते पोचण्यास आठवडेही पुरत नसत, अशा चीनच्या विस्तीर्ण साम्राज्याच्या दूरदूरच्या प्रांतात आता चारपाच तासात जाता येते. चंग दांपत्याची स्वतःची चार विमाने आहेत. त्यातील एक इटलीचे सर्वाधिकारी मुसोलिनी ह्यांनी चीनच्या सर्वाधिकाऱ्यास भेट दिलेले आहे. सौ. चंग ह्या प्रवासाची सिध्दता नेहमीच जय्यत ठेवून असतात. सरसेनापतीसह बहुतेक प्रवासात त्यांच्या सचीव विभागाच्या मुख्य समालोचक म्हणून सौभाग्यवती चंग ह्याहि जात असतात. सूचना मिळताच थोडया मिनीटांच्या आंत एका प्रचंड विमानात सचीव विभागातील फिरत्या कार्यालयासुध्दा ती दोघे झपाझप उडू लागतात आणि तासा दोन तासांत आज कुठल्या दूरवरच्या सीमा प्रांतातील सैन्याची पहाणी करताना दिसतात, तर उद्या दुसऱ्या कुठल्या प्रांतातील विद्यालयीन तरुणांना नि सैनिकांना चीनच्या 'नवराष्ट्र सूत्रांची' संथा देताना आढळतात. ही नवराष्ट्रसूत्री सौभाग्यवती चंग ह्यांनी चीनच्या बहुसंख्य जनतेच्या राष्ट्रीय कर्तव्याची

चेतना उत्पन करण्यासाठी स्वतः गथिलेली आहेत. वैमानिक प्रवासासंबंधी सौ. चंग आपणच म्हणतात की, जगातील कोणत्याही स्त्रीपेक्षा मी आकाशात अधिक मैल उडाले आहे असे मला वाटते!

चंग-कै-शेक यांना परभाषा अशी येतच नाही. ते जपानी थोडेसे शिकले होते, पण तेही आता विसरले आहेत. पण सौभाग्यवती चंग ह्या अमेरिकेत शिकलेल्या, युरोपीय भाषांत राबलेल्या, त्यामुळे सरसेनापति चंग हयांच्या सर्व परराष्ट्रीय कारभारांत चंग हे त्यांच्या पत्नीच्याच मुखे बोलत असतात. किंबहुना सेनापति चंग यांची सौ. चंग ही एक वक्तृत्वशील अशी राखीव जिव्हाच आहे. सौ. चंग यांचे संभाषण चपल असताहि सावध, साधे असताहि चटका लावून सोडणारे असते. राजकारणाच्या उलाढालीत अगदी पुढे मागे चमकण्यांत त्यांना आयुष्याचा जिवंतपणा वाटतो आणि तसे एका राष्ट्राच्या पुढे चमकण्यावाचून राहूच नये असे तेजहि चीनच्या सुदैवाने सौ. चंग यांच्यामध्ये आहे.

( २ )

सौभाग्यवती मुसोलिनी

चीनचे सर्वाधिकारी जसे चंग-कै-शेक, तसेच इटलीचे सर्वाधिकारी मुसोलिनी. आज चीन स्वतंत्र असला तरी दुबळा, दुभंगलेला! इटली स्वतंत्रच नव्हे तर आजच्या प्रबळ राष्ट्रांतला एक प्रबळ, जयिष्णु जेता! त्यामुळे आज चंग-कै-शेकपेक्षां मुसोलिनीचा दरारा नि बलबाला जगात अधिक झालेला असणारच. कारण मनुष्याचे मोठेपण नि कर्तृत्व हे बहुधा त्याच्या राष्ट्राच्या मोठेपणाच्या नि कर्तृत्वाच्या पायावर अथवा चबुतर्‍यावरच अधिष्ठिलेले असते. राष्ट्राचे बळ, वर्चस्व, प्रतिष्ठा मोठी असली की त्यातील व्यक्तीची प्रतिष्ठा, बळ नी वर्चस्व मुळात असते त्याहूनही जास्त उठावदार दिसते. प्रभावी ठरते. दुर्बळ चीनच्या सर्वाधिकार्‍याचे कार्य अधिक कठीण असतांहि आणि ते करून दाखविण्यात त्याला अधिक निराशा, कष्ट सहावे लागत असतांहि, आजच्या दुर्बळ चीनच्या सर्वाधिकारी चंग हून प्रबळ इटलीचा सर्वाधिकारी मुसोलिनी अधिक प्रभावी वाटावा, जगभर त्याचा दरारा पसरावा नि त्याचा गाजावाजा अधिक व्हावा हे साहजिकच आहे. स्वतः मुसोलिनीचे व्यक्तिमत्वही असामान्यच आहे.

पण, चीनच्या सर्वाधिकार्‍यापेक्षां इटलीचा सर्वाधिकारी त्याच्या राष्ट्राच्या प्रबळतेमुळे जसा अधिक बलशाली नि दिग्विजयी आहे तशीच त्या इटलीच्या सर्वाधिकार्‍याची पत्नीही चीनच्या सर्वाधिकार्‍याच्या पत्नीहून अधिक राजकारणी नि राष्ट्रीय व्यापाचा भार उचलणारी असावी असा कुणाचा तर्क सहजीच झाल्यास तो मात्र साफ चुकीचा ठरणार आहे! या अर्थी सौभाग्यवती मुसोलिनी थोर नाही, इतकेच नव्हे, तर ती एक अतिशय साधी, कुटुंबाच्या दारा बाहेर पाऊलहि न टाकणारी, अगदी अक्षरशः एक ‘गृहिणी’ आहे. तिला राजकारणाच्या उलाढालींत केव्हांहि स्थान नव्हते, तिला त्या स्थानाची हावहि नाही. इतकेच नव्हे तर एक प्रकारची नावड आहे.

मुसोलिनीचे लग्न झाले तेव्हां तो एका लोहाराचा मुलगा होता. राजधानीत त्याला कोणीही राजकीय वर्तुळात ओळखीत नव्हते. सौभाग्यवती मुसोलिनी ही त्या लोहाराची सून येवढ्याच पदवीने त्या सासरमाहेरांच्या लहान लहान गावी ओळखली जात होती. आज मुसोलिनी इटलीच्या साम्राज्याचा एक दिग्विजयी सर्वाधिकारी झाला आहे. पण त्याची ती गृहिणी? ती अजूनहि आपल्या त्या मुळच्या पदवीला

चिकटून आहे. ती आजहि एका लोहाराची सून आहे ती आहे! तिचा तो सासरा सध्या आपल्या गावी एक लहानसे दारूचे दुकान चालवीत असून सौभाग्यवती मुसोलिनीला त्या आपल्या वृध्द सासऱ्याच्या घरी नांदण्याची जितकी आवड आहे तितकी तिच्या दिग्विजयी पतीच्या रोममधील अनेक राजवाडयांमध्ये नांदावयाची नसते! तिच्या पतीची राष्ट्राच्या सर्वोच्च पदावर स्थापना झाली तेव्हां राजघराण्यातील थोरातील थोर राजस्त्रियांना नी सरदारणींना जी पदवी मिळते ती 'डोना' ही पदवी त्यांना मिळाली, परंतु तिला त्या पदवीमुळे अगदी गांगरल्यासारखे होऊन गेले. मोलकरणीला अकस्मात भरजरी पैठणी नेसविली तर ती जशी अगदी गोंधळलेली दिसते, बुजते, तिच्या नेहमीच्या गुडघ्यापर्यंत ऐटीचा कासोटा मारलेल्या लुगड्यात ती जितकी उठावदार दिसते नी टापटिपीने चालते त्याहून त्या भरजरी पैठणीमुळे ती उलट अगदी गबाळी दिसू लागते, तशी काहीशी स्थिती त्या साध्या लोहाराच्या सुनेस जो तो सरदारीण बाई, सर्वाधिकारीण महाशया, श्रीमती, प्रभृति थोर थोर उपपदे लावून प्रणामू लागला तेव्हां स्त्रियांनी गजबजलेल्या त्या अभिजात ललनांच्या थव्यांत सौभाग्यवती मुसोलिनीचीहि झाली. राशेल हे तिचे पूर्वीचे साधे नाव तिला अजून आवडते. 'डोना राशेल महाशया' असे कोणी ललकारू लागताच ती अगदी बावरल्यासारखी होते आणि शक्य तितक्या त्वरेने त्या राजवाडयातील थोर ललनांच्या सरदारी थव्यांतून वा राजसभांतून अंग काढून तिच्या त्या आवडत्या साध्या घरात मोकळेपणी नांदण्यास निघून जाते.

सौभाग्यवती चंग यांना एखाद्या महत्वाच्या राष्ट्र मंत्र्याच्या राजसभेत बोलावणे न आले, तर राग येईल; पण सौभाग्यवती राशेलला एक संकट टळल्यासारखे वाटेल! किंबहुना तिच्या उभ्या जन्मात तिने प्रधान मंडळाच्या बैठकीत पाय असा टाकलेला नाही, किंवा ते तिकडे राजकारण राजकारण म्हणजे काय चालले आहे याची तिने कधी चौकशी सुध्दा केली नाही. तिच्या राज्यधुरंधर पतीच्या नी कुटुंबाच्या जिवास अपाय किंवा गृह्य सुखासमाधानास व्यत्यय येण्याचा संभव ज्यात असेल, तेवढी उलाढाल काय ती राशेलबाई चिंतापूर्वक विचारतील; ऐकतील; पण तेहि एक चिंताजनक बातमी म्हणून त्या उलाढालीविषयी आपल्या पतीशी वा इतर कोणाशी काही वाटाघाट, कटकट वा कट करुन स्वतः त्यात बोट खुपसण्यांसाठी नव्हे! या कामी जी तिची आवड, तीच तिच्या पतीचीहि. सर्वाधिकारी मुसोलिनीने आपल्या ह्या गृहिणीला केव्हांही सार्वजनिक वा राजकीय उलाढालीत गोवलेले नाही. किंवा सार्वजनिक दृष्टीसमोर थाटामाटात मिरविलेले नाही. त्यांच्या मूळच्या गावाहून काही वर्षापूर्वी मुसोलिनीने राशेलबाईसह आपले कुटुंब रोमला आणलेले असले तरी देखील तेथील कोणच्याही राजवाडयात वा अधिकारी प्रासादांत श्रीमती राशेल राहण्यास मान्य होईना. इटलीतील साऱ्या प्रासादाच्या किल्ल्या तिच्या कटीशी खळखळत असतां ती इटलीच्या सर्वाधिशास्त्याची भार्या श्रीमती राशेल त्या राजवाडयाच्या किल्ल्या परत करुन रोमलगतच्या एका लहानशा उपनगरात एका अगदी साध्या नि शांत घरात राहाण्यास गेली. त्या पोर्टापिआ उपनगरात घरकामात चूर झालेली एक अत्यंत मुखस्तंभ नि सौम्य बाई तिच्या घरावरुन जाणाऱ्या येणाऱ्यांना केव्हां केव्हां दिसते. तीच राशेल, इटलीच्या अधिशास्त्याची अर्धांगी, दिग्जेत्या मुसोलिनीची पत्नी,'डोना' राशेल होयः हे सांगितले तरीहि कोणास खरे वाटणार नाही, वाटत नाही.

साऱ्या युरोपाला आपल्या धटिंगण धाडसाने तोंडात बोट घालावयास लावणाऱ्या मुसोलिनीची भार्या सौभाग्यवती मुसोलिनी आहे तरी कशी हे पहाण्याची इच्छा साऱ्या युरोपला असणारच. युरोपचे शेकडो मुद्रण वार्ताहार तिला पहावयास येतात रोमला! पण राजवाडयातून, राजसभांतून, राष्ट्रोत्सवांतून, मोठमोठया सरदारी नाचांतून, नाटयालयांतून, भोजनालयांतून जेथे जेथे राण्या महाराण्या, राजस्त्रिया, राष्ट्राधिकाऱ्यांच्या भार्या सारख्या झळकावयाच्या, तेथे तेथे युरोपच्या वार्ताहरांना डोना राशेल मात्र काही सापडणारी नसते. तिच्या त्या लहानशा पोर्टापिआ गावी जाऊन बसले तरी देखील हिंडता फिरता सार्वजनिकपणे ती फारशी आढळणे कठीण! आढळलीच तर सकाळी तेवढी आढळते. गाडी, घोडा, मोटारीतून वारा खाण्यास सलील निघाली असताना? छे! तिच्या मुलाबाळांसाठी ताजे मध, भाजीपाला, मांस, मच्छर प्रभृति सैपाकाचे अवश्य ते सामान स्वतः पारखून घेण्यासाठी, एका हाती पिशवी वा परडी घेऊन एखाद्या कुळवाडिणीसह ह्या लहान उपनगराच्या भाजीबाजारात जाताना!

तिचा स्वभाव अगदी तोळामासा तोलून बोलण्याचा पडला. त्यामुळे तिच्याशी पट्टीचा बोलका मनुष्य जरी बोलावयास गेला तरी बोलणे वाढविणे अशक्य होते. अगदी कसलेले वार्ताहार तिच्या तोंडून चार शब्द काढून घेण्याची वेळ आली की बर्फासारखे थंड होऊन जातात. 'हो' किंवा 'नाही' इतके एकदा ती कशाविषयीही म्हणाली की तो विषय संपला असे समजावे. हा तिचा अबोला स्वभाव सुध्दा थोरवीचा नाही, ऐटीचा नाही, तर अगदी संकोची साधेपणाचा.

मुसोलिनीसह त्यांच्या पत्नी केव्हांही आंतरराष्ट्रीय राजपरिवारांच्या किंवा राजदूतांच्या मोठमोठ्या भोजनसमारंभात वा महासभांत जात नाहीत. युरोपात पतिसमवेत पत्नी ही बहुधा अशा जनिक समारंभातून भाग घेते, त्यामुळे राशेलबाई पतीसह का येत नसतात याची पृच्छा होते. त्यातही थोरांच्या भार्याही थोर असतात, ही जी एक लौकिक अपेक्षा सामान्यतः रुढ आहे तिला जेव्हा अपवाद येतो आणि एखाद्या थोर पुरुषाची स्त्री तिच्यात एखादी सार्वजनिक योग्यता किंवा कर्तृत्व नसल्यामुळे सहजीच फारशी पुढे येत नाही; तेव्हा सामान्य लोकांमध्ये सुध्दा अशी एक किंवदन्ती पसरत जाते की त्या थोर पुरूषाकडूनच त्याच्या पत्नीची हेटाळणी होत असल्यामुळे ती तशी मागे पडली असावी. घरांतल्या घरांत ती तशी मागे स्वतःच्या इच्छेनेच रहात असता रिकामटेकडी गप्पाबाजी म्हणते की तिला, तिच्या थोर पतीनेच कोंडून ठेवले असावे. तिचा काहीतरी छळ होत असावा. मुसोलिनीसारख्या प्रभावशाली पुरुषाच्या राशेलबाईसारख्या ह्या अगदी साध्या न सामान्य पत्नी विषयीहि त्याच कारणामुळे तशीच एक कुजबूज कुठे कुठे एकू येते की - राशेलबाईची मुसोलिनीकडून हेटाळणी होत असावी, ती मनात कुढत असावी, त्याच्या सांगाती राष्ट्रीय वा जनिक समारंभात जाण्याची तिला अनुज्ञाच नसावी, त्या पती-पत्नीमध्ये काहीतरी वैमनस्य असावे!

पण खरी गोष्ट तशी नाही. मुसोलिनीचे गृह म्हणजे कौटुंबिक आनंदाचे माहेरघर आहे. घरकाम, मुलाबाळांचे संगोपन, पतीची शुश्रूषा आणि कुटुंबाचे नि दासदासींचे परिपालन हीच स्त्रियांची प्रथम नी प्रमुख कर्तव्य होत अशी राशेलबाईची स्वतःचीच निष्ठा आहे. आवड आहे. मुसोलिनीचीही तीच आवड आहे. त्यामुळे ते दांपत्य प्रेमाने नी आनंदाने नांदत आहे. राजकारणात प्रभाव पाडण्यासारखे लोक कोणतेही

व्यक्तिमत्व अंगी नसताहि केवळ आपली पत्नी जगापुढे यावी म्हणूनच तिला राष्ट्रकारणांत उठाठेवी करू देणाऱ्या आनंदीबाईसारख्या बाईलवेडापेक्षा मुसोलिनी नि त्याच्या ह्या सूज्ञ पत्नीचे उचलेल तेच कर्तव्य करीत राहून फुकट किर्तीची हाव न धरणारे हे निरपेक्षत्वच खऱ्या थोरवीचे लक्षण आहे, मुसोलिनीची पत्नी गृहिणी या नात्यानेच खरे खरे थोरपण संपादीत आहे. तिचा पती जसा देशधुरंधर नेता आहे तसेच तिचे पुत्रही एकनिष्ठ देशवीर आहेत. तिच्या दोन्ही पुत्रांनी अॅबीसीनीयन युध्दात वैमानिक साहसाची पराकाष्ठा करुन दाखविली. राज्याचे सूत्र ज्याच्या हाती तो पुरूष थोर आहेच, पण पाळण्याची दोरी जिच्या हाती ती स्त्री काही कमी थोर नव्हे!

( ३ )

अॅबिसीनीयाचे सम्राट रासतफारी

यांची सम्राज्ञी

लेख लिहावयाचे ठरले तेव्हा 'अॅबिसीनीयाची विद्यमान सम्राज्ञी' हा मथळा मनात योजला. तो लिहून काढीतो, जी विद्यमान सम्राज्ञी होती ती अकस्मात एका दिवसाच्या तारेत 'विगत सम्राज्ञी' झाली! शाई वाळता वाळता सम्राज्ञी पदावरुन पदच्युत झाली ती बिचारी! पण अॅबिसीनीयाची विद्यमान सम्राज्ञी आहे तरी कशी, ती माहिती पूर्वी जिज्ञासेने जशी हवीशी वाटे तशीच आता बोलतां बोलतां सम्राज्ञीची जी बिचारी साधी स्त्री होऊन गेली, ती अॅबिसीनीयाची विगत सम्राज्ञी होती तरी कशी? अशी तिची विचारपूस चौकस असेल तो करणारच! यासाठी या लेखात तिचाही परिचय करुन देत आहे.

एखादे राष्ट्र कधी कधी पराक्रमाने युध्द लढूनहि पराभूत होते, तसेच बिचारे अॅबिसीनीया! असेही म्हणावसे वाटते. पण गेली दीडशे वर्षे आपली स्थिती सुधारून त्याच्याभोवती घिरट्या घालणाऱ्या युरोपच्या बरोबरीने सामर्थ्य मिळविण्याची संधी हाती असूनही त्या सम्राटाने नी त्या राष्ट्राने ती गमावण्याचा, दुबळेचे दुबळे, धर्मभोळेचे धर्मभोळे, दगडधोंडे फेकणाऱ्या शेंदाड शिपायाचा शेंदाड शिपाई राहण्याचे जे पाप अॅबिसीनीयाने केले त्याचे योग्य ते प्रायश्चित निसर्गाने त्यास दिले असेच म्हणणे भाग पडते. त्याच अवधीत जर जपान झटपट उठून युरोपच्या विज्ञानाशी विज्ञानाने, व्यापाराशी व्यापाराने, तलवारीशी तलवारीने, बेडराशी बेडराने, विमानाशी विमानाने, तोंड देऊन जगू शकला, तर काय अॅबिसीनीया जगला नसता? पण तो नुसता बायबलातील प्रार्थना करीत बसला! गंडे, ताईत, दोरे ह्यांच्या प्रस्थामुळे त्या अॅबिसीनीयांत मशीनगन्स-विमानांपेक्षा अधिक प्रस्थ! हजारो भिक्षुणी जन्मभर नुसत्या बायबल वाचणाऱ्या नि भिक्षुपाद्री लोकांना नवससायासादि भाकड उपायांना उपदेशीत पडलेले! स्वतः अॅबिसीनीयनांनी ज्या ज्या रानटी टोळ्या पूर्वी जिंकल्या त्यांना त्यांना वंशपरंपरा गुलाम केलेले आहे. आजहि ते सहस्त्रावधि गुलाम त्या देशात त्या बादशहाच्या सत्तेखाली खिचपत होते. दुसऱ्यांचा 'धर्म' देखील ह्याच अॅबिसीनीयन राजवंशाने बळाने हिरावून त्यांना बलात्काराने झटपट ख्रिस्तावले होते! तेच हे लोक आता त्या प्रबळ इटलीच्या बळाच्या टाचेखाली स्वतः गुलाम होऊन पडले. आता आमच्यावर बलात्कार झाला. विमाने, बॉम्ब, विषधूर नव्हता हो आमच्यापाशी, असे रडून काय उपयोग? जगाला दया यावी म्हणून जगापुढे गाऱ्हाणी करीत रहाणे भाग पडावे हेच एक राष्ट्रीय पाप आहे!

ह्या पापामुळे राज्य गमावल्यानंतरहि आपल्यावर झालेल्या अन्यायाचे गाऱ्हाणे देवापुढे करण्यास ॲबिसीनीयाची ती विगत महाराणी पॅलेस्टाइनला जात आहे! पॅलेस्टाइन म्हणजे ॲबिसीनीयन ख्रिस्ती स्त्रियांची पुण्यभूमि, धर्मभूमि, काशी! तेथे जाऊन त्या पवित्र मंदिरात अत्यंत उच्च अशा ख्रिस्ती पुरोहिताकडून ॲबिसीनीयाच्या वतीने देवास त्या म्हणे प्रार्थिणार आहेत की,'राज्य परत दे! पण त्या विसरतात की,

'देवही दुबळयांचे की / असणार किती बळी!'

ॲबिसीनीयन बादशहाच्या अभ्यर्थनेची राष्ट्रसंघ जी संभावना करणार तितकी देखील ह्या ॲबिसीनीयन बादशाहिणीच्या प्रार्थनेची संभावना स्वर्गातील देवदूतसंघ वा स्वयमेव देव करणार नाही! न्यायाचाच प्रश्न असता तर देवाने त्या बादशाहिणीच्या सिंहासनाचा इटलीच्या बॉम्ब गोळ्यांनी प्रथम मूळांतच चक्काचूर का होऊ दिला असता? पण ते काही एक न समजता ती पदच्यूत राणी पॅलेस्टाइनला जाऊन ज्या देवाने राज्य बुडू दिले त्याच देवापुढे गाऱ्हाणे करणार आहे की - राज्य परत दे! इतकी ती धर्मभोळी आहे!

उपलब्ध आहे त्या माहितीवरुन ह्या राणीचा जर काही विशेष असेल तर तो तिचा हा बायकी धर्मभोळेपणाच काय तो होय! तिने पूर्वीहि एकदा सम्राज्ञी असता मोठ्या डामडौलाने पॅलेस्टाइन-जेरुसलेमची यात्रा केली होती. आपल्या देशात चर्चनि पाद्री यांचा मूळचाच धुमाकूळ असताना तिने नवी चर्चे बांधविली. पण नवीन पध्दतीची सैन्य किंवा शस्त्रास्त्रे वाढविली नाहीत. विमाने बनविली नाहीत. इटलीशी आज पंचवीस वर्षे सारखी कटकट चालू असतां तिला शह देण्यासाठी मशीनगन्सचा एकही कारखाना काढणे तिथे कोणाला अवश्य वाटले नाही. प्रार्थनेवारी इटलीला पादाक्रांत करण्याची शक्यता त्यांना वाटली की काय कळत नाही!

ही ॲबिसीनीयाची महाराणी मध्यम उंचीची, सडक बांध्याची आणि गंभीर मुद्रेची प्रौढ महिला आहे. ज्यू लोकांच्या पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे ती जेव्हा बाहेर निघते, तेव्हा अंगावर ओढलेल्या एका रेशमी अवगुंठनांत नखशिखान्त झाकलेली असते. घरांत उंची वस्त्रांचे लहंग्यासारखे एक नेसण आणि एक 'छम्मा' नावाचा झगा घालते. हाती विणलेले सुबक नक्षीकाम तिला आवडते. तिने राष्ट्रीय आरोग्य सुधारण्यासाठी एक रुग्णालय स्थापले. धार्मिक शिक्षण म्हणजे बायबल शिक्षण - वाढावे म्हणून काही शाळा काढल्या. तिच्या स्वतःच्या प्रासादात आणि पार्श्वचरांत पूर्वी जिंकलेल्यांचे वंशज असे अनेक गुलाम राबत असत. आज तिचे राष्ट्र इटलीने जिंकल्यामुळे राजकीय अर्थी तरी तीहि एक गुलामच झाली आहे!

ती जगात कधी मिसळलीच नाही. तिच्या मागासलेल्या देशाची देखील जिथे कोणास माहिती नसे तिथे त्याची राणी म्हणून तिची वास्तपुस्त जगात कशी होणार? अवगुंठनात गुरफटलेल्या या ॲबिसीनीयाच्या महाराणीचे अस्तित्व इटलीच्या या चढाओढीमुळेच काय ते जगतास प्रथम कळले. आणि कळले न कळले तोच महाराणी म्हणून असलेले ते तिचे अस्तित्व नाहीसेहि झाले. त्या कळण्या न कळण्याच्या मधल्या चमकेत तिच्या विषयी जगास जे काही कळले ते वर दिले आहे. त्याहून काही फारसे जास्त वा निराळे नाही! ( स्त्री मासिक- जून १९३६ )